# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१७/१२/२०१३

**दि. १७/१२/२०१३ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक १७/१२/२०१३ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | सौ. मिना कुमार आयलानी | सभापती |
| २ | कु. जयश्री जीवनलाल जग्यासी | सदस्य |
| ३ | डॉ. महेश गजानन गावडे | सदस्या |
| ४ | सौ. पचंशीला नाना पवार | सदस्य |
| ५ | सौ. आशा प्रभुनाथ गुप्ता | सदस्या |
| ६ | श्री. नरेंद्र (कुमारी) केवलराम ठाकुर | सदस्या |
| ७ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | सदस्य |
| ८ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे | सदस्य |
| ९ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे | सदस्या |
| १० | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | सदस्य |
| ११ | श्री. राम फुंदुमल पारवानी | सदस्या |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | सदस्य |
| १३ | श्री. सतरामदास फतनदास जेसवानी | सदस्य |
| १४ | श्रीमती कांचन अमर लुंड | सदस्य |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. सुरेश मधुकर जाधव २. श्री. गणपत गोविंद एडके

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त
३. श्री. राजेंद्र चव्हाण, उप—आयुक्त
४. श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. रमेश भदाणे, सहा. आयुक्त
७. श्री. योगेश गोडसे, महापालिका सचिव
८. श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
९. श्री. एस.एम. अली, प्र. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१०. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
११. श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विद्युत
१२. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१३. श्री. एकनाथ पवार, प्र. स्वच्छता निरिक्षक
१४. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, आरोग्य
१५. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१६. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१७. श्री. अमर अहुजा, प्र. कर अधिक्षक
१८. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
१९. श्री. मनिष हिवरे, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

२०.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. विधी अधिकारी
२१. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती विशाखा सावंत
३. श्रीमती नर्गीस खान

सांयकाळी ४.१६ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्यास्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

**महापालिका सचिव :—**मा. पीठासीन अधिका—यांच्या अनुमतीने सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात येत आहे.
विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक २७/९/२०१३ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्या श्रीमती कांचन लुंड:—**श्री. नरेश तहीलरामानी हे स्थानिक वृत्तवाहिन्यांवर निवेदन देवुन लोकांमध्ये जागृती करत आहेत की, प्रेतांच्या दहनासाठी लाकडे फुकट देण्याचा महापालिकेत ठराव झाला आहे. व १ एप्रिल पासुन त्याची कार्यवाही होणार होती. ती अदयापपर्यंत का होत नाही? नगरसेवकांनी याबाबतचा निधी हडप केला असल्याने त्याची कार्यवाही होत नाही असे म्हटले जात आहे. त्यामुळे आम्हां नगरसेवकांची शहरामध्ये बदनामी होत आहे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**स्थायी समिती सभेमध्ये या विषयाबाबत चर्चा झाली होती व सभापती महोदया यांनी अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये वाढ करण्याबाबतीत आदेशही दिले होते.

**सदस्या श्रीमती कांचन लुंड :—**मला माहित पडले आहे की यासाठी निधी उपलब्ध नाही. निधी उपलब्ध नाही मग ठराव करता का? शहरामध्ये साफसफाई व्यवस्थीत होत नाही. कचरा गाडया तुटलेल्या असतात त्यातुन कचरा रस्त्यामध्ये पडत जात असतो.

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी :—**प्रेतांच्या दहनासाठी लाकडे फुकटात देण्याविषयीच्या प्रकरणी मी डॉक्टर राजा रिजवानी यांच्याशी चर्चा केली आहे. व त्यांच्याबरोबर मी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतही गेले होते व तेथे आयुक्तांशी चर्चा केली आहे. कल्याणमध्ये स्मशानभुमी महापालिका चालवित असल्याने त्यांचे व्यवस्थापन आणि आपल्याकडील स्मशानभुमींचे व्यवस्थापन वेगवेगळे आहे. आपल्याकडील स्मशानभुमीचे व्यवस्थापन सार्वजनिक ट्रस्टकडे आहे.

**सदस्य श्री. राम पारवानी :—**याबाबत एक लक्षवेधी दिली पाहिजे की आम्ही ठराव पारीत केला असून त्यावर अदयाप कार्यवाही का होत नाही? असा मुद्दा उपस्थित केला पाहिजे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**प्रेतांच्या दहनासाठी लाकडे फुकट देण्याबाबतीत ठराव पारीत झालेला आहे. आपल्या महानगरपालिकेचे व कल्याण डोंबिवली महापालिकेचे उपविधी वेगवेगळे आहेत. आपल्या येथे स्मशानभुमीचे व्यवस्थापन सार्वजनिक ट्रस्टद्वारे चालविले जाते. कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात स्मशानभुमीचे व्यवस्थापन महापालिकेकडे आहे.

**सदस्य श्री. राम पारवानी :—** प्रेतांच्या दहनासाठी जी लाकडे निशुल्क दयायची आहे त्याबाबत कार्य प्रणाली निश्चित झाली पाहिजे. प्रेतांचे दहन करण्यापुर्वी ती लाकडे दयायची की दहन झाल्यानंतर लाकडांचे पैसे दयायचे त्याबाबत निर्णय झाला पाहिजे.

**<u>सदस्या श्रीमती कांचन लुंड :–</u>**माणुस मेल्यानंतर भलेही तो गरीब असो किंवा श्रीमंत असो त्याच्यावर अग्निसंस्कार तर स्मशानभुमीतच केले जातात ना? प्रेताच्या दहनासाठी लाकडे फुकट देण्याबाबतीतचा जो काही खर्च आहे तो फार मोठा खर्च नाही सात आठ कोटीचा खर्च नाही, जेमतेम पन्नास–साठ लाखाचा खर्च आहे. आणि या सुविधेचा फायदा श्रीमंत लोक घेणार नाहीत परंतु जे आर्थिकदृष्टया दुर्बल असतील अशा गरीब लोकांना या सुविधेचा फायदा मिळाला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. राम पारवानी :–</u>**एखादया श्रीमंत व्यक्तीचे निधन झाल्यानंतर त्याच्या प्रेताच्या दहनासाठी फुकट लाकडे दिली नंतर याबाबतीत स्थानिक वृत्तवाहिन्यांवर तसेच वर्तमानपत्रांमध्ये बातम्या येतात की, महापालिकेकडुन प्रेतांच्या दहनासाठी निशुल्क लाकडे पुरविली जातात अशा बातम्यामुळे त्या श्रीमंत व्यक्तीच्या कुटुंबियांना आपला कमीपणा झाल्या सारखा वाटतो त्यांना वाटते की, हजार पंधराशे रुपयांसाठी आम्ही आमचा कमीपणा का करुन घ्यायचा असे त्यांना वाटते.

**<u>सदस्य डॉ. महेश गावडे :–</u>**श्रीमंत व्यक्ती हे मान्य करणार नाही की आपल्या कुटुंबातील मृत व्यक्तीच्या दहनासाठी फुकटात लाकडे मिळावीत म्हणुन आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्तींच्या कुटुंबातील मृत व्यक्तीच्या दहनासाठी निशुल्क लाकडे पुरविली जातील अशा प्रकारची एक अट त्यामध्ये टाकली जावी.

**<u>सदस्या श्रीमती कांचन लुंड :–</u>**कोणताही श्रीमंत व्यक्ती आपल्या कुटुंबातील मृत व्यक्तीच्या दहनासाठी निशुल्क लाकडे दया अशी मागणी करणारच नाही.

**<u>सदस्य जयेंद्र मोरे :–</u>**श्रीमंत व्यक्ती त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे निधन झाल्यानंतर त्याच्या प्रेताच्या दहनासाठी रू. ५००/– , १०००/– खर्चाची लाकडे फुकट मिळावीत म्हणुन अपेक्षा ठेवणार नाहीत.

**<u>सदस्य डॉ. महेश गावडे :–</u>**गरीब कुटुंबातील मृत व्यक्तीच्या दहनासाठी निशुल्क लाकडे देण्यासाठी आर्थिकदृष्टया दुर्बल असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबतची अट टाकण्यात यावी.

**<u>सदस्या श्रीमती कांचन लुंड :–</u>** हा विषय सर्वसाधारण जनतेचा आहे त्यामुळे हा विषय सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा.

**<u>सदस्य श्री. राम पारवानी :–</u>**या विषयावर महासभेत चर्चा होवुन निर्णय झाला पाहिजे. याबाबत अर्थसंकल्पामध्ये केलेली तरतुद आम्ही वाढविली आहे.

**<u>सदस्य डॉ. महेश गावडे :–</u>**अटी, शर्ती टाकुन आपण हे करु शकतो. शिधापत्रिकेवर त्यांचे वार्षिक उत्पन्न लिहिलेले असते, त्या आधारावर आर्थिक दुर्बल घटकातील मृत व्यक्तींच्या कुटुंबातील मृत व्यक्तीच्या दहनासाठी निशुल्क लाकडे दिली जावु शकतात.

**<u>सदस्या श्रीमती कांचन लुंड :–</u>**शहरातील लोक म्हणतात की याकामी अर्थसंकल्पामध्ये निधी ठेवण्यात आला होता तो नगरसेवकांनी हडप केला आहे, त्यामुळे आमचे नाव खराब होत आहे.

**<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:–</u>**स्थायी समितीच्या मागील सभेत विदयुत विभागातील कामांसाठी निधी समायोजित केला होता त्यातुन तुम्ही किती कामे केली आहेत. माझ्या प्रभागात मी १५ लाईटच्या पोलची मागणी केली होती त्यापैकी फक्त २ मिळाले आहेत. बाकींच्या बाबतीत काय?

**<u>प्र.उप अभियंता (विदयुत) श्री. बबीश गंगारामानी:–</u>** याविषयी मी पुढील सभेत सांगतो, कारण कि, आज कार्यकारी अभियंता श्री. आयलानी साहेब नाहीत.

**<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:–</u>**श्री. आयलानी साहेब कुठे गेले आहेत, ते येईपर्यंत सर्व लोक अंधारात राहतील काय? अंधारात काय काय घडते आपणांस माहित नाही का?

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**मागील सभेचे दिनांक २७/९/२०१३ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक २७/९/२०१३ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नांव :श्रीम. कांचन लुंड

**स्थायी समिती ठराव क्र. :—** ४४ अ **दिनांक : १७/१२/२०१३**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २७/९/२०१३ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ७८ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

.**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

**विषय क्र. २ :—** कर आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४३०० (जुना क्रमांक 08/0674 ) रद्द करुन वर्ष २०१२–१३ अखेर थकित मालमत्ता कर व पाणी पटटी रक्कम रुपये २१,१५३/- विलंब शास्ती (मनपा व शासकिय करांवरील निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

**सदस्य श्री. राम पारवानी :—**या विषयाबाबत स्पष्ठीकरण कोण करेल. मागील सभेत सांगण्यात आले होते कि, अशाप्रकारचे जे काही प्रस्ताव राहिले आहेत असे सर्व विषय एकत्रितपणे आणले जावेत. आता फक्त दोन तीनच प्रस्ताव आणले आहेत आणि हे लोक मिळकतकर का भरत नाहीत?

**सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:—**सकपाळ व सपकाळ अशी मिळकतकराच्या देयकावर आडनावे लिहिली जातात. चुकीची नावे लिहिल्यामुळे मिळकतधारक देयक स्विकारत नाहीत त्यामुळे वसुली होत नाही. सकपाळच्या ठिकाणी सपकाळ लिहिले जाते आणि त्यामुळे ते लोक देयक स्विकारत नाहीत व भरणा करत नाहीत तर हि त्यांची चुक आहे का?

**उप—आयुक्त (कर) श्री. संतोष देहेरकर:—** दुबार नोंद असलेल्या व नावांमध्ये चुका असलेल्या मिळकतधारकांनी दुरूस्तीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी त्यांना महापालिकेकडून आवाहन करण्यात आलेले आहे परंतु नागरिकांकडून त्यांस पाहिजे तेवढा प्रतिसाद मिळत नाही.

**सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:—**कार्यालयाच्या चुकांमुळे मिळकतधारकांनी कर भरला नाही हि त्यांची चुक नाही त्यामुळे त्यांना दंड तरी आकारण्यात येवु नये ना?

**उप—आयुक्त (कर) श्री. संतोष देहेरकर:—** दुबार नोंद असलेले आणि नावांमध्ये चुका असलेल्या मिळकतधारकांनी मिळकतीच्या क्रमांकानुसार देयक स्विकारून महापालिकेकडे कराचा भरणा करावा तसेच चुकांसंबंधी दुरूस्तीसाठी अर्ज करताना त्यावरसुध्दा मिळकत क्रमांकांची नोंद करण्यात यावी.

**काही सदस्य:—**पास,पास.......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—** कर आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४३०० (जुना क्रमांक 08/0674 ) रद्द करुन वर्ष २०१२—१३ अखेर थकित मालमत्ता कर व पाणी पटटी रक्कम रुपये २१,१५३/- विलंब शास्ती (मनपा व शासकिय करांवरील निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील बॅरेक नं. ४०५, रूम नं. ८, उल्हासनगर—१ या जागेवर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात पुढीलप्रमाणे प्रथम कर निर्धारण करण्यात आले होते.

अ)**मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४२०० (जुना क्रमांक ०८/०६७३)**

मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती:— भारती मनोहरलाल मसंद

पत्ता :— बॅरेक नं. ४०५, रूम नं. ८ (भाग) उल्हासनगर—१

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| एसी शिट ब्रिक्स | मालक | निवासी | ० | २४७ | ० | २४७ |
| एसी शिट ब्रिक्स | मालक | निवासी | ० | २०२ | ० | २०२ |
| एसी शिट ब्रिक्स | मालक | अनिवासी | ० | ९६ | ० | ९६ |

ब)**मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४३०० (जुना क्रमांक ०८/०६७४)**

मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती:— गोपालदास चोईथराम

पत्ता :— बॅरेक नं. ४०५, रूम नं. ८ (भाग) उल्हासनगर—१ (मागील बाजु)

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| एसी शिट ब्रिक्स | मालक | निवासी | ० | ८६ | ० | ८६ |
| एसी शिट ब्रिक्स | मालक | निवासी | ० | १२७ | ० | १२७ |

क)**मालमत्ता क्र. ०८एआय०१४८१३४०० (जुना क्रमांक ०८/०९२६)**

मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती:— गोपालदास चोईथराम

पत्ता :— बॅरेक नं. ४०५, रूम नं. ८ (भाग) उल्हासनगर—१ (मागील बाजु)

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| ओपन | मालक | निवासी | ० | ३६ | ० | ३६ |
| एसी शिट ब्रिक्स | मालक | निवासी | ० | ८६ | ० | ८६ |
| एसी शिट ब्रिक्स | मालक | निवासी | ० | १२८ | ० | १२८ |

परंतु श्रीम. भारती मनोहरलाल मसंद, बॅरेक नं. ४०५, रूम नं. ८, उल्हासनगर–१ यांनी दिनांक ०६/०३/२०१२ रोजीच्या पत्रान्वये खालील बाबींबाबत हरकत दाखल केली आहे.

**महानगरपालिका कर आकारणी पुस्तकातील मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४३०० (जुना क्रमांक ०८/०६७४) ही नोंद रद्द करावी**

विषयांकित प्रकरणी संबंधित कर निरीक्षक यांनी बॅरेक नं. ४०५, रूम नं. ८, उल्हासनगर–१ या जागेची प्रत्यक्ष पाहणी केली असता दुय्यम निबंधक, उल्हासनगर–१ या कार्यालयाकडील अभिहस्तांतरणपत्र क्रमांक ०१७३९/२००८, दिनांक २३/०५/२००५ अन्वये बॅरेक नं. ४०५, रूम नं. ८ (भाग) उल्हासनगर–१ (मालमत्ता क्र. ०८एआय०१४८१३४०० (जुना क्रमांक ०८/०९२६)) करीता मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन भारती मनोहरलाल मसंद अशी नोंद जा. क्र. युएमसी/टीडी/युनिट १/६०६/०९ अन्वये करण्यात आली. तद्नंतर मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४२०० (जुना क्रमांक ०८/०६७३) व मालमत्ता क्र. ०८एआय०१४८१३४०० (जुना क्रमांक ०८/०९२६) या दोन मिळकती लगत असुन एकाच व्यक्तीच्या नावे नोंद असल्यामुळे त्या एकत्रित करून कर आकारणी करणेसाठी जा. क्र.उमपा/कर विभाग/यु१/११५/१०, दिनांक २९/३/२०११ अन्वये आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशाच्या अनुशंगाने दोन्ही मिळकतीच्या करपात्र बाबी एकत्रित करून मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४२०० (जुना क्रमांक ०८/०६७३) अन्वये कर आकारणी सुरू आहे. करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| ओपन | मालक | निवासी | ० | ३६ | ० | ३६ |
| एसी शिट | मालक | निवासी | ० | ८६ | ० | ८६ |
| ब्रिक्स | मालक | निवासी | ० | १२८ | ० | १२८ |
| एसी शिट | मालक | निवासी | ० | २४७ | ० | २४७ |
| ब्रिक्स | मालक | निवासी | ० | २०२ | ० | २०२ |
| एसी शिट | मालक | अनिवासी | ० | ९६ | ० | ९६ |
| ब्रिक्स | | | | | | |
| एसी शिट | | | | | | |
| ब्रिक्स | | | | | | |
| एसी शिट | | | | | | |
| ब्रिक्स | | | | | | |

बॅरेक नं. ४०५, रूम नं. ८ (भाग) उल्हासनगर–१ (मागील बाजु) या जागेवर कर निर्धारण करताना नजरचुकीने मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४३०० (जुना क्रमांक ०८/०६७४) व मालमत्ता क्र. ०८एआय०१४८१३४०० (जुना क्रमांक ०८/०९२६) नुसार दोन वेळा प्रथम निर्धारण गोपालदास चोईथराम यांचे नावे झाले आहे. दोन्ही मिळकतीकरीता नमुद करपात्र बाबींतही समानता आहे. तथापि, जा. क्र. उमपा/कर विभाग/यु१/११५/१०, दिनांक २९/३/२०११ नुसार मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४२०० (जुना क्रमांक ०८/०६७३) व मालमत्ता क्र. ०८एआय०१४८१३४०० (जुना क्रमांक ०८/०९२६) या दोन मिळकती एकत्रित करून कर आकारणी सुरू आहे.

तसेच सद्यस्थितीत गोपालदास चोईथराम यांचे नावे नोंद असलेली बॅरेक नं. ४०५, रूम नं. ८ (भाग) उल्हासनगर–१ (मागील बाजु) (मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४३०० (जुना क्रमांक ०८/०६७४)) जागेवर आढळुन येत नाही. या मिळकतीचे खात्यात वर्ष २०१२–१३ अखेर मालमत्ता कर व पाणीपट्टी रक्कम रू. २१,१५३/– अधिक विलंब शास्ती (मनपा व शासकीय करांवरील) थकीत आहे.

उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४३०० (जुना क्रमांक ०८/०६७४) चे खात्यात वर्ष २०१२–१३ अखेर थकीत असलेला मालमत्ता कर व पाणीपट्टी रक्कम रू. २१,१५३/– अधिक विलंब शास्ती (मनपा व शासकीय करांवरील) वसुल न होण्याजोगा आहे,

सबब, महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४३०० (जुना क्रमांक ०८/०६७४) रद्द करून मिळकतीचे खात्यात वर्ष २०१२–१३ अखेर थकीत असलेला मालमत्ता कर व पाणीपट्टी रक्कम रू. २१,१५३/– अधिक विलंब शास्ती (मनपा व शासकीय करांवरील) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार निर्लेखित करणेसाठी मंजुरीकरीता स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४५ **दिनांक:– १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :– श्रीम. कांचन लुंड

अनुमोदकाचे नाव :– डॉ. महेश गावडे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कर आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या मालमत्ता क्र. ०८एआय०१४७९४३०० (जुना क्रमांक 08/0674 ) रद्द करुन वर्ष २०१२–१३ अखेर थकित मालमत्ता कर व पाणी पटटी रक्कम रुपये २१,१५३/- विलंब शास्ती (मनपा व शासकिय करांवरील निर्लेखित करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :–** कर आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या मालमत्ता क्र. 07एआय014681000 (जुना क्रमांक 07 /0947) रद्द करुन एप्रिल २००० पासून समाविष्ट असलेली पाणी पटटी रुपये ७ ८४०/–निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३ :–** कर आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या मालमत्ता क्र. 07एआय014681000 (जुना क्रमांक 07 /0947) रद्द करुन एप्रिल २००० पासून समाविष्ट असलेली पाणी पटटी रुपये ७ ८४०/–निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

स्वामी शांतीप्रकाश आश्रम ट्रस्ट, महात्मा शॉप फॅक्टरी, एस.व्ही. रोड, उल्हासनगर–१ यांनी दि. १८/१०/२०१२ रोजीच्या अर्जान्वये सदर मिळकतीस पाणी पुरवठा विभागामार्फत स्वतंत्ररित्या पाणीपट्टी आकारणी होत असल्यामुळे महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. ०७एआय०१४६८१००० (जुना क्रमांक ०७/०९४७) खात्यात समाविष्ट असलेली पाणीपट्टी रू. ७,८४०/– रद्द करणेसाठी विनंती केलेली आहे.

विषयांकित प्रकरणी संबंधित कर निरीक्षक यांनी दिनांक ५/११/२०१२ रोजी संदर्भित मिळकतींची प्रत्यक्ष पाहणी केली असुन त्यांनी पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

१) सदर मिळकतीस पाणी पुरवठा विभागामार्फत बिल क्र. यु/१/१२५९ अन्वये स्वतंत्ररित्या पाणी पट्टी आकारणी करण्यात येत आहे.

२) उप विभागीय अभियंता, पाणी पुरवठा देयक विभाग, उ.म.पा, उल्हासनगर–५ यांचेकडील पत्र क्र. उविअ/पापुदेवि/उमपा/६४३/२०१२, दिनांक ११/१०/२०१२ रोजीचे पत्रान्वये ग्राहक क्र. यु/१/१२५९ स्वामी शांतीप्रकाश टस्ट उल्हासनगर–१ यांचा असुन त्यांना पाणी पुरवठा विभागामार्फत बिगर घरगुती दराने पाणी बिलाची आकारणी करण्यात येते. तरी त्यांना मालमत्ता कर विभाागामार्फत मालमत्ता क्र. ०७एआय०१४६८१००० (जुना क्रमांक ०७/०९४७) मध्ये पाण्याचे बिलाची आकारणी एप्रिल २००० या कालावधीपासुन करण्यात येवु नये असे कळविले आहे.

उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. ०७एआय०१४६८१००० (जुना क्रमांक ०७/०९४७) चे खात्यात प्रथम कर निर्धारणापासुन समाविष्ट असलेली पाणीपट्टी रू. ७,८४०/– वसुल न होण्याजोगे आहे, असे इकडील मत आहे.

सबब, महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. ०७एआय०१४६८१००० (जुना क्रमांक ०७/०९४७) चे खात्यात एप्रिल २००० पासुन समाविष्ट असलेली पाणीपट्टी रू. ७,८४०/– मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार निर्लेखित करून वर्ष २०१२–१३ करीता सुधारीत बिल लागु करणेसाठी मंजुरीकरीता स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४६ **दिनांक:– १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :– श्रीम. आशा गुप्ता

अनुमोदकाचे नाव :– श्रीम. पंचशीला पवार

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कर आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या मालमत्ता क्र. 07एआय014681000 (जुना क्रमांक 07 /0947) रद्द करुन एप्रिल २००० पासून समाविष्ट असलेली पाणी पटटी रुपये ७ ८४०/–निर्लेखित करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. ४ :–** महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क. 44CO010176700 (Old No. 44/2816) ही नोंद रद्द त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष 2012–13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. **27894**/– +विलंब शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४ :–** महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क. 44CO010176700 (Old No. 44/2816) ही नोंद रद्द त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष 2012–13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. **27894**/– +विलंब शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनसुरून सादर करण्यात येते की, श्री. शामराव लकडू मराठे रा. महादेव नगर पाताली शिव मंदिरासमोर पेन्सिल फॅक्टरी जवळ, उल्हासनगर – 4. यांनी दि. 05/12/12 रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क. 44CO010176900 (Old No.44/2818) या एकाच मालमत्तेची मालमत्ता क. 44CO010176700 (Old No. 44/2816) अन्वये

झालेली दुबार नोंद रद्द करणेसाठी विनंती केलेली आहे. विषयांकित प्रकरणा संदर्भात कार्यालयीन दफ्तरी नोंदीचा तपषिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | मालमत्ता क्र. 44 / 2818 **44CO010176900** | मालमत्ता क्र. 44 / 2816 **O44CO010176700** |
|---|---|---|---|
| 1. | मिळकतीचे कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव व पत्ता | श्री. शामराव लकडू मराठे रा. महादेव नगर, पोरशन उल्हासनगर–4 | श्री. शामराव लकडू मराठे रा. हट इन महादेव नगर पोरशर, उल्हासनगर–4 |
| 2. | मालमत्तेचा पत्ता | रा. महादेव नगर, पोरशन उल्हासनगर–4 | एच एम सी वॉलजवळ शिवरोड बिर्ला गेट उल्हासनगर – 1 |
| 3. | प्रथम कर निर्धारण वर्ष | वर्ष 1986–87 | वर्ष 1986–87 |
| 4 | क्षेत्रफळ | 160 चौ.फु | 160 चौ.फु |
| 5 | बांधकाम प्रकार | एसी शिट ब्रिक्स | एसी शिट बिगक्स |
| 6 | वापर | निवासी | निवासी |
| 7 | भाडेकरू असल्यास वार्षीक भाडे रक्कम | निरंक | निरंक |
| 8 | प्रथम कर निर्धारणानंतर मालमत्ता कर भरण्यास प्रथमतः जबाबदार व्यक्तींमध्ये बदल झाला असल्यास त्याचा तपषिल (आदेष क्रमांकासह) | निरंक | निरंक |
| 9 | प्रथम कर निर्धारणानंतर वेळोवेळी सुधारीत कर निर्धारण झाली असल्यास त्याबाबतचा सविस्तर तपषिल (मालमत्ता क्रमांक / निर्धारण वर्ष) | निरंक | वर्ष 1996–97 |
| 9अ | सुधारीत क्षेत्रफळ | निरंक | 140 चौ. फु. |
| 9ब | सुधारीत बांधकाम प्रकार मिळकतीचा वापर | निरंक | एसी. शिट ब्रिक्स |
| 9क | सुधारीत वापर | निवासी | निवासी |
| 9ड | भाडेकरू असल्यास वार्षीक भाडे रक्कम | निरंक | निरंक |
| 10 | वर्ष 12–13 अखेर मालमत्ता करापोटी थकीत रक्कम(चालु मागणीसह) | रु. 3487 / – | रु. 17038 / – |
| 11 | वर्ष 12–13 अखेर पाणीपटट्ी करापोटी थकीत रक्कम(चालु मागणीसह) | रु. 7134 / – | रु. 10856 / – |
| 12 | एकुण थकीत रक्कम (चालु मागणीसह) | रु. 10621 / – +विलंब शास्ती | रु. 27894 / – +विलंब शास्ती |
| 13 | मालमत्ता कराचा भरणा केला असल्यास त्याचा तपषिल (पावती क्रमांक,दिनांक,रक्कम) | पावती क्र. 9900032756. दि. 21 / 6 / 06 रक्क्म रू. 200 / – | निरंक |

**<u>स्थळ पाहणी अहवालाचा तपशिल</u>**

| | | |
|---|---|---|
| 1 | स्थळ पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव पदनाम व दिनांक | श्री. डी. एल. मगर दिनांक 21 / 01 / 2013 |
| 2 | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे दोन्ही मिळकतीकरिता मालंमत्ता कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती म्हणुन असलेल्या नोंदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपषिल | होय |
| 3 | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे संदर्भित दोन्ही मिळकतीकरीता पत्त्यात असलेल्या नोंदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपषिल | दोन्ही मिळकतीचे पत्यात जवळपास समानता असल्याचे दिसून येते. |
| 4 | दोन्ही मालमत्तेचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार व वापर इ. करपात्र बाबींत समानता आहे काय? | मालमत्ता क्षेत्रफळ,बांधकाम प्रकार, इत्यादीमध्येफरक आहे. वापर समानता आहे. |

| | | |
|---|---|---|
| 5 | स्थळ पाहणी केली असता सद्यस्थितीत जागेवर एकच मिळकत अस्तित्वात असल्याचे आढळुन आले आहे काय? | होय. मालमत्ता क्र. 44/2818 **44CO010176900** |

**अभिप्राय**
दि. 21/01/2013 संदर्भित दोन्ही मिळकतींची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत जागेवर श्री. शामराव लकडू मराठे यांचे नावे असलेली मालमत्ता क्र. **44CO010176900 (Old No.44/2818 )** ही अस्तिवात असून महानरगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे मिळकतीकरिता नमुद कर पात्र बाबी प्रत्यक्ष जागेवर असल्याचे दिसून येत आहे. तसेच संबंधीत प्रभाग क्र. 44 मध्ये मालमत्ता क्र. **44CO010176700** (Old No. **44/2816)** ही कोठेही अस्तित्वात असल्याचे आढळून येत नाही.

तरी महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. **44CO010176700** (Old No. 44/2816)रदद् करणे उचित वाटते.

**कर निरीक्षक**
उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. **44CO010176900 (Old No.44/2818)** या एकाच मालमत्तेची मालमत्ता क्र. **44CO010176700** (Old No. 44/2816)ही दुबार नोंद असल्याचे दिसुन येत आहे. तसेच मिळकत संदर्भात वर्ष 2012–13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रु. **27894**/– +विलंब शास्ती वसुल न होण्याजोगे आहे असे इकडील मत आहे.
सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 152 नुसार 44CO010176700 (Old No. 44/2816) ही नोंद रद्द करून त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष 2012–13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. **27894**/– +विलंब शास्ती. मा.स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४७ **दिनांकः– १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :– डॉ. महेश गावडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. जयेंद्र मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 44CO010176700 (Old No. 44/2816) ही नोंद रद्द त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष 2012–13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. **27894**/– +विलंब शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :–** महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 54DI013919500 (Old No. 54/2981) ही नोंद रद्द त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष 2012–13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. **54464**/– +विलंब शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

---

**सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे :–** या ज्या चुका होतात त्या कुणाच्या होतात. कशा होतात, आणि त्या निदर्शनास कशा येतात, चुकीविषयी जबाबदारी कुणाची आहे.

**उप–आयुक्त (कर) श्री. संतोष देहेरकर:–** दुबारनोंदी असल्याबाबत ब–याचशा हरकती आल्या आहेत. कित्येक वर्षापासुन हे चालू आहे. या दुबार नोंदी रदद् करण्यासाठी आम्ही एक विहीत नमुना तयार केला आहे. त्यामध्ये माहिती घेतली जाते व अशा आढळून आलेल्या दुबार नोंदीपैकी एक नोंद रदद् करण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर केला जातो.

**सदस्य, श्री. राम पारवानी :–**या दुबार नोंदी कशा होतात.

**सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे :–** आधी आपण नोंदी करता आणि नंतर म्हणता कि दुबार नोंद झाली आहे त्यातील एक नोंद रदद् करा.

**सदस्य, श्री. राम पारवानी :–** अगोदर बॅरेकचे रूम होते त्यांना मिळकत कर आकारणी केली जात होती नंतर त्या तोडून तेथे इमारती उभ्या राहिल्यानंतर फ्लॅटना मिळकत कर आकारणी करण्यात आली त्यामुळे जुन्या बॅरेकचे मिळकत कर आकारणी आणि नविन फ्लॅटची मिळकत कर आकारणी झाल्यामुळे दुबार नोंदी झाल्या आहेत तसेच जुने मार्केट ब्रेक्स झाले आहे त्याठिकाणी नविन गाळे तयार होतात त्यावेळी जुन्या मार्केट व नविन गाळे या एका जागेवरील मिळकतीवर दोन्हीप्रकारे कर आकारणी केली जाते आणि अशाप्रकारे दुबार नोंदी होत असतात.

**सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे :–** मिळकत कराची देयके दुबार होतात, मिळकती तर दुबार नाहीत ना?

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ५ :–** महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 54DI013919500 (Old No. 54/2981) ही नोंद रद्द त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष 2012–13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. **54464**/– +विलंब शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प नं. ५ येथील जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, दुसरा मजला, मोकळी जागा, यु. नं. २७८८८, षिट नं. ६४, भाग उल्हासनगर–५ या जागेची महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. **५४डीआय०१३९१९५०० (जुना क्र. ५४/२९८१)** अन्वये नोंद असुन मालमत्ता कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन **बलदेव लाडीकराम कुकरेजा** अशी नोंद आहे. करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मोकळी जागा | मालक | अनिवासी | ० | ०१–एप्रिल–०३ | २१०० | ० | २१०० |

महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणात वर्ष २००८–०९ मध्ये मिळकतीचे मोकळया जागेवर एसी शिट ब्रिक्स बांधकाम झाल्याचे निदर्शनास आल्याने वर्ष २००८–०९ पासुन खालीलप्रमाणे स्वतंत्ररित्या मालमत्ता कर आकारणी सुरू आहे.

| अ क्र | मालमत्ता क्र | मालमत्ता कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नाव | पत्ता | बांधकाम प्रकार | वापर | क्षेत्र (चौ.फु) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | 54DO019410800 | तुलसीदास रूपचंद कारारा | आर.आर.के डाईंग जवळ, जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, दुसरा मजला, शॉप नं. १, उल्हासनगर–५ | एसी षिट ब्रिक्स | अनिवासी | २२५ |
| २ | 54DO019410900 | पप्पु आईलसिंघानी | आर.आर.के डाईंग जवळ, जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, दुसरा मजला, शॉप | एसी षिट ब्रिक्स | अनिवासी | २२५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | नं. २, उल्हासनगर–५ | | | |
| ३ | **54DO01941 1000** | बेबु आईलसिंघानी | आर.आर.के डाईंग जवळ, जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, दुसरा मजला, शॉप नं. ३, उल्हासनगर–५ | एसी सिट ब्रिक्स | अनिवासी | २२५ |
| ४ | **54DO01941 1100** | एस. आर. सचदेव | आर.आर.के डाईंग जवळ, जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, दुसरा मजला, शॉप नं. ४, उल्हासनगर–५ | एसी सिट ब्रिक्स | अनिवासी | २२५ |
| ५ | **54DO01941 1200** | हेमंत सचदेव | आर.आर.के डाईंग जवळ, जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, दुसरा मजला, शॉप नं. ५, उल्हासनगर–५ | एसी सिट ब्रिक्स | अनिवासी | २२५ |
| ६ | **54DO01941 1300** | प्रेमचंद गौर | आर.आर.के डाईंग जवळ, जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, दुसरा मजला, शॉप नं. ६, उल्हासनगर–५ | एसी सिट ब्रिक्स | अनिवासी | २२५ |
| ७ | **54DO01941 1400** | पारसराम | आर.आर.के डाईंग जवळ, जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, दुसरा मजला, शॉप नं.  , उल्हासनगर–५ | एसी सिट ब्रिक्स | अनिवासी | २२५ |
| ८ | **54DO01941 1500** | निना | आर.आर.के डाईंग जवळ, जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, दुसरा मजला, शॉप नं. ८, उल्हासनगर–५ | एसी सिट ब्रिक्स | अनिवासी | २२५ |
| ९ | **54DI019873 300** | बलदेव नानिकराम कुकरेजा | जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, टेरेस, शॉप नं. ९, उल्हासनगर–५ | एसी सिट ब्रिक्स | अनिवासी | २७० |

वास्तवित पाहता वर्ष २००८–०९ मध्ये जय गजानंद शॉपिंग कॉम्पलेक्स, दुसरा मजला, मोकळी जागा, यु.नं. २७८८८, शिट नं. ६४, भाग उल्हासनगर–५ ख्मालमत्ता क्र. **५४डीआय०१३९१९५०० (जुना क्र. ५४/२९८१),** या मिळकतीचे मोकळया जागेवर एसी शिट ब्रिक्स बांधकाम अस्तित्वात आल्यानंतर त्यावर मालमत्ता क्र **54DO019410800, 54DO019410900, 54DO019411000, 54DO019411100, 54DO019411200, 54DO019411300, 54DO019411400, 54DO019411500, 54DI019873300** अन्वये स्वतंत्ररित्या मालमत्ता कर आकारणी करून महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. ५४डीआय०१३९१९५०० (जुना क्र. ५४/२९८१) ही नोंद वर्ष २००८–०९ मध्येच रद्द करणे आवष्यक होते. परंतु संदर्भित मिळकतीवरील कर आकारणी अद्यापही सुरू असुन वर्ष २००८–०९ ते २०१२–१३ या कालावधीतील मालमत्ता कर आकारणी रक्कम रू. **५४,४६४ + विलंब शास्ती (मनपा व शासकीय करावरील) थकीत** आहे. वर्ष २००७–०८ पर्यंत मालमत्ता कराचा संपुर्ण भरणा करण्यात आला आहे.

श्री. बलदेव एल. कुकरेजा, जय बाबा कुंज, पेट्रोलपंप जवळ, गांधी रोड, उल्हासनगर–५ यांनी दिनांक १५/९/२०१२ रोजीचे अर्जान्वये मालमत्ता क्र. ५४डीआय०१३९१९५०० (जुना क्र. ५४/२९८१) चे मोकळया जागेत एसी षिट ब्रिक्स बांधकाम करण्यात आल्याने सदर मिळकत बंद करून त्यावरील कर आकारणी रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. ५४डीआय०१३९१९५०० (जुना क्र. ५४/२९८१) करीता वर्ष २०१२–१३ अखेर थकीत मालमत्ता कर आकारणी रक्कम रू. **५४,४६४ + विलंब शास्ती (मनपा व शासकीय करावरील)** वसुल न होण्याजोगे आहे, असे इकडील मत आहे.

त्याअनुशंगाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मालमत्ता क्र. ५४डीआय०१३९१९५०० (जुना क्र. ५४/२९८१) ही नोंद रद्द करून वर्ष २०१२–१३ अखेर थकीत मालमत्ता कर आकारणी रक्कम रू. **५४,४६४ + विलंब शास्ती (मनपा व शासकीय करावरील)** स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी प्रस्तावित करण्यात करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४८ **दिनांकः– १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. गोदुमल किशनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 54DI013919500 (Old No. 54/2981) ही नोंद रद्द त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष 2012–13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. **54464**/– +विलंब शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>**महापालिका सचिव :–**</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :– महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क. 58DO012217400 (Old No. 58/0944) ही नोंद रद्द त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष 2012–13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. **13,888**/– +विलंब शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

---

<u>**सदस्य, श्री. सतरामदास जेस्वानी :–**</u> महानगरपालिकेमध्ये निवडून दिलेल्या नगरसेवकांची शहरामध्ये बदनामी होत आहे. मिळकतकराची देयके आता डिसेंबर महिन्यामध्ये मिळकतधारकांना मिळत आहेत. जी प्रत्यक्षात माहे सप्टेंबर मध्ये देणे आवश्यक होते. देयके दिल्यापासुन तीन महिन्यात मिळकतकराची रक्कम भरली नाहीतर त्यांच्यावर दंडाची रक्कम आकारली जाते.

<u>**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकूर :–**</u> मिळकतकराची देयके कल्याणमधील पोस्ट ऑफिसमधून उल्हासनगर शहरातील मिळकतधारकांना पाठविली जातात ती पोच होण्यामध्ये एवढा वेळ का लागत आहे.

<u>**सदस्य, श्री. सतरामदास जेस्वानी :–**</u> हि प्रशासनाची चुक आहे त्यामुळे नगरसेवकांनी का बदनाम व्हावे. मिळकतकराचे हे देयक जरा वाचून पहा यावर तारिख कोणती आहे.

<u>**सदस्य, श्री. राम पारवानी :–**</u> मिळकतधारकांना वेळेवर मिळकतीची बिले मिळाली तर ते विहीत मुदतीत देयके भरतील ना.

<u>**उप–आयुक्त (कर) श्री. संतोष देहेरकर:–**</u> मिळकतकराची देयके वेळेवर पोचावीत म्हणुन ती स्पीडपोस्टाने पाठविली जातात. स्पीड पोस्टाने पाठविण्यासाठीचा खर्च प्रती देयक रू.२२/– एवढा आहे व कुरीयरने पाठविण्याचा खर्च रू.१७/– असा आहे. आम्ही हि देयके पोस्टाने पाठवितो कारण की, देयक मिळाले नाही म्हणुन कि न्यायालयात गेला तर त्यांस ते देयक किती तारखेस मिळाले आहे हे पोस्टाच्या शिक्क्यानुसार आपण त्यांना दाखवु शकतो. देयके पोचण्यामध्ये तीन तीन चार चार महिने लागत आहे असे आपण म्हणता तर प्रत्यक्षात ती तीन चार दिवसांतच पोहचली पाहिजेत.

<u>**सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे :–**</u> स्पीड पोस्टाने पाठविण्यासाठीचा खर्च प्रती देयक रू.२२/– एवढा आहे व कुरीयरने पाठविण्याचा खर्च रू.१७/– असा असताना तुम्ही स्पीड पोस्टाने देयके का पाठवता?

<u>**उप–आयुक्त (कर) श्री. संतोष देहेरकर:–**</u> मिळकतकराची देयके स्पीड पोस्टानेच पाठविली जातात कारण ती वेळेत न मिळाल्याबददल कोणी कोर्टात गेले तर त्यांस ते देयक किती तारखेस मिळाले आहे हे पोस्टाच्या शिक्क्यानुसार आपण त्यांना दाखवु शकतो.

<u>**सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे :–**</u> स्पीड पोस्टाने पाठवुनसुध्दा एवढा वेळ लागत आहे.

<u>**सदस्य, श्री. सतरामदास जेस्वानी :–**</u> नाहक लोकांना त्रास होत आहे त्यामुळे या विषयावर आंदोलन होईल.

<u>**सदस्य, श्री. राम पारवानी :–**</u> मिळकतकराचे देयक उशीरा प्राप्त झाले असल्यामुळे दंडाची रक्कम आकारली जावू नये.

<u>**काही सदस्य :–**</u>पास–पास......

<u>**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:–**</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ६** :—महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क. 58DO012217400 (Old No. 58/0944) ही नोंद रद्द त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष 2012—13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. **13,888**/— +विलंब शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील **बॅरेक नं. १८९२/रूम नं. १० जवळ, बॅरेक नं. १९११ समोर, सेक्शन ४०, बॅरेक नं. १९११ व १८९२ (भाग) समोर, तळमजला व पहिला मजला, उल्हासनगर—५** या जागेकरीता कर आकारणी पुस्तकात **मालमत्ता क्र. ५८डीओ०१२२२६३०० (जुना क्र. ५८/१०४२)** अन्वये नोंद आहे. परंतु याच जागेची कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ५८डीओ०१२२१७४०० (जुना क्र. ५८/०९४४) नुसार दुबार नोंद असल्याचे दिसुन येते. संदर्भित दोन्ही मिळकतीकरीता कर आकारणी पुस्तकात नमुद असलेल्या बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | मालमत्ता क्र. ५८डीओ०१२२२६३०० (जुना क्र. ५८/१०४२) | मालमत्ता क्र. ५८डीओ ०१२२१७४०० (जुना क्र. ५८/०९४४) | |
|---|---|---|---|---|
| १. | मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: जबाबदार व्यक्तीचे नाव | सुनंदा अशोक पाटील | सुनंदा अ. पाटील | ✓ |
| २. | पत्ता | **बॅरेक नं. १८९२/रूम नं. १० जवळ, बॅरेक नं. १९११ समोर, सेक्शन ४०, बॅरेक नं. १९११ व १८९२ (भाग) समोर, तळमजला व पहिला मजला, उल्हासनगर—५** | **बॅरेक नं. १८९२ सेक्शन ४०, रूम नं. १० जवळ, उल्हासनगर—५** | ✓ |
| ४. | ेजिण ल्मंत | ०१—एप्रिल—८६<br>०१—एप्रिल—०३<br>०१—एप्रिल—०३<br>०१—एप्रिल—०३ | ०१—एप्रिल—८६ | ✓ |
| ५ | क्षेत्रफळ | ४४४ चौ.फुट<br>२०६ चौ.फुट<br>३१ चौ.फुट<br>२०६ चौ.फुट | ३०६ चौ.फुट | ✓ |
| | बांधकाम प्रकार | एसी शिट ब्रिक्स<br>टियर गरडर<br>एसी शिट ब्रिक्स<br>एसी शिट ब्रिक्स | एसी शिट ब्रिक्स | ✓ |
| ६ | वापर | निवासी<br>निवासी<br>निवासी<br>निवासी | निवासी | ✓ |
| ७ | भाडेकरू असल्यास वार्षिक भाडे रक्कम | — | — | |
| ८ | प्रथम कर निर्धारणानंतर मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: जबाबदार व्यक्तींमध्ये बदल झाला असल्यास त्याचा तपशिल (आदेश क्रमांकासह) | — | — | |
| ९ | प्रथम कर निर्धारणानंतर वेळोवेळी सुधारीत कर निर्धारण झाले असल्यास त्याबाबतचा सविस्तर तपशिल (मालमत्ता क्रमांक./निर्धारण वर्ष) | — | — | |
| ९अ | सुधारीत क्षेत्रफळ | — | — | |
| ९ब | सुधारीत बांधकाम प्रकार | — | — | |
| ९क | सुधारीत वापर | — | — | |
| ९ड | सुधारीत कर निर्धारणात भाडेकरू असल्यास वार्षिक भाडे रक्कम | — | — | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | वर्ष २०१२–१३ अखेर मालमत्ता कराची थकीत रक्कम (चालु मागणीसह) | **पावती क्र. २८५५८०, दि. २९/१२/१२, रूपये ११,६८६/– अन्वये वर्ष २०१२–१३ अखेर मालमत्ता कर व पाणीपट्टीची रक्कम महानगरपालिकेत जमा झाली आहे. (पुरवणी बिलासह)** | **रू. ३,०३२/– अधिक विलंब शास्ती** | |
| ११ | वर्ष २०१२–१३ अखेर पाणीपट्टी थकीत रक्कम (चालु मागणीसह) | | **रू. १०,८५६/–** | |
| १२ | एकुण थकीत रक्कम (चालु मागणीसह) | | **रू. १३,८८८/– अधिक विलंब शास्ती** | |
| १३ | मालमत्ता कराचा भरणा केला असल्यास त्याचा तपशिल (पावती क्रमांक, दिनांक, रक्कम) | | प्रथम कर निर्धारणापासुन मालमत्ता कर आकारणी थकीत आहे. | |

**श्रीम. सुनंदा अशोक पाटील बॅरेकनं. १८९२, रूम नं. १० च्या बाजुला, सेक्शन ४०, उल्हासनगर–५ यांनी दिनांक २०/१२/२०१२ रोजीचे अर्जान्वये बॅरेक नं. १८९२ सेक्शन ४०, रूम नं. १० जवळ, उल्हासनगर–५ (मालमत्ता क्र. ५८डीओ०१२२२६३०० (जुना क्र. ५८/१०४२)) या जागेची कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. मालमत्ता क्र. ५८डीओ ०१२२१७४०० (जुना क्र. ५८/०९४४)) अन्वये असलेली दुबार नोंद रद्द करणेसाठी विनंती अर्ज केला आहे.**

विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की,

१) मनपा कर आकारणी पुस्तकात संदर्भित दोन्ही मिळकतींसाठी प्रथम कर निर्धारणादरम्यान मालमत्ता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन सुनंदा अशोक पाटील अशी नोंद असल्याचे दिसुन येते.

२) मनपा कर आकारणी पुस्तकात संदर्भित दोन्ही मिळकतींसाठी नमुद पत्त्यात समानता असल्याचे दिसुन येते.

३) मनपा कर आकारणी पुस्तकात संदर्भित दोन्ही मिळकतींसाठी नमुद असलेल्या करपात्र बाबीत (बांधकाम प्रकार व वापर) समानता असल्याचे दिसुन येते.

४) सद्यस्थितीत प्रत्यक्ष जागेवर **सुनंदा अशोक पाटील** यांचे नावे असलेली **मालमत्ता क्र. ५८डीओ०१२२२६३०० (जुना क्र. ५८/१०४२)** ही अस्तित्वात असुन मनपा कर आकारणी पुस्तकाप्रमाणे नमुद करपात्र बाबी जागेवर आहेत.

५) मालमत्ता क्र. ५८डीओ०१२२२६३०० (जुना क्र. ५८/१०४२) करीता वर्ष २०१२–१३ अखेर पावती क्र. २८५५८०, दि. २९/१२/१२, रूपये ११,६८६/– अन्वये वर्ष २०१२–१३ अखेर मालमत्ता कर व पाणीपट्टीची रक्कम महानगरपालिकेत जमा झाली आहे.

६) तथापि, बॅरेक नं. १८९२ सेक्शन ४०, रूम नं. १० जवळ, उल्हासनगर–५ या जागेकरीता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ५८डीओ ०१२२१७४०० (जुना क्र. ५८/०९४४) अन्वये असलेल्या नोंदीमध्ये प्रथम कर निर्धारणापासुन वर्ष २०१२–१३ अखेर कर आकारणी रक्कम रू. १३,८८८/– अधिक विलंब शास्ती थकीत आहे. मालमत्ता कराची रक्कम भरणा करण्यात येत नाही.

७) उक्त बाबी पाहता बॅरेक नं. १८९२ सेक्शन ४०, रूम नं. १० जवळ, उल्हासनगर–५ (मालमत्ता क्र. ५८डीओ०१२२२६३०० (जुना क्र. ५८/१०४२) या जागेकरीता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ५८डीओ ०१२२१७४०० (जुना क्र. ५८/०९४४) अन्वये असलेली दुबार नोंद रद्द करून मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी थकीत असलेली रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणे आवश्यक आहे, असे इकडील मत आहे.

८)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेसंदर्भात पुढीलप्रमाणे तरतुद आहेत.

**कलम १५२. वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणे**

**आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.**

९) नागरिकांकडुन एक किंवा त्यापेक्षा जास्त नोंदीं असलेल्या मिळकतीसंदर्भात प्राप्त झालेल्या बऱ्याच प्रकणांमध्ये अधिनियमातील कलम १५२ नुसार वसुल न होण्याजोगा कर वेळोवेळी स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करण्यात आला आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता मनपा क्षेत्रातील बॅरेक नं. १८९२ सेक्शन ४०, रूम नं. १० जवळ, उल्हासनगर–५ (मालमत्ता क्र. ५८डीओ०१२२२६३०० (जुना क्र. ५८/१०४२) या जागेकरीता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ५८डीओ ०१२२१७४०० (जुना क्र. ५८/०९४४) ही दुबार नोंद असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मनपा कर आकारणी पुस्तकातील मालमत्ता क्र. ५८डीओ ०१२२१७४०० (जुना क्र. ५८/०९४४) ही नोंद रद्द करून मिळकतीचे खात्यात प्रथम कर निर्धारणापासुन वर्ष २०१२–१३ अखेर थकीत कर आकारणी रक्कम रू. १३,८८८/– अधिक विलंब शास्ती (वसुल न होण्याजोगा कर) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४९ **दिनांक:– १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :– श्री. सतरामदास जेसवाणी

अनुमोदकाचे नाव :– श्रीम. कांचन लुंड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क. 58DO012217400 (Old No. 58/0944) ही नोंद रद्द त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष 2012–13 अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. **13,888**/– +विलंब शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :–** माहे जुन २०१३ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. राम पारवानी :–** स्थायी समितीच्या मागील सभेमध्ये लेखापरिक्षण अहवालावर चर्चा चालू असताना लेखा परिक्षणाचे अहवाल यापुढे वेळेवर आणले जावेत.

**मुख्य लेखा परिक्षक, श्री. सुखदेव बलमे:–** लेखा परिक्षण विभागाकडून नोव्हेंबरपर्यंतचा लेखा परिक्षणाचे अहवाल तयार करण्यात आले आहेत.

**सदस्य, श्री. राम पारवानी :–** आता हे लेखापरिक्षण अहवाल कोणत्या महिन्याचे आहेत. मला वाटते हे माहे जुलै, ऑगस्ट महिन्याचे आहेत.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७ :—** माहे जुन २०१३ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

प्रस्तावना

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे जून, २०१३ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१२—२०१३ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ३६४,१८,३९,००० |
| “ब” | ६,६२,००० |
| “क” | १२९,३९,०३,००० |
| एकूण | ४९३,६४,०४,००० |

**सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.**

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ४१८,१४,२८,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ७९०,७३,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १८,११,२५,००० |
| ५ | एकुण | ४४४,१६,२६,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | २८,२६,००० |
| ७ | एकुण :— | ४४४,४४,५२,००० |

वित्तीय वर्ष २०१२—२०१३ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ४१८,१४,२८,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे जून, २०१३ मध्ये समप्रमाणात रुपये १०४,५३,५७,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये ४९,९६,७९,०००/— (एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ४८ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे जून, २०१३ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष **अर्थ संकल्प “अ”** | | सन २०१२—१३ चे सुधारीत अंदाजित उत्पन्न | माहे जून, २०१३ चे अपेक्षित उत्पन्न | माहे जून, २०१३ पर्यंत प्रत्यक्ष जमा उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात/ एल.बी.टी. | १९२,००,००,००० | ४८,००,००,००० | ३४,१७,३०,००० |
| २ | मालमत्ता कर | ६६,४६,०६,००० | १६,६१,५२,००० | ३,५२,२६,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ५२,१२,००,००० | १३,०३,००,००० | ७,३८,३३,००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १००,००,००० | २५,००,००० | — |
| ५ | रुग्णालय फी | ४,५०,००० | १,१२,००० | ५५,००० |
| ६ | परवाना व इतर फी | ३,६६,००,००० | ९१,५०,००० | ६६,३१,००० |
| ७ | संकीर्ण | २,३१,८५,००० | ५७,९६,००० | २४,५४,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २०,७९,००,००० | ५,१९,७५,००० | १९,२२,००० |
| | **एकूण "अ"** | **३,३८,३९,४१,०००** | ८४,५९,८५,००० | **४६,१८,५१,०००** |
| | **अर्थसंकल्प "ब"** | | | |
| | महसूल उत्पन्न | ६,६२,००० | १,६६,००० | — |
| | **एकूण "ब"** | ६,६२,००० | १,६६,००० | — |
| | **अर्थसंकल्प "क"** | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ४०,००,००,००० | १०,००,००,००० | २,४२,८४,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २५,००,००,००० | ६,२५,००,००० | ४७,९९,००० |
| २ | मालमत्ता कर | १४,५०,००,००० | ३,६२,५०,००० | ७४,८७,००० |
| ३ | परवाना/इतर फी | १६,००,००० | ४,००,००० | ९२,००० |
| ४ | संकीर्ण | २,२५,००० | ५६,००० | ११,६६,००० |
| | **एकुण "क"** | ७९,६८,२५,००० | १९,९२,०६,००० | ३,७८,२८,००० |
| | **एकुण "अ","ब" व "क"** | **४१८,१४,२८,०००** | **१०,४३,५३,५७,०००** | **४९,९६,७९,०००** |

सन २०१०—११च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ४९३,९२,३०,०००/—(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे जून,२०१३ अखेरपर्यंत रू. १४३,५१,४४,०७५/—(प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च—

माहे जून, २०१३ अखेर पर्यंत रु. ८७,९०,९५,८७२/—खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ६१ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे जून ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे—माहे जून, २०१३ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा—यांची निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे)

'निरंक'

**स्थायी समिती ठराव क्र. ५०** **दिनांकः— १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्रीम. चरणजित कौर भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. वसुधा बोडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे जुन २०१३ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** माहे जुलै २०१३ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ८ :—** माहे जुलै २०१३ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

**प्रस्तावना**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे जुलै, २०१३ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१२—२०१३ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ३६४,१८,३९,००० |
| “ब” | ६,६२,००० |
| “क” | १२९,३९,०३,००० |
| एकूण | ४९३,६४,०४,००० |

**सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.**

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ४१८,१४,२८,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ७९०,७३,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १८,११,२५,००० |
| ५ | एकुण | ४४४,१६,२६,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | २८,२६,००० |
| ७ | एकुण :— | ४४४,४४,५२,००० |

वित्तीय वर्ष २०१२—२०१३ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ४१८,१४,२८,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे जुलै, २०१३ मध्ये समप्रमाणात रुपये १३९,३८,०७,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये ६६,१३,७१,०००/— (एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ४७ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे जुलै, २०१३ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष **अर्थ संकल्प "अ"** | | सन २०१२–१३ चे सुधारीत अंदाजित उत्पन | माहे जुलै, २०१३ चे अपेक्षित उत्पन्न | माहे जुलै, २०१३ पर्यंत प्रत्यक्ष जमा उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात | १९२,००,००,००० | ६४,००,००,००० | ४४,९७,८२,००० |
| २ | मालमत्ता कर | ६६,४६,०६,००० | २२,१५,३५,००० | ४,७७,८९,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ५२,१२,००,००० | १७,३७,३३,००० | १०,०७,४४,००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १००,००,००० | ३३,३३,००० | — |
| ५ | रुग्णालय फी | ४,५०,००० | १,५०,००० | ७९,००० |
| ६ | परवाना व इतर फी | ३,६६,००,००० | १२२,००,००० | ७०,९७,००० |
| ७ | संकीर्ण | २,३१,८५,००० | ७७,२८,००० | ५१,२६,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २०,७९,००,००० | ६९३,००,००० | १९,६३,००० |
| | एकूण "अ" | **३,३८,३९,४१,०००** | ११२,७९,७९,००० | **६१,२५,८०,०००** |
| | **अर्थसंकल्प "ब"** | | | |
| | महसूल उत्पन्न | ६,६२,००० | २,२१,००० | — |
| | एकूण "ब" | ६,६२,००० | २,२१,००० | — |
| | **अर्थसंकल्प "क"** | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ४०,००,००,००० | १३,३३,३३,००० | ३,११,२४,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २५,००,००,००० | ८,३३,३३,००० | ५१,८४,००० |
| २ | मालमत्ता कर | १४,५०,००,००० | ४,८३,३३,००० | १,१२,०४,००० |
| ३ | परवाना/इतर फी | १६,००,००० | ५,३३,००० | १,१३,००० |
| ४ | संकीर्ण | २,२५,००० | ७५,००० | ११,६६,००० |
| | एकुण "क" | ७९,६८,२५,००० | २६,५६,०७,००० | ४,८७,९१,००० |
| | एकुण "अ","ब" व "क" | **४१८,१४,२८,०००** | **१३९,३८,०७,०००** | **६६,१३,७१,०००** |

सन २०१०–११च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ४९,३९,२३,०००/–(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे जुलै,२०१३ अखेरपर्यंत रू. १६०,१९,७३,४४०/–(प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च–

माहे जुलै, २०१३ अखेर पर्यंत रु. १११,८२,३७,२५९/–खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ७०टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका–याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे जुलै ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे–माहे जुलै, २०१३ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा–यांची ०६ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे)

'निरंक'

**स्थायी समिती ठराव क्र. ५१** **दिनांक:— १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्रीम. गोदुमल किशनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे जुलै २०१३ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** माधुरी पॅलेस, सदारंगानी अपार्टमेंट व गुरुकृपा मार्केट या तीन इमारतींच्या निष्कासनासाठी मेसर्स एडीफाईस इंजिनिअरींग, अंधेरी यांच्याशी केलेल्या संविदा व खर्चाची माहिती नोंद करणे.

---

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—**या तीन इमारतीच्या निष्कासनाबाबत देयक अदा करण्यात आले आहे का?

**वाहन विभागप्रमुख, श्री. चिमणकारे:—** हो, देयक अदा करण्यात आले आहे.

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—**मग आता हा प्रस्ताव स्थायी समितीपुढे का आणला आहे

**वाहन विभागप्रमुख, श्री. चिमणकारे:—** माहितीसाठी आणला आहे.

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—**आणि तो हि आठ महिन्यांनंतर.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**पैसे पहिले खर्च करत जा आणि नंतर आम्हाला सांगत जा?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवाणी:—**आठ महिने अगोदर पैसे दिले आहेत आणि आता आम्हाला माहिती देण्यासाठी प्रस्ताव आणत आहात, आता आमच्या गळयात का मारता.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**मग म्हणाल कि स्थायी समितीने मान्यता दिली आहे म्हणुन.

**महापालिका सचिव:—** तातडीचे काम असल्यामूळे मा. आयुक्तांच्या मान्यतेने त्या तिन्ही इमारती अत्यंत धोकादायक असल्यामुळे त्या कधीही पडण्याची शक्यता असल्यामुळे निष्कासित करून त्यांचे देयक अदा करण्यात आलेले आहे. आणि हा प्रस्ताव आपल्या माहितीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**आयुक्तांनी मंजूरी दिली होती तर तसे या गोषवा—यामध्ये यायला हवे होते ना?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवाणी:—**मा. आयुक्तांनी मंजुरी दिली होती असे शहर अभियंता यांनी या गोषवा—यामध्ये दोन शब्द लिहायला हवे होते.

**सदस्य, श्री. राम पारवानी :—** तातडीचे काम असल्यामुळे मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे त्यामुळे हा विषय पारित करूया.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ९ :—** माधुरी पॅलेस, सदारंगानी अपार्टमेंट व गुरुकृपा मार्केट या तीन इमारतींच्या निष्कासनासाठी मेसर्स एडीफाईस इंजिनिअरींग, अंधेरी यांच्याशी केलेल्या संविदा व खर्चाची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

दिनांक १५/०६/२०१३ रोजी मा. आयुक्त सो, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या आदेशानुसार वरिल तीन इमारतीची पहाणी सहाय्यक आयुक्त समावेत करण्यात आली सदर तिन्ही इमारती अत्यंत धोकादायक असून कधीही पडण्याच्या अवस्थेत आहे.सदर तीन इमारती मधिल दोन इमारती माधुरी पॅलेस, उल्हासनगर ४ पाच मजली व सदारंगानी अपार्टमेंट, उल्हासनगर ३ चार मजली या दोन इमारतीसाठी High Reach Poclain Machine/Silent Demolition Machine लागणार आहेत.व गुरूकृपा मार्केट दोन मजली ही इमारत Manually तोडावी लागणार आहे.कारण सदर इमारती निष्कशित करण्यासाठी पोकलेन मशिन उभी करण्यासाठी जागा उपलब्ध नाही.

सदर इमारती अंत्यत धोकादायक असून त्या कधीही पडू शकतात.या अनुषंगाने सदर इमारती Demolition करण्यासाठी इमारती Demolition करणारे विशेष तज्ञ कडून दरपत्रके मागविण्यात आले.

सदर तुलनात्मक तक्त्यानुसार न्युनतम ठेकेदार मे. एडीफाईस इंजिनिअरींग, अंधेरी यांनी त्यांचे मशिनने तोडणा—या इमारतीचे म्हणजे माधुरी पॅलेस व सदारंगानी यांचे प्रती तासाचे दर रु. ३५,०००/— एवढे असुन, त्यांचा एकुण खर्च रु.४,६५,०००/— व रु. २,४५,०००/— एवढा आहे. व मशिन ने—आन करण्याचे (Mobilisation & Demobilisation) चे दर रु. ६,००,०००/— एवढे आहेत. तसेच Manually तोडणा—या इमारती म्हणजे गुरुकृपा मार्केटसाठी प्रती तासाचा दर रु. ६५०/— व त्यांचा एकुण खर्च रु.२,०८,०००/— असा आहे. या अनुषंगाने तीनही इमारत तोडण्यासाठी एकुण खर्च रु. १५,०८,०००/— एवढा खर्च होत आहे. सदर ठेकेदाराशी वाटाघाटी करून वरिल तीन इमारत तोडण्यासाठी रू. १४.५० लक्ष एवढया रक्कमेत ठेकेदार तयार झाले व सदर इमारत धोकादायक असल्यामुळे कधीही पडून जीवीत हानी होण्याचा धोका नाकारता येत नाही. सदर प्रस्तावित खर्च हा महानगरपालिकेकडून करून संबधित भूखंडावर मालमत्ता करामध्ये समाविष्ठ करून इमारत निहाय झालेला खर्च बोजा म्हणून घेऊन मालमत्ता करा सोबत वसूल करण्यात येईल.तरी सदर प्रकरण व खर्च मा. स्थायी समितीच्या माहितीसाठी सादर.

तसेच या प्रकारे इतर धोकादायक इमारती तोडण्यासाठी या प्रकारे काम करण्यास मान्यता मिळावी.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५२ **दिनांक:—१७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्रीम. आशा गुप्ता

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोदुमल क्रिशनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माधुरी पॅलेस, सदारंगानी अपार्टमेंट व गुरुकृपा मार्केट या तीन इमारतींच्या निष्कासनासाठी मेसर्स एडीफाईस इंजिनिअरींग, अंधेरी यांच्याशी केलेल्या संविदेची व खर्चाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :—** उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेकामी सुधारीत प्राकलनास मान्यता देणे.

---

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:—**उल्हासनगर कॅम्प नं. ४ व ५ मधील रस्त्यांवरील खडड्े भरतच नाहीत. कॅम्प नं. ४,५ मधील रहिवाशांशी आपले काही वैर आहे का? किंवा तो भाग उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात येत नाही का?

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—**हा जो गोषवारा दिला आहे त्यावर ना जावक क्रमांक आहे ना दिनांक आहे, संबंधित विभाग किती बेजबाबदार आहे स्थायी समितीच्या मागील सभेत रस्त्यांवरील खडड्े भरण्याच्या प्रस्तावावर चर्चा चालू असताना ज्या रस्त्यांवरील खडड्े भरलेले नाहीत अशा रस्त्यांची नावे समाविष्ट केली होती ती नावे या प्रस्तावामध्ये दिसुन येत नाहीत. कोणकोणत्या रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम राहून गेले आहे ते लिहावयास पाहिजे होते ना.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवाणी:—**रस्त्यांची यादी दिलेली आहे परंतु प्रत्यक्षात काम झालेले नाही.

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—**याबाबत संबंधित अधिका—यांना बोलू दया हे शहराचे काम आहे. आम्ही सांगतो कि या रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम झाले पाहिजे परंतु ते होत नाही.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:—**उल्हासनगर कॅम्प नं. ४ व ५ हे महापालिका क्षेत्रात येत नाही का?

**सदस्य, श्री. जयेंद्र मोरे:—** उल्हासनगर कॅम्प नं. ५ मधील खडड्े भरण्याची कार्यवाही फक्त कागदपत्रावरच दिसुन येते परंतु प्रत्यक्षात काम मात्र होत नाही.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:—** स्थायी समितीच्या मागील सभेत रस्त्यांवरील खडड्े भरण्याच्या प्रस्तावामध्ये ज्या रस्त्यांवरील खडड्े भरलेले नाहीत अशा रस्त्यांची नावे समाविष्ट केली होती त्यामधील रस्त्यांचे काम का झाले नाही याबाबत आधी सांगावे.

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—**हा प्रस्ताव पुढे ढकलला पाहिजे, रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे किती काम झाले आहे, किती काम बाकी आहे याची सविस्तर माहिती मिळाली पाहिजे.

**प्र. शहर अभियंता, श्री. रमेश शिर्के:—** मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम केले होते त्यामध्ये प्रस्तावित केलेल्या कामात वाढ झाल्यामुळे खर्चाच्या रक्कमेतदेखील वाढ झाली होती. आता रू. ५६ लाखाचे काम बाकी आहे त्यासाठी हा सुधारीत प्रस्ताव आणला आहे. डांबरीकरणाचे काम झाले आहे पृष्ठांकनाचे काम बाकी आहे.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:—** डांबरीकरणाचे काम कुठे झाले आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवाणी:—**डांबरीकरणाचे काम झालेलेच नाही तर मग पृष्ठांकन कोणत्या रस्त्यांचे कराल.

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—**आम्हाला माहित पडले पाहिजे कोणकोणत्या रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम झाले आहे. या अगोदर रस्त्यांवरील खडड्े भरण्याच्या ज्या यादीस आपण मान्यता दिली ती कुठे आहे.

**सदस्य, श्री. राम पारवानी :—** ज्या रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम झाले आहे त्यांची यादी मिळेल ना?

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—**ज्या रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम झाले पाहिजे अशा रस्त्यांची स्थायी समिती सदस्य जी यादी देतात त्यानुसार काम होत नाही आणि नंतर म्हणता कि, रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे

काम वाढले आहे त्यामुळे वाढीव खर्चाचा प्रस्ताव मंजुरीस आणला आहे. मग वाढीव काम कुणाचे केले व कुणाच्या मंजुरीने केले आहे.

**सदस्य, श्री. राम पारवानी :—** जरूर, कोणत्यातरी नगरसेवकाचेच काम केले असेल ना.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवाणी:—**आयुक्त साहेब, महासभेत सांगतात कि रस्त्यांवरील खडड्‌े भरण्याचे रू.८० लाखाचे काम झाले आहे. रू. ९० लाखाचे काम अद्याप झालेले नाही आणि आता हे म्हणतात कि, ५६ लाखाचे अतिरिक्त काम आहे.

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—**ज्या रस्त्यांवरील खडड्‌े भरण्याचे काम झालेले नाही, असे स्थायी समिती सदस्यांनी यापुर्वी यादी दिली आहे ती कामे झाली पाहिजेत.

**सदस्य, श्री. राम पारवानी:—**रू. तीन कोटी खर्चाच्या कामांचा प्रस्ताव येणार आहे त्यामध्ये ज्यांचे काम झालेले नाही ते समाविष्ट केले जाईल असे सभापती महोदयांनी आताच आपणांस सांगितले आहेच ना.

**सदस्य, श्री. जयेंद्र मोरे :—**रस्त्यांवरील खडड्‌े भरण्याचे काम जर होणार असेल तर...

**काही सदस्य :—**पास, पास.......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १० :—**उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेकामी सुधारीत प्राकलनास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरामध्ये असलेल्या डांबरी रस्त्यांची दरवर्षी पावसाळयामध्ये व पावसाळयानंतर दुरूस्ती करण्यात येते उल्हासनगर शहरामधील बहुतांशी रस्त्यांमधील खड्डे मागील वर्षी भरण्यात आलेले आहेत. परंतू दुतर्फा नाल्यांचा अभाव तसेच अस्तित्वात असलेल्या नाल्यांची सफाई न झाल्यामुळे पावसाळयात रस्त्यावर पाणी तुंबून डांबरी पृष्ठभाग खराब होऊन खड्डे पडतात. खराब झालेल्या रस्त्यांची यादी तयार करून त्यामधील खड्डे भरणेकामी सविस्तर प्राकलने तयार करण्यात आलेली होती. प्रभाग क्षेत्र निहाय सदर कामाचे प्राकलनीय खर्च काढण्यात आलेला होता.

प्रभाग क्षेत्र १ :— रू. ५०.४३ लक्ष
प्रभाग क्षेत्र २ :— रू. ६३.९७ लक्ष
प्रभाग क्षेत्र ३ :— रू. १२.६७ लक्ष
प्रभाग क्षेत्र ४ :— रू. १९७.३८ लक्ष

**एकूण रू. ३२४.४४ लक्ष**

उपरोक्त खर्च उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१२—१३ च्या अर्थ सकल्पातील लेखाशिर्षात ‘अ’ अंदाजपत्रक भाग —१ क ५ (II) ‘रस्ते दुरूस्ती’ या लेखाशिर्षामधील रू. ३००.०० लक्ष तरतूदी मधून करणे अभिप्रेत होते. या तरतूदीमधून मागील वर्षीचे दायित्व पाहता रू.१५१ लक्ष वजा जाता शिल्लक राहणा—या रू. १४९.०० लक्ष मध्ये ‘अ’ अंदाजपत्रक भाग—२ (सिमेंट कॉक्रीट रस्ते बांधणे) या लेखाशिर्षातील रू.५०.०० लक्ष तरतुद वळवून अशा प्रकारे उपलब्ध होणा—या (रू. १४९+५० = १९९) तरतुदी मधून खालीलप्रमाणे प्रभाग क्षेत्र निहाय कामाची प्राकलने तयार करण्यात आली होती.

प्रभाग क्षेत्र १ :— रू. ५०.४३ लक्ष
प्रभाग क्षेत्र २ :— रू. ६३.९७ लक्ष
प्रभाग क्षेत्र ३ :— रू. १२.६७ लक्ष
प्रभाग क्षेत्र ४ :— रू. ७२.८८ लक्ष

**एकूण रू. १९९.९५ लक्ष**

प्रभागक्षेत्र निहाय या चारही कामांची निविदा कार्यवाही करण्यात आली. सदर निविदा कार्यवाहीमध्ये सर्वात कमी दराची मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांच्या निम्न दराच्या निविदा प्राप्त झाल्यानंतर त्यांचेशी वाटाघाटी अंती त्यांनी निविदेत भरलेले दर कमी करून प्राकलनिय दर व स्टार रेट अदा करण्यास मा. स्थायी समिती ठराव क्र.२३, दि.१५/९/२०१२ नुसार मान्यता दिल्यांनंतर चारही कामांचे कार्यरिंभ दि. १८/९/२०१२ निर्गमित करण्यात आले होते.

मूळ प्राकलन तयार करतांना गृहीत धरलेल्या रस्त्यांच्या संख्येत पावसाळयानंतर वाढ झाल्याने व नगरसेवक, पदाधिकारी यांनी मागणी केलेल्या व जागोजागी पडलेल्या खड्डयामुळे रस्त्यांच्या वाहतुकीस बाधा येवू नये याकरिता रस्त्यांवर बी. एम. ने खड्डे भरून घेतले आहेत. त्यामुळे सदर रस्त्यांवर ए. सी. करून रस्ते सुस्थितीत राखण`आवश्यक आहे. जेणेकरून बी.एम.ने. खड्डे भरलेले रस्ते पुन्हा त्यांच ठिकाणी उखडणार नाहीत. या वाढीव कामासाठी मूळ चार प्रभाग क्षेत्र १ ते ४ प्राकलने सुधारित केल्यानंतर या कामावरील खर्च खालीलप्रमाणे होत आहे.

| | सुधारित प्राकलन | मूळ प्राकलन | होणारी वजा |
|---|---|---|---|
| प्रभाग क्षेत्र १ :— | रू. ५०.४३ लक्ष | ५०.४३ | —— |
| प्रभाग क्षेत्र २ :— | रू. ७७.५६ लक्ष | ६३.९७ | १३.५९ |
| प्रभाग क्षेत्र ३ :— | रू. २५.८८ लक्ष | १२.८७ | १३.०१ |
| प्रभाग क्षेत्र ४ :— | रू. १०३.१९ लक्ष | ७२.८८ | ३०.३१ |
| **एकूण** | **रू. २५६.५९ लक्ष** | **१९९.९५** | **५६.९१** |

मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांनी केलेल्या कामा प्रित्यर्थ आतापर्यंत अदा केलेले देयक रू. ४०.२१ लक्ष वजा जाता सुधारित प्रकलनप्रमाणे रू.२१६.३८ लक्ष इतका खर्च होणारे आहे. या खर्चासाठी अभिप्रेत लेखाशिर्ष अ—अंदाजपत्रक भाग—१ क—५ (II) या लेखाशिर्षाअंतर्गत वर्ष २०१३—१४ अंदाजपत्रकात रू.६.०० कोटी तरतुद आहे. या तरतुदी मध्ये मागील दायित्व सांबावि मधील देयके व लेखा विभागातील देयके यावरील खर्च रू.४१३.२४ लक्ष वजा जाता रू.१८७.०० लक्ष तरतुद उपलब्ध रहात आहे. त्यामध्ये उपरोक्त मुळ खर्च रू.१९९.९५ समाविष्ट आहे.

तरी वाढीव खर्च रू.५६.९१ लक्ष एकूण रक्कम रू.२५६.५९ लक्ष खर्चाच्या सुधारित प्राकलनास मा. स्थायी समिती कडुन मान्यता मिळणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५२(१) **दिनांक:— १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्रीमती कांचन लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेकामी वाढीव खर्च रु. ५६.९१ लक्ष एकूण रक्कम २५६.५९ लाख खर्चाच्या सुधारीत प्राकलनास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११** :— पॉवर स्विपींग मशिनद्वारे रस्ते सफाई कामी कार्यरत ठेकेदार मे. के. एल.इन्व्हीटेक प्रा.ली. यांचे नोव्हेंबर २०११ ते माहे मे २०१२ या कालावधीतील देयकातुन मुल्यांकन अंती येणारी रक्कम रुपये ६८,१५,७०९/— अदा करण्यास मान्यता देणे.

---

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**पॉवर स्विपिंग मशिनद्वारे करण्यात आलेल्या रस्ते सफाईचे देयक अदा करण्यास मान्यता देवू नये.

**सदस्य, श्री. राम पारवानी:—**देयक आतापर्यंत थांबवून ठेवण्याचे कारण काय?

**उप—आयुक्त (आरोग्य), श्री. संतोष देहेरकर:—** नोव्हेंबर, २०११ ते मे, २०१२ या कालावधीतील देयकांवर तत्कालीन उप—आयुक्त यांनी स्वाक्षरी केली नसल्याने व विधी विभागचे अभिप्राय अप्राप्त असल्याने सदरची देयके प्रलंबित होती. तसेच पॉवर स्विपिंग मशिनबाबत ब—याचशा तक्रारीसुध्दा होत्या.

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—**सन २०११ चे हे प्रकरण आहे. याबाबत विधी विभागाकडून अभिप्राय मागविला होता. पॉवर स्विपिंग मशिन असलेली गाडी सद्या काम न करता अशीच उभी आहे.

**सदस्य, डॉ. महेश गावडे:—**दोन दोन वर्ष पॉवर स्विपिंग मशिन चालत नाही तर त्याचा ठेका रदद् का करत नाही.

**सदस्य, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:—** त्यांस स्थायी समितीने मंजूरी न देता महासभेपुढे पाठविले जावे, सर्व सदस्यांना माहित होवु दया. आमचा यामध्ये विरोध आहे. तशी हि प्रशासकिय बाब आहे. याविषयी विधी विभागाकडून मुंबई उच्च न्यायालयाचे वकील श्री. किशोर हेमराजानी यांचे दिनांक १६/१०/२०१२ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे ते या गोषवा—यासोबत जोडलेले आहे. सदर पत्रातील शेवटच्या परिच्छेदामध्ये कायदेशीर मत व्यक्त केलेले आहे परंतु त्यामध्ये स्पष्ठता नाही. त्यांस एक वर्ष होवुन गेले आहे ते वाचून पहा.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवाणी:—** चार्ली साहेब, तुम्ही तर जुने आहात, आम्ही नविन आहोत त्यामुळे आम्ही या प्रस्तावास मंजूरी देण्याचे काम करणार नाही.

**सदस्य, श्री. राम पारवानी:—**हा प्रस्ताव पुढे ढकलण्यात यावा, पुढील सभेत याविषयीची सविस्तर माहिती दया.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**हा प्रस्ताव पुढे का ढकलता तो नाकारण्यात यावा.

**काही सदस्य :—**हा प्रस्ताव_वगळण्यात यावा.

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ११** :— पॉवर स्विपींग मशिनद्वारे रस्ते सफाई कामी कार्यरत ठेकेदार मे. के. एल.इन्व्हीटेक प्रा.ली. यांचे नोव्हेंबर २०११ ते माहे मे २०१२ या कालावधीतील देयकातुन मुल्यांकन अंती येणारी रक्कम रुपये ६८,१५,७०९/— अदा करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

_उल्हासनगर शहरातील नेमूण दिलेली २५ किलोमीटर रस्ते पॉवर स्विपींग मशिनद्वारे सफाई करण्याचे काम कार्यालयीन आदेश क्र. उमपा/आरोग्य विभाग/उप—आ/१९६ दिनांक २४/८/२००९ अन्वये देण्यात आले आहे. त्यानुसार सदरचा ठेकेदारास दिवस व रात्रपाळीत निविदेतील अटी व शर्तीनुसार काम करणे बंधनकारक आहे. शहरातील बरेचसे रस्ते वारंवार खोदलेले असल्यामुळे वेळोवेळी प्राप्त झालेल्या महापालीका पदाधीका—यांच्या तक्रारीअन्वये शहरात जलवाहिण्या टाकण्याचे काम सुरु असल्याने व पावसामुळे रस्त्यावर जागोजागी खड्डे असल्याने सध्या पावर

स्विपिंग मशिन बंद ठेवण्याबाबत कळविले होते. त्यानुसार विधी विभागाचे अभिप्राय घेवून संबंधीत ठेकेदारास जा.क्र.उमपा/उप—आ/आवि/३४६/११ दि. ११/१/११ अन्वये मे. के. एल. इन्व्हीटेक कंपनीस नोटिस बजावण्यात आलेली होती.

तद्नंतर माहे एप्रिल २०११ मध्ये सुध्दा खोदलेल्या रस्त्यांमुळे तसेच काही ठिकाणी रोडवर गाडयांची पार्किंग असल्यामुळे वाहनांच्या खालील कच—याची सफाई केली जात नाही तसेच पॉवर स्विपींग मशिनची गाडी नादुरुस्त झाल्यास सफाई केली जात नाही. तसचे ज्या रोडवर ठेकेदारांचे सफाई कामगार गैरहजर असतील तेव्हा तेथे सफाई केली जात नाही. त्यामुळे दिवसपाळीत मनुष्य बळाद्वारे सदर रस्त्यांची निगरानी ठेवून रस्त्याचे फुटपाथ व डिव्हायडर सफाई करणे आवश्यक आहे. तसेच महापालीका पदाधीकारी व सदस्य यांच्या तक्रारीनुसार काम व्यवस्थित केले जात नसल्याने लेखी तक्रारी केलेली आहेत. तसेच दि. १७/९/२०११ रोजी महापालिकेच्या महासभेत सन्माननिय नगरसेवक व नगरसेविका यांनी पॉवर स्विपींग मशिनद्वारे होणारी सफाई व्यवस्थित होत नसल्याबाबत महासभेच्या चर्चेत आणून देण्यात आले होते. त्याच प्रमाणे शहरात विविध ठिकाणी जेएनएनयुआरएम अंतर्गत पाण्याच्या पाईप लाईन टाकणे व सिमेंटचे रस्ते बनविण्याची कामे गेल्या वर्षभरापासुन सुरु होते. त्यामुळे ठेकेदाराचे काम प्रभाविपणे होत नसल्याचे दिसून आले होते. त्यानुसार निविदेतील अटी शर्तीनुसार ठेकेदारा विरुध्द योग्य ती कारवाई करण्यासाठी दिनांक २६/८/२०११ रोजी मार्गदर्शन/अभिप्रायासाठी सदरचा प्रस्ताव विधी विभागाकडे पाठविण्यात आलेला होता. सदर प्रस्तावाबाबत विधि विभागाकडून दिनांक १७/१०/२०१२ रोजी अभिप्राय प्राप्त झाले आहेत. सदर अभिप्रायानुसार महापालिकेने ठेकेदाराचे देयक अदा केलेले नाहीत. ठेकेदार निविदेतील अटी व शर्तीनुसार काम करीत असल्याने महापालीकेने त्यांची देयके अदा करणे आवश्यक आहे. संबंधीत अधिका—याने केलेल्या कामाच्या मुल्यांकनात सर्व मुद्दे समाविष्ट आहेत. तसेच महापालीकेने ठेकेदाराने वेळोवेळी दिलेल्या पत्रात उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत कार्यवाही करण्याचे प्रयत्न केलेले नाहीत. त्यामुळे जी कारणे उपस्थित केलेली आहेत त्यानुसार ठेकेदाराचा ठेका रद्द करणे शक्य नसल्याचे नमुद केले आहे. सोबत वकीलांच्या अभिप्रायाची प्रत सोबत जोडून सादर.

तसेच मे. के. एल. इन्व्हीटेक प्रा. ली. यांचे दिनांक ६/१०/२०१२ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर पत्रानुसार एकुण १,१०,३७,४५०/— रक्कमेची देयके प्रलंबीत असून रक्कम न मिळाल्याने व स्विपींग मशीनसाठी मोठया प्रमाणावर डिझेल लागत असल्याने त्यासाठी निधी उपलब्ध नाही. त्यामुळे दिनांक ४/१०/२०१२ पासुन पावर स्विपींग मशिनद्वारे रस्ते सफाईचे काम बंद करीत असल्याचे नमुद केले आहे. तद्नंतर दिनांक १७/१०/२०१२ पासुन काम सुरु केले. तसेच सदर पत्राद्वारे थकीत बिलाची रक्कम त्वरीत मिळावी जेणे करुन काम सुरु करता येईल अशी विनंती केली आहे. त्याच प्रमाणे पत्र क्र. ८/१२—१३ दि. ११/९/२०१२ व पत्र क्र. ९/१२—१३ दि. २६/९/२०१२ रोजीच्या पत्रान्वये ठेकेदाराने थकीत देयकांबाबत योग्य ती कार्यवाही करण्यास विनंती केलेली आहे.

ठेकेदाराच्या देयकाबाबत सादर करण्यात येत आहे की, शहरात विविध ठिकाणी जेएनएनयुआरएम अंतर्गत पाण्याच्या पाईप लाईन टाकणे व सिमेंटचे रस्ते बणविण्याची कामे गेल्या वर्षभरापासुन सुरु होते. त्यानुसार संबंधीत स्वच्छता निरिक्षक यांनी ठेकेदाराने केलेल्या कामानुसार त्यांच्या कामाचे मुल्यांकन करुन अहवाल सादर केलेली आहेत. आरोग्य विभागाकडे प्राप्त झालेल्या देयकांचा तपाशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्रं. | कालावधी | कार्यालयास बिल प्राप्त झालेचा दिनांक | देयक रक्कम | केलेल्या कामाची टक्केवारी | मुल्यांकना अंती देयक कपात | देयक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १/११/२०११ ते १५/११/२०११ | ५/१/१२ | ५३१०९३ | ९१.२५ | ४६५५५ | ४८४५३८ |
| २ | १६/११/२०११ ते ३१/११/२०११ | | ५३१०९३ | ९१.९० | ४३१०४ | ४८७९८९ |
| ३ | १/१२/२०११ ते १५/१२/२०११ | | ५३१०९३ | ८९.७२ | ५४६८० | ४७६४१३ |
| ४ | १६/१२/२०११ ते ३१/१२/२०११ | | ५६६५०० | ५८.३२ | २३६१७६ | ३३०३२४ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | १/१/२०१२ ते १५/१/२०१२ | २०/४/१२ | ५४७०२४ | ८६.४० | ७४६३२ | ४७२३९२ |
| ६ | १६/१/२०१२ ते ३१/१२/२०१२ | | ५८३४९२ | ८९.१० | ६३८६१ | ५१९६३१ |
| ७ | १/२/२०१२ ते १५/२/२०१२ | | ५४७०२४ | ९१.६० | ४६२०१ | ५००८२३ |
| ८ | १६/२/२०१२ ते २९/२/२०१२ | | ५१०५५६ | ९२.४४ | ३८८३५ | ४७१७२१ |
| ९ | १/३/२०१२ ते १५/३/२०१२ | २/८/१२ | ५४७०२३ | ९४.५३ | ३०१८१ | ५१६८४२ |
| १० | १६/३/२०१२ ते ३१/३/२०१२ | | ५८३४९२ | ९३.५० | ३७९०८ | ५४५९२९ |
| ११ | १/४/२०१२ ते १५/४/२०१२ | | ५४७०२३ | ९०.८० | ५०५७४ | ४९६४४९ |
| १२ | १६/४/२०१२ ते ३०/४/२०१२ | | ५४७०२३ | ९२.६९ | ४०२४० | ५०६७८३ |
| १३ | १/५/२०१२ ते १५/५/२०१२ | २/८/१२ | ५४७०२३ | ९० | ५४९४८ | ४९२०७५ |
| १४ | १६/५/२०१२ ते ३१/५/२०१२ | | ५८३४९२ | ८८.१० | ६९६९२ | ५१३८०० |
| १५ | १/६/२०१२ ते १५/६/२०१२ | | ५४७०२३ | ९१ | ४९४८१ | ४९७५४२ |
| १६ | १६/६/२०१२ ते ३०/६/२०१२ | | ५४७०२३ | ९२.८० | ५०५७४ | ४९६४४९ |
| १७ | १/७/२०१२ ते १५/७/२०१२ | | ५४७०२३ | ९५.५३ | २४७१३ | ५२२३१० |
| १८ | १६/७/२०१२ ते ३१/७/२०१२ | १२/१०/१२ | ५८३४९२ | ९६ | २३४९२ | ५६०००० |
| १९ | १/८/२०१२ ते १५/८/२०१२ | | ५४७०२३ | ९७ | १७७६७ | ५२९२५६ |
| २० | १६/८/२०१२ ते ३१/८/२०१२ | | ५८३४९२ | ९६ | २३४९२ | ५६०००० |
| २१ | १/९/२०१२ ते १५/९/२०१२ | | ५४७०२३ | ९४.२० | ३१९८५ | ५१५०३८ |
| २२ | १६/९/२०१२ ते ३०/९/२०१२ | | ५४७०२३ | ९६.०५ | २२०२३ | ५२५००० |

मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ६/११/२०१२ रोजीच्या निर्देशानुसार विभागाने माहे जून ते माहे सप्टेंबर २०१२ या कालावधीतील बिलातून क्षेत्रिय अधिकारी यांनी केलेली मुल्यांकन करुन येणा—या देयकांच्या ५० टक्के रक्कम रुपये २१,०२,७९७/— मात्र अदा करण्यासाठी लेखा विभागास सादर केलेली आहेत.

माहे नोव्हेंबर २०११ ते माहे मे २०१२ रोजीचे कालावधीतील देयकांवार तात्कालीन उपायुक्त यांनी स्वाक्षरी केली नसल्याने व विधि विभागाचे अभिप्राय अप्रताप्त असल्याने सदरची देयके प्रलंबीत होती.

| अ. क्रं. | कालावधी | कार्यालयास बिल प्राप्त झालेचा दिनांक | देयक रक्कम | केलेल्या कामाची टक्केवारी | मुल्यांकना अंती देयक कपात | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १/११/२०११ ते १५/११/२०११ | ५/१/१२ | ५३१०९३ | ९१.२५ | ४६५५५ | ४८४५३८ |
| २ | १६/११/२०११ ते | | ५३१०९३ | ९१.९० | ४३१०४ | ४८७९८९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३१/११/२०११ | | | | | |
| ३ | १/१२/२०११ ते १५/१२/२०११ | | ५३१०९३ | ८९.७२ | ५४६८० | ४७६४१३ |
| ४ | १६/१२/२०११ ते ३१/१२/२०११ | | ५६६५०० | ५८.३२ | २३६१७६ | ३३०३२४ |
| ५ | १/१/२०१२ ते १५/१/२०१२ | २०/४/१२ | ५४७०२४ | ८६.४० | ७४६३२ | ४७२३९२ |
| ६ | १६/१/२०१२ ते ३१/१२/२०१२ | | ५८३४९२ | ८९.१० | ६३८६१ | ५१९६३१ |
| ७ | १/२/२०१२ ते १५/२/२०१२ | | ५४७०२४ | ९१.६० | ४६२०१ | ५००८२३ |
| ८ | १६/२/२०१२ ते २९/२/२०१२ | | ५१०५५६ | ९२.४४ | ३८८३५ | ४७१७२१ |
| ९ | १/३/२०१२ ते १५/३/२०१२ | २/८/१२ | ५४७०२३ | ९४.५३ | ३०१८१ | ५१६८४२ |
| १० | १६/३/२०१२ ते ३१/३/२०१२ | | ५८३४९२ | ९३.५० | ३७९०८ | ५४५९२९ |
| ११ | १/४/२०१२ ते १५/४/२०१२ | | ५४७०२३ | ९०.८० | ५०५७४ | ४९६४४९ |
| १२ | १६/४/२०१२ ते ३०/४/२०१२ | | ५४७०२३ | ९२.६९ | ४०२४० | ५०६७८३ |
| १३ | १/५/२०१२ ते १५/५/२०१२ | २/८/१२ | ५४७०२३ | ९० | ५४९४८ | ४९२०७५ |
| १४ | १६/५/२०१२ ते ३१/५/२०१२ | | ५८३४९२ | ८८.१० | ६९६९२ | ५१३८०० |
| | | | ७७०२९५१ | | ८८७५८७ | ६८१५७०९ |

तरी माहे नोव्हेंबर २०११ ते माहे मे २०१२ रोजीचे प्राप्त बिलानुसार, मुल्यांकन अंती येणारी रक्कम रुपये ६८,१५,७०९/— (रुपये सदुसष्ट लाख पंधरा हजार सातशे नऊ मात्र) अदायगीसाठी मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीस सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ५२ अ** **दिनांक:— २७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकूर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पॉवर स्विपींग मशिनद्वारे रस्ते सफाई कामी कार्यरत ठेकेदार मे. के. एल. इन्व्हीटेक प्रा.ली. यांचे नोव्हेंबर २०११ ते माहे मे २०१२ या कालावधीतील देयकातुन मुल्यांकन अंती येणारी रक्कम रुपये ६८,१५,७०९/— अदा करण्याचा प्रस्ताव या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

**विषय क्र. १२ :—** भांडार विभागासाठी एका लेखाशिर्षांतुन दुस—या लेखाशिर्षात रक्कम समायोजित करण्यास मान्यता देणे.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**भांडार विभागात काय काय सामान असते, गेल्या सहा महिन्यांपासुन मागणी केलेले काही सामान मिळत नाही.

**भांडार विभागप्रमुख, श्री. भगवान कुमावत:—** भांडार विभागात स्टेशनरी व इतर काही सामान असते.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**भांडार विभागातून स्टेशनरी मिळते का?

**भांडार विभागप्रमुख, श्री. भगवान कुमावत:—** स्टेशनरी पुरवठा करण्याबाबत निवीदा काढली होती परंतु त्यामध्ये मध्यंतरी काही अडचणी निर्माण झाल्या होत्या.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**दरवर्षीच आम्हाला स्टेशनरी मिळत नाही आणि हा विषय नेमका काय आहे ते आम्हाला कळले नाही तर आम्हाला जरा समजून सांगा.

**महापालिका सचिव:—** भांडार विभागामधीलच एका लेखाशिर्षामधुन दुस—या लेखाशिर्षामध्ये निधी समायोजित करावयाचा आहे.

**भांडार विभागप्रमुख, श्री. भगवान कुमावत:—** भांडार विभागाच्या AB A.3 (2) AB A.3 (4) या लेखाशिर्षामध्ये निधी समायोजित करावयाचा आहे. हे दोन्ही लेखाशिर्ष एका विभागाचे आहेत. फर्निचरच्या लेखाशिर्षामध्ये पुरेसा निधी शिल्लक नसल्यामुळे क्रिडा साहित्यासाठीच्या लेखाशिर्षामधून निधी समायोजित करावयाचा आहे.

**काही सदस्य :—**हा विषय वगळयात यावा.

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १२ :—** भांडार विभागासाठी एका लेखाशिर्षांतुन दुस—या लेखाशिर्षात रक्कम समायोजित करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेने वर्ष २०१३—१४ चे अंदाजपत्रकात विविध विभागासाठी त्यांचे कार्य व कर्तव्ये पार पाडण्यासाठी लेखाशिर्षानिहाय तरतूद केलेली आहे. त्यानुषंगाने भांडार विभागासाठीही लेखाशिर्षानिहाय तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु खाली दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्षांतर्गत करण्यात आलेली तरतुद संपृष्टात आली असल्याने दुस—या शिल्लक असलेल्या लेखाशिर्षातुन पुढीलप्रमाणे हस्तांतरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | ज्या लेखाशिर्षात रक्कम वर्ग करावयाची आहे. | ज्या लेखाशिर्षातून रक्कम वर्ग करावयाची आहे. | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | AB A-3 (2) | E-(22) | 25,00,000/- |
| २ | AB A-3(4) | E-9 | 5,00,000/- |

तरी वरीलप्रमाणे रक्कम हस्तांतरणी करण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर ठेवणेसाठी मंजुरी मिळावी ही विनंती.

**स्थायी समिती ठराव क्र. ५२ ब** दिनांक:—१७/१२/२०१३

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवाणी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे भांडार विभागासाठी एका लेखाशिर्षातुन दुस—या लेखाशिर्षात रक्कम समायोजित करण्याचा प्रस्ताव या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३—१४ च्या अर्थसंकल्पामध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग—२ क—४ (१५) उप महापौर निधी या लेखाशिर्षात डांबरीकरणाने रस्ते बांधणे लेखाशिर्षातील तरतुद वर्ग करुन लेखाशिर्षांतर्गत तरतुदीच्या समायोजनेस मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणी:—** हा विषय नेमका काय आहे त्याबाबत हिंदीमध्ये स्पष्ठीकरण करा.

**सदस्या, श्रीम. कांचन लुंड:—** हा विषय हिंदीमध्ये समजावून सांगा ना.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**विषय क्र. १३, १४ व १५ हे एकसारखेच आहेत, रस्त्यांची कामे झाली नाहीत. म्हणुन हे प्रस्ताव आलेले आहेत. त्यासाठी अगोदर आमच्या निधीतील कामांचे प्रस्ताव मंजूरीस येवु दया. त्यानंतरच यांना मंजूरी दया नाहीतर महापौर, उपमहापौर व सभापती, स्थायी समिती हे आपले निधी घेतील आणि आम्ही तसेच राहू.

**सदस्य, श्री. राम पारवानी:—**मा. महापौर, उपमहापौर व सभापती, स्थायी समिती यांच्यासाठी वर्ष २०१२—१३ मध्ये मंजूर केलेला निधी त्यांनी पुर्णपणे वापरलेला नाही मग त्यांनी न वापरलेला निधी गेला कुठे?

**प्र. शहर अभियंता, श्री. रमेश शिर्के :—** मागील वर्षी या निधींमधून काहीच कामे झाली नव्हती. तसेच दोन तीन वर्षापासून तरतुद केलेल्या निधीतून सन २०१२—१३ मध्ये उपमहापौर निधीमध्ये रू. ५० लाखाची तरतुद करण्यात आली होती. त्यातील रू.४८ लाखाची तरतुद वापरली असून रू.२ लाखाची तरतुद वापरली नाही सन २०१३—१४ साठी रू.७५ लाखाची तरतुद करण्यात आलेली हि रक्कम अद्यापपर्यंत खर्च करण्यात आलेली नाही त्यामुळे या दोन्ही वर्षाची जवळजवळ रू.७७ लाख एवढी न वापरलेली तरतुद शिल्लक आहे. स्थायी समिती सभापती निधीत तरतुद करण्यात आलेल्या रू.५० लाखाच्या तरतुदीमधून रू. ६.५० लाखाची तरतुद वापरण्यात आली आहे. रू.४३.५० लाखाची तरतुद वापरलेली नाही. सन २०१३—१४ साठी रू.७५ लाखाची तरतुद करण्यात आली होती त्यातील रू.२० लाखाची वापरली असून रू.५५ लाखाची तरतूद न वापरता शिल्लक आहे अशी दोन वर्षाची एकूण रू.९८.५० लाख एवढी न वापरलेली तरतुद शिल्लक आहे.
याचबरोबर महापौर निधीत सन २०१२—१३ साठी तरतुद करण्यात आलेली रू.१०० लाखाच्या निधीपैकी रू. ५१.५० लाख एवढा निधी वापरला असुन रू.४९.५० लाखाचा निधी वापरण्यात आलेला नाही. सन २०१३—१४ साठी रू.१२५ लाख तरतुद करण्यात आली होती त्यातील रू.५१.५० लाख तरतुद वापरण्यात आली असून रू.७३.५० लाख एवढी तरतूद शिल्लक आहे आणि दोन्ही वर्षाची मिळून रू.१२३ लाख एवढी न वापरलेली तरतुद शिल्लक आहे. या निधींमधून डांबरीकरणाने रस्ते बांधण्याचे प्रस्तावित केले आहे. रस्त्यांसाठी रू. २० कोटींची जी तरतुद ठेवली होती. त्यातील रू.१ कोटी यासाठी खर्च करावयाचे आहेत.

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—**रस्त्यांसाठीचे जे रू.२० कोटी होते त्यातील रू.१९ कोटी कुठे जातील, आमचा जो नगरसेवक निधी आहे, प्रभागसमिती निधी आहे त्याचे काय?

**सदस्य, श्री. राम पारवानी:—**आम्ही आयुक्त साहेबांना सांगितले होते कि, सर्वांना नगरसेवक निधी दया. त्यावर आयुक्त साहेबांनी सांगितले कि, एक लक्षवेधी सुचना दया त्यावर महासभेत चर्चा होईल त्यानुसार मी लक्षवेधी सुचना दिली आहे. त्यानुसार सर्व नगरसेवकांचा नगरसेवक निधी मंजूर केला जावा.

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—**मागील वेळेस आम्ही ठराव पारीत केला होता कि, स्थायी समिती सदस्यांच्या प्रभागात रू. ५—५ लाख खर्चाच्या कामांची प्राकलने तयार केली जावीत. ती प्राकलने कुठे आहेत.

**प्र. शहर अभियंता, श्री. रमेश शिर्के :—** सद्या अर्थसंकल्पीय अंदाजांनुसार उत्पन्न प्राप्त होत नसल्याने हि प्राकलने तयार करण्यात आलेली नाहीत.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारेः—**स्थायी समिती, सभापती यांचा निधी मंजूर करत आहात मग आमचा रू.५—५ लाखाचा निधी कुठे गेला.

**प्र. शहर अभियंता, श्री. रमेश शिर्के :—** सभापती महोदया निर्देश देतील त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**सदस्य, श्री. राम पारवानीः—**स्थायी समिती सदस्यांच्या प्रभागांमध्ये समाजमंदिरांसारखी ५—५ लाखाची कामे झाली पाहिजेत त्यांची प्राकलने आपण तयार करा.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारेः—**प्राकलने तयार करू, प्रस्ताव मंजूरीस आणू यामध्ये महिनोनमहिने व वर्ष निघून जातात.

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—**ठरावामध्ये तसे आणा ना.

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणीः—** आयुक्त साहेबांना आपण सर्वांनी सांगितले होते की, आपण रू.३ करोड खर्चाची रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे सुरू करा परंतु अद्यापपर्यंती ती कामे सुरू झालेली नाहीत.

**सदस्य, श्री. राम पारवानीः—**ती कामे झाली आहेत, उर्वरित कामे होतील.

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणीः—** आमच्या प्रभागातील कामे झालेली नाहीत आम्हांस ती करून दया, आपण निष्णात आहात.

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—**इतिवृत्तात याची नोंद आल्यानंतर तरी आमचे काम होईल का?

**सदस्य, श्री. राम पारवानीः—**आपल्या निधीतील कामे स्थायी समितीपुढे मंजूरीस आणण्यासाठी काय काय करावे लागेल ते सांगा.

**प्र. शहर अभियंता, श्री. रमेश शिर्के :—** त्याबाबत स्थायी समिती जो ठराव पारित करेल, जे काही निर्देश देईल त्यानुसार आम्ही कार्यवाही करू.

**सदस्य, श्री. राम पारवानीः—**याबाबत आपण सभापती महोदयांकडून पत्र घेवू.

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणीः—**स्थायी समिती सदस्यांच्या प्रभागात रू.५—५ लाख खर्चाची कामे होत असतील तर स्थायी समिती सभापती श्रीम. मिना आयलानी यांना आम्ही धन्यवाद देवू. रस्त्यांच्या कामांसाठी शासनाकडून जे रू.२० करोड आले आहेत त्यातील रू.१ करोड आपण यांना देत आहात उरलेले रू. १९ करोड कुठे जातील.

**प्र. शहर अभियंता, श्री. रमेश शिर्के :—** रस्ते विकासासाठी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या रुपये २० कोटीचा निधी व महापालिकेचा २० कोटीचा निधी वापर करुन रस्ते विकासासाठी ४० कोटीची योजना तयार करण्यात आली होती. तिला मा. महासभेने मंजुरी देण्याऐवजी शासनाकडुन आलेला रुपये २० कोटीचा निधी पाणी पुरवठा योजनेसाठी वापरणेबाबत मंजुरी दिली आहे, त्यामुळे महापालिका हिस्स्यातील २० कोटी निधीसाठी ज्या लेखाशिर्षातुन तरतुदीचे समायोजन करावयाचे प्रस्तावित होते, त्या लेखाशिर्षापैकी रस्त्यांचे डांबरीकरणाने पृष्ठांकन करणे या लेखाशिर्षातील रुपये १४.४१ कोटीची तरतुद मा. महापौर निधी, मा. उप—महापौर निधी, मा. स्थायी समिती सभापती निधी व रस्त्यातील खड्डे भरण्यासाठी रुपये ३ कोटी, उल्हासनगर—३ वडोल गाव व उल्हासनगर शहर जोडणा—या वालधुनी नदीवर पुल बांधण्यासाठी २ कोटी ५४ लाख खर्चाचा प्रस्ताव आहे तसेच उल्हासनगर—३ रेल्वे स्टेशन जवळ पुल बांधण्यासाठी रुपये ४ कोटी ७७ लाख खर्चाचा प्रस्ताव आहे. या दोन्ही कामासाठी अर्थसंकल्पात रुपये ५ कोटी इतकी तरतुद आहे. उर्वरीत २.२१ कोटी असे समायोजन करुन रुपये १४.४१ कोटीमधील तरतुद वापरण्यात आली आहे.

**सदस्या, श्रीम. पंचशीला पवार:—**रू. २० कोटीचा कोणता निधी?

**प्र. शहर अभियंता, श्री. रमेश शिर्के :—**

**सदस्य, श्री. राम पारवानी:—**त्यामध्ये स्थायी समिती सदस्यांचे रू.७५ लाख रू. जोडून घ्या.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**चार्लीसाहेब, रू.७५ लाख नाही रू.८० लाख जोडून घ्या.

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—**मुख्य लेखा परिक्षकांना विचारून आपण याची खात्री तर करून घ्या.

**सदस्य, श्री. राम पारवानी:—**मुख्य लेखा परिक्षक कुठे जातील? आम्ही त्यांचा प्रस्ताव काही चर्चा न करता असाच पारीत करतो नाहीतर एक एक मुदद्यांवर त्यांना विचारणा करत राहू.

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणी:—** सन २००४ मध्ये मान्यता मिळालेल्या मुख्य रस्त्यावरील कल्व्हर्डचे काम अजुन झालेले नाही.

**सदस्य, श्री. जयेंद्र मोरे:—** कल्व्हर्डचे काम होईल ना?

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणी:—** संबंधित विभागाकडून तरतुद उपलब्ध नाही असे लिहिले जाते.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—**तुम्ही निधी इकडचा तिकडे फिरवता, रू.१४ कोटीचा निधी तुम्ही वाटप करत आहात, मग आम्ही काय करायचे.

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणी:—** रू.५—५ लाखाचा निधी आम्हाला दया आणि हि अट त्यामध्ये टाका.

**सदस्य, श्री. राम पारवानी:—**नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधी इत्यादी निधी आम्हाला मिळाले पाहिजेत.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—** आमचे तिन्ही निधी आम्हाला मिळाले पाहिजे, जोपर्यंत आम्हाला निधी मिळत नाही तोपर्यंत आपली कामे होवु देणार नाही.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३—१४ च्या अर्थसंकल्पामध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग—२ क—४ (१५) उप महापौर निधी या लेखाशिर्षात डांबरीकरणाने रस्ते बांधणे लेखाशिर्षातील तरतुद वर्ग करुन लेखाशिर्षातर्गत तरतुदीच्या समायोजनेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३—२०१४ च्या अर्थसंकल्पामध्ये लेखाशिर्ष 'अ' अंदाजपत्रक भाग—२ क—४ (१५) उप महापौर निधी अंतर्गत मागील वर्ष २०१२—१३ मध्ये व वर्ष २०१३—१४ साठी ठेवलेली तरतुद महापालिकेत निधी अभावी व त्या आधीच्या कामावरील खर्चाच्या दायित्वामुळे पूर्णपणे वापरणे शक्य झालेले नाही त्याचा परिणाम मा. उप महापौर यांना अर्थसंकल्पात ठेवून दिलेल्या नियतव्यया इतकी कामे हाती घेता आली नाही. आता या दोन्ही वर्षात खर्च न झालेल्या निधीची तरतुद चालू आर्थिक वर्षात करुन देणेसाठी उप महापौरांची मागणी आहे.

चालू वर्ष २०१३—१४ च्या अर्थसंकल्पामध्ये या लेखाशिर्षात मागील दायित्व वजा जाता शिल्लक राहणा—या तरतुदीमध्ये अन्य लेखाशिर्षाची तरतुद वळविणे गरजेचे राहिल जेणेकरुन मागील आर्थिक वर्षात न वापरलेली तरतुद व चालू आर्थिक वर्षात मागील दायित्वामुळे कमी पडणारी तरतुदीसाठी पुरेशी तरतुद उपलब्ध होईल. याकरिता 'अ' अंदाजपत्रक भाग—२ क ४ (५) डांबरीकरणाने रस्ते बांधणे या लेखाशिर्षामध्ये शिल्लक

असलेल्या तरतुदीपैकी खालील तक्त्यातील अनुक्रमांक ६ ओळीत नमुद केलेली तरतुद वळविणेसाठी समायोजनाचा प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| लेखाशिर्ष 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (१५) उप महापौर निधी मधील तरतुद रुपये लक्ष मध्ये | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | | एकुण तरतुद | वापरलेली तरतुद | न वापरलेली तरतुद |
| १ | वर्ष – २०१२–१३ | ५०.०० | ४८.०० | २.०० |
| २ | वर्ष – २०१३–१४ | ७५०.०० | ० | ७५.०० |
| ३ | एकुण | १२५.०० | ४८.०० | ७७.०० |
| ४ | या लेखाशिर्षामध्ये मागील दायित्व वजा जाता तुटीची तरतुद रुपये | | | (–)२३.४० |
| ५ | एकुण समायोजित करावयाची तरतुद (अ.क्र.३–४) | | | १००.४० |
| ६ | लेखाशिर्ष 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (५) डांबरी रस्ते बांधणे मधील वापरावयाची तरतुद (अ.क्र.५ इतकी) | | | १००.४० |

तरी उपरोक्त लेखाशिर्षातील तरतुदीच्या समायोजनाच्या मा. स्थायी समितीकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२, १०३ अंतर्गत मान्यता मिळणेस्तव प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ५३** **दिनांक:– १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :– श्री. गोदुमल किशनानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राम पारवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३–१४ च्या अर्थसंकल्पामध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (१५) उप महापौर निधी या लेखाशिर्षात डांबरीकरणाने रस्ते बांधणे लेखाशिर्षातील तरतुद वर्ग करुन लेखाशिर्षांतर्गत तरतुदीच्या समायोजनेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १४ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३–१४ च्या अर्थसंकल्पामध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (१६) स्थायी समिती सभापती निधी या लेखाशिर्षात डांबरीकरणाने रस्ते बांधणे लेखाशिर्षातील तरतुद वर्ग करुन लेखाशिर्षांतर्गत तरतुदीच्या समायोजनेस मान्यता देणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १४ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३–१४ च्या अर्थसंकल्पामध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (१६) स्थायी समिती सभापती निधी या लेखाशिर्षात डांबरीकरणाने रस्ते बांधणे लेखाशिर्षातील तरतुद वर्ग करुन लेखाशिर्षांतर्गत तरतुदीच्या समायोजनेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३–२०१४ च्या अर्थसंकल्पामध्ये लेखाशिर्ष 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (१६) स्थायी समिती सभापती निधी अंतर्गत मागील वर्ष २०१२–१३ मध्ये व वर्ष २०१३–१४ साठी ठेवलेली तरतुद महापालिकेत निधी अभावी व त्या आधीच्या कामावरील खर्चाच्या दायित्वामुळे पूर्णपणे वापरणे शक्य झालेले नाही त्याचा परिणाम मा.स्थायी समिती सभापतींना अर्थसंकल्पात ठेवून दिलेल्या नियतव्यया इतकी कामे हाती घेता आली नाही. आता या दोन्ही वर्षात खर्च न झालेल्या निधीची तरतुद चालू आर्थिक वर्षात करुन देणेसाठी सभापतींची मागणी आहे.

चालू वर्ष २०१३–१४ च्या अर्थसंकल्पामध्ये या लेखाशिर्षात मागील दायित्व वजा जाता शिल्लक राहणा–या तरतुदीमध्ये अन्य लेखाशिर्षाची तरतुद वळविणे गरजेचे राहिल जेणेकरुन मागील आर्थिक वर्षात न वापरलेली तरतुद व चालू आर्थिक वर्षात मागील दायित्वामुळे कमी पडणारी तरतुदीसाठी पुरेशी तरतुद उपलब्ध होईल. याकरिता 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क ४ (५) डांबरीकरणाने रस्ते बांधणे या लेखाशिर्षामध्ये शिल्लक असलेल्या तरतुदीपैकी खालील तक्त्यातील अनुक्रमांक ६ ओळीत नमुद केलेली तरतुद वळविणेसाठी समायोजनाचा प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| **लेखाशिर्ष 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (१६) स्थायी समिती निधी मधील तरतुद रुपये लक्ष मध्ये** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | | **एकुण तरतुद** | **वापरलेली तरतुद** | **न वापरलेली तरतुद** |
| १ | वर्ष – २०१२–१३ | ५०.०० | ६.५० | ४३.५० |
| २ | वर्ष – २०१३–१४ | ७५.०० | २०.०० | ५५.०० |
| ३ | एकुण | **१२५.००** | **२६.५०** | **९८.५०** |
| ४ | या लेखाशिर्षामध्ये मागील दायित्व वजा जाता शिल्लक तरतुद रुपये | | | ८.८२ |
| ५ | एकुण समायोजित करावयाची तरतुद (अ.क्र.३–४) | | | ८९.६८ |
| ६ | लेखाशिर्ष 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (५) डांबरी रस्ते बांधणे मधील वापरावयाची तरतुद (अ.क्र.५ इतकी) | | | ८९.६८ |

तरी उपरोक्त लेखाशिर्षातील तरतुदीच्या समायोजनाच्या मा. स्थायी समितीकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२, १०३ अंतर्गत मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ५४** **दिनांकः– १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :– श्रीम. चरणजित कौर भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राम पारवाणी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३–१४ च्या अर्थसंकल्पामध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (१६) स्थायी समिती सभापती निधी या लेखाशिर्षात डांबरीकरणाने रस्ते बांधणे लेखाशिर्षातील तरतुद वर्ग करुन लेखाशिर्षांतर्गत तरतुदीच्या समायोजनेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १५ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३–१४ च्या अर्थसंकल्पामध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (१४) महापौर निधी या लेखाशिर्षात डांबरीकरणाने रस्ते बांधणे लेखाशिर्षातील तरतुद वर्ग करुन लेखाशिर्षांतर्गत तरतुदीच्या समायोजनेस मान्यता देणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १५ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३—१४ च्या अर्थसंकल्पामध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग—२ क—४ (१४) महापौर निधी या लेखाशिर्षात डांबरीकरणाने रस्ते बांधणे लेखाशिर्षातील तरतुद वर्ग करुन लेखाशिर्षांतर्गत तरतुदीच्या समायोजनेस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३—२०१४ च्या अर्थसंकल्पामध्ये लेखाशिर्ष 'अ' अंदाजपत्रक भाग—२ क—४ (१४) महापौर निधी अंतर्गत मागील वर्ष २०१२—१३ मध्ये व वर्ष २०१३—१४ साठी ठेवलेली तरतुद महापालिकेत निधी अभावी व त्या आधीच्या कामावरील खर्चाच्या दायित्वामुळे पूर्णपणे वापरणे शक्य झालेले नाही त्याचा परिणाम मा. महापौर यांना अर्थसंकल्पात ठेवून दिलेल्या नियतव्ययया इतकी कामे हाती घेता आली नाही. आता या दोन्ही वर्षात खर्च न झालेल्या निधीची तरतुद चालू आर्थिक वर्षात करुन देणेसाठी महापौरांची मागणी आहे.

चालू वर्ष २०१३—१४ च्या अर्थसंकल्पामध्ये या लेखाशिर्षात मागील दायित्व वजा जाता शिल्लक राहणाऱ्या तरतुदीमध्ये अन्य लेखाशिर्षाची तरतुद वळविणे गरजेचे राहिल जेणेकरुन मागील आर्थिक वर्षात न वापरलेली तरतुद व चालू आर्थिक वर्षात मागील दायित्वामुळे कमी पडणारी तरतुदीसाठी पुरेशी तरतुद उपलब्ध होईल. याकरिता 'अ' अंदाजपत्रक भाग—२ क ४ (५) डांबरीकरणाने रस्ते बांधणे या लेखाशिर्षामध्ये शिल्लक असलेल्या तरतुदीपैकी खालील तक्त्यातील अनुक्रमांक ६ ओळीत नमुद केलेली तरतुद वळविणेसाठी समायोजनाचा प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| **लेखाशिर्ष 'अ' अंदाजपत्रक भाग—२ क—४ (१४) महापौर निधी मधील तरतुद रुपये लक्ष मध्ये** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | | **एकुण तरतुद** | **वापरलेली तरतुद** | **न वापरलेली तरतुद** |
| १ | वर्ष — २०१२—१३ | १००.०० | ५१.५० | ४९.५० |
| २ | वर्ष — २०१३—१४ | १२५.०० | ५१.५० | ७३.०५ |
| ३ | एकुण | २२५.०० | १०३.४५ | १२२.५५ |
| ४ | या लेखाशिर्षामध्ये मागील दायित्व वजा जाता तुटीची तरतुद रुपये | | | |
| ५ | एकुण समायोजित करावयाची तरतुद (अ.क्र.३—४) | | | १२२.५५ |
| ६ | लेखाशिर्ष 'अ' अंदाजपत्रक भाग—२ क—४ (५) डांबरी रस्ते बांधणे मधील वापरावयाची तरतुद (अ.क्र.५ इतकी) | | | १२२.५५ |

तरी उपरोक्त लेखाशिर्षातील तरतुदीच्या समायोजनाच्या मा. स्थायी समितीकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२, १०३ अंतर्गत मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित आहे.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.५५</u>** **<u>दिनांक:— १७/१२/२०१३</u>**

सुचकाचे नाव :— श्री. गोदुमल क्रिशनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०१३–१४ च्या अर्थसंकल्पामध्ये 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क–४ (१४) महापौर निधी या लेखाशिर्षात डांबरीकरणाने रस्ते बांधणे लेखाशिर्षातील तरतुद वर्ग करुन लेखाशिर्षांतर्गत तरतुदीच्या समायोजनेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १६ :–** वाहतुक नियमनासाठी ट्रफिक वार्डनची सेवा सन २०१३–१४ साठी चालु ठेवणे व आणखी ५ ट्रफिक वार्डन म्हणजे एकुण २५ ट्रफिक वार्डन नेमणेस व त्यांचे मानधनात (रू.२०००/– चे) रू.४०००/– अशी वाढ करण्यास मान्यता देणे

---

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणी:–** काय प्रस्ताव आहे ते सांगा

**वाहन विभागप्रमुख, श्री. चिमणकारे:–** वाहतूक पोलिसांकडून पत्र आले होते. मा. महापौर महोदयांच्या सांगण्यावरून नोव्हें. २०१२ मध्ये २० ट्रफिक वार्डन नेमले होते. ऑक्टों.२०१३ मध्ये त्यांचा १ वर्षाचा कालावधी संपुष्ठात आलेला आहे आता त्यात आणखी ५ वार्डन नेमणेस व त्यांचे मानधनात रू.२०००/– ऐवजी रू.४०००/– अशी वाढ करण्यास प्रस्तावित केले आहे.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:–** हि वीस माणेस कुठे असतात.

**सदस्य, डॉ. महेश गावडे:–** हि माणसे कधी दिसुन येत नाहीत, यांना काही गणवेष वगैरे दिलेला आहे का?

**सदस्य, श्री. राम पारवाणी:–** हे लोक कधी असतात. किती तास काम करतात.

**वाहन विभागप्रमुख, श्री. चिमणकारे:–** सकाळी ४ तास व सायंकाळी ४ तास असतात

**सदस्य, डॉ. महेश गावडे:–** रस्त्यावरची ट्रफीक सुरळीत होते का?

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:–** त्यांनी काम व्यवस्थित केले तर वाहतूक सुरळीत होईल. संध्याकाळी ६–०० वा. नंतर वाहतूकीची कोंडी होत असते.

**सदस्य, श्री. जयेंद्र मोरे :–** कॅम्प नं.५ मध्ये वाहतूकीची कोंडी होत नाही का? दुधनाका, मठ मंदिर येथे कितीतरी वेळा वाहतूकीची कोंडी होत असते परंतु तेथे ट्रफीक वार्डन दिसत नाही.

**सदस्या, श्रीम. कांचन लुंड:–** नेताजी चौक येथेसुध्दा ट्रफीक वार्डन दिसुन येत नाही.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:–** शहाड फाटक, १७ सेक्शन येथेसुध्दा वाहतुकीची मोठया प्रमाणात कोंडी होत असते. नगरसेवक जो जो विभाग सांगतात तो आपण लिहून घ्या आणि तेथे वार्डनची नियुक्ती करा.

**सदस्य, गोदुमल क्रिशनानी :–** नेहरू चौक, सिरू चौक येथेही वाहतूक कोंडी होत असते तर तेथेही ट्रफीक वार्डन नियुक्त करावा.

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:–** ट्रफिक वार्डनच्या मानधनात हि जी वाढ करत आहात त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद आहे का?

**वाहन विभागप्रमुख, श्री. चिमणकारे:—** होय, अर्थसंकल्पात या कामी रू.१ कोटीची तरतुद आहे.

**सदस्य, श्री. अंकुश म्हस्के:—**त्यांच्या मानधनात रू.२०००/— ऐवजी रू.४०००/— अशी वाढ करण्याची जरूरत काय आहे.

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—**हे वाहतूक सुरळीत करायचे काम करतात कि, वाहतूकदारांकडून पावती फाडून दंड वसुल करतात. कारण अशाप्रकारच्या ब—याचशा तक्रारी आमच्याकडे येत आहेत.

**वाहन विभागप्रमुख, श्री. चिमणकारे:—** होय, अशाप्रकारच्या तक्रारी माझ्याकडेसुध्दा आल्या आहेत.

**सदस्य, श्री. राम पारवाणी:—** वाहतूक नियमित करण्याचे त्यांचे काम आहे तर त्यांनी तेवढेच काम केले पाहिजे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १६ :—** वाहतुक नियमनासाठी ट्रफिक वार्डनची सेवा सन २०१३—१४ साठी चालु ठेवणे व आणखी ५ ट्रफिक वार्डन म्हणजे एकुण २५ ट्रफिक वार्डन नेमणेस व त्यांचे मानधनात (रू.२०००/— चे) रू.४०००/— अशी वाढ करण्यास मान्यता देणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेकडून मा. स्थायी समिती ठराव क्रं. १ दिनांक १३/०९/२०१२ अन्वये वाहतुक शाखेस उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे २० ट्रॉफिक वॉर्डन यांना खालील अटी व शर्तीच्या आधारे देय मानधनावरील खर्च अर्थसहाय्य स्वरुपात देणेस मान्यता दिलेली होती.

१) संबंधित २० ट्रॅफिक वॉर्डन नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.
२) संबंधित २० ट्रॅफिक वॉर्डन यांना प्रतिमहा रु.२०००/— मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस
आयुक्त, शहर वाहतूक शाखा, कल्याण विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात
देण्यात येईल.
३) २० ट्रॅफिक वॉर्डन यांचे मानधनापोटी वार्षिक रक्कम रु.४,८०,०००/— खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च
वर्ष २०१२—१३ चे अंदाजपत्रकात सी ५ (६) वाहतूक नियंत्रण या लेखाशिर्षात २०.०० लक्ष एवढया
उपलब्ध तरतूदीमधून करणेस मान्यता मिळणेस मा.स्थायी समितीसमोर प्रस्तावित करणेत येत आहे.
४) ट्रॅफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.
५) ट्रॅफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पोलिस विभागाची
राहिल.
६) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहिल

त्या अनुषंगाने वाहतुक शाखेने २० ट्रॉफिक वॉर्डन माहे नोव्हेबर २०१२ मध्ये नियुक्ती केली होती.सदर

नियुक्तीचा एक वर्षाचा कार्यकाल माहे ऑक्टोबर २०१३ मध्ये संपुष्ठात येत आहे.

आता संदर्भित पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, उल्हासनगर यांनी नियुक्त केलेले २० वार्डन ची सेवा सन २०१३—२०१४ साठी पुढे सुरू ठेवण्यास व आणखी अतिरिक्त ०५ वार्डन म्हणजे एकूण २५ वार्डन मिळणेबाबत व त्यांचे मानधन रू. २०००/— च्या ऐवजी रू. ४०००/— करणेबाबत विनंती केली आहे.

या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेची वाहतुक कोंडी दुर करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे २५ ट्रॅफिक वॉर्डन यांना देय मानधनावरील खर्च वाहतूक शाखेस अर्थसहाय्य स्वरुपात देणे खालील अटी व शर्तींच्या आधारे प्रस्तावित आहे.

१) संबंधित २५ ट्रॅफिक वॉर्डन नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.

२) संबंधित २५ ट्रॅफिक वॉर्डन यांना प्रतिमहा रु.४०००/— मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस

आयुक्त शहर वाहतूक शाखा, कल्याण विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात

देण्यात येईल.

३) सदर २५ ट्रॅफिक वॉर्डन यांचे पोटी रू. ४,०००/— मानधनापोटी वार्षिक रक्कम रु १२,००,०००/—

खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च वर्ष २०१३—१४ चे अंदाजपत्रकात सी ५ (६) Traffic Sign या लेखाशिर्षात १ कोटी एवढया उपलब्ध तरतूदीमधून करणेस मान्यता मिळणेस मा.स्थायी समितीसमोर

प्रस्तावित करणेत येत आहे.

४) ट्रॅफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.

५) ट्रॅफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

६) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

तरी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे..

**स्थायी समिती ठराव क्र. ५६** **दिनांकः— १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवाणी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वाहतुक नियमनासाठी ट्रफिक वार्डनची सेवा सन २०१३—१४ साठी चालु ठेवणे व आणखी ५ ट्रफिक वार्डन म्हणजे एकुण २५ ट्रफिक वार्डन नेमणेस व त्यांचे मानधनात (रू.२०००/— चे) रू.४०००/— अशी वाढ करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

➡ **विषय क्र. १७ :—** उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिसार योजना दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी जेएनएनआरयुएम योजने अंतर्गत कामाची पाहणी करण्यासाठी ठेकेदार/कंन्सलंन्टटमार्फत पदविका, पदविकाधारक १० कनिष्ठ अभियंत्याचा पुरवठा करणेकामी मान्यता देणे

---

**सदस्य, श्री. राम पारवाणी:—** शिर्केसाहेब, हे अभियंते काय काम करतील.

**प्र. शहर अभियंता, श्री. रमेश शिर्के :—** हा प्रस्ताव पाणीपुरवठा विभागाशी संबंधित आहे.

**प्र. कार्यकारी अभियंता, श्री. अली:—**पाणीपुरवठा विभागात सद्या तीनच अभियंते कार्यरत असल्याने जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत कामाची पाहणी करण्यासाठी ठेकेदार/कन्सलटंटमार्फत १० कनिष्ठ अभियंत्यांचा पुरवठा करून त्यांच्यामार्फत हे काम करावयाचे आहे.

**सदस्या, श्रीम. पंचशिला पवार:—** हे काम बरोबर करतील कि नाही ते कसे माहित पडेल, ठेकेदार पध्दतीने जे वॉल ऑपरेटर नेमले आहेत ते त्यांना पाहिजे त्या विभागाकडे पाणी वळवतात. याबाबत मी दोन तीन वेळा तुम्हाला सांगितले आहेत तसेच मी तुम्हाला फोन करते तर तुम्ही फोनसुध्दा घेत नाहीत. याबाबतीत मी आयुक्तसाहेबांना पत्र लिहिले आहे.

**प्र. कार्यकारी अभियंता, श्री. अली:—**पाणीपुरवठा विभागाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही त्यामुळेच ठेकेदारामार्फत कर्मचारी उपलब्ध करून घ्यावे लागत आहेत.

**सदस्य, श्री. राम पारवाणी:—** पाणीपुरवठा विभागात अगोदर २२ कनिष्ठ अभियंते होते आता फक्त ३ कनिष्ठ अभियंते आहेत.

**सदस्य, श्री. जयेंद्र मोरे :—** यांच्यावर नियंत्रण कोणाचे असेल आणि यांना पगार कोण देणार? जलवाहिनी टाकण्यासाठी पाच—पाच, सहा—सहा फुट रस्ता एक—एक, दोन—दोन महिन्यांपासून खोदून ठेवतात आणि तो पुर्ववत न केल्यामुळे खोदलेल्या रस्त्यात माणसे पडतात.

**सदस्य, श्री. राम पारवाणी:—** हे कर्मचारी ठेकेदारामार्फत नेमले जाणार आहेत.

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणी:—** सन्मा. सदस्या श्रीम. पंचशीला पवार यांनी बरोबर सांगितले आहे. वॉल ऑपरेटरना जे लोक पैसे देतात त्यांचेसाठी ते पाहिजे तसा वॉल फिरवुन त्या त्या विभागात पाणीपुरवठा करतात. महानगरपालिकेतील सर्वच कामे ठेक्याने दिली तर काय कामे होणार, ठेकेदार जर या अभियंत्यांना पगार देणार असेल तर त्यांचेवर आपले काय नियंत्रण राहिल. ठेकेदार जे बाहेरचे कर्मचारी ठेवणार आहे त्यांचेवर नियंत्रण कोणाचे असेल. श्री. सुदरम, अभियंता यांना फोन केला तर ते फोन उचलतच नाहीत. श्री. एन.डी.पाटील हे कुणाचे ऐकुन घेतात का? बहुतांश जलवाहिन्यांमधून दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे.

**सदस्या, श्रीम. कांचन लुंड:—** गोकुळनगरमध्ये सुध्दा पिण्याचे पाणी दुर्गंधीयुक्त येत आहे त्याकडेही कुणी लक्ष देत नाही.

**सदस्य, श्री. जयेंद्र मोरे :—** या अभियंत्यांनी महापालिकेचे काम केले पाहिजे ना, नाहीतर ते ठेकेदाराचे काम करतील.

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणी:—** मग आपल्या कर्मचा—यांकडून काम करून घ्या ना.

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—** आपल्या कर्मचा—यांना पदोन्नती दया ना.

**सदस्या, श्रीम. पंचशिला पवार:—** ब—याचशा ठिकाणी पाण्याची गळती होत आहे त्यांची पाहणी करण्यासाठी आपल्याकडे कर्मचारी नाही त्यामुळे मोठया प्रमाणात पाणी वाया जात आहे.

**<u>सदस्य, डॉ. महेश गावडे:—</u>** ठेकेदाराकडून अभियंत्यांचा पुरवठा करून घेण्याबाबतीत ज्या काही अटी व शर्ती दिलेल्या आहेत त्यामध्ये आणखी एक अट अशी टाका कि, ज्या अभियंत्यांचे काम जर समाधानकारक नसेल तर त्यांना पुर्वसुचना न देता कामावरून काढून टाकण्यात येईल.

**<u>सदस्य, श्री. राम पारवाणी:—</u>** आपणाकडे मजूरसुध्दा नाहीत. मजूरांविषयीचा एक प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजूरीस आणला जावा. आपणाकडे फक्त तीन अभियंते आहेत आणि त्यांच्याकडून दैनंदिन पाणीपुरवठा करणे, दुरूस्त्या, वॉल व पंप ऑपरेशन इत्यादीसह जेएनएनयुआरएम योजनेचीही कामे त्यांनाच पाहावी लागतात.

**<u>सदस्य, श्री. सतराम जेसवाणी:—</u>** आपण वर्तमानपत्रामध्ये वाचले असेल मा. महापौर महोदया यांनी म्हटले आहे कि, मी महापालिकेच्या ज्या ज्या विभागांना भेटी दिल्या त्या ठिकाणी अधिकारी कुणी आढळून आला नाही. याबाबत त्यांनी मा. मुख्यमंत्री महोदय यांना पत्रही लिहिले आहे ते आपण सर्वांनी वाचले असेल. ब—याचवेळा अधिकारी सुटटीवर जातात, नागरीक त्यांना शोधत राहतात आणि नगरसेवकहि त्यांना शोधत राहतात.

**<u>सदस्य, डॉ. महेश गावडे:—</u>** अधिका—यांवर आयुक्तांचे नियंत्रण असते.

**<u>सदस्य, श्री. सतराम जेसवाणी:—</u>** ठेक्यावर नेमलेल्या ज्या अभियंत्यांचे काम समाधानकारक नसेल त्यांना पुर्वसुचना न देता कामावरून काढून टाकण्यात येईल अशी अट त्या अटींमध्ये समाविष्ट करा व श्री. एन. डी. पाटील यांना कॅम्प नं.५ येथील पाणीपुरवठा कार्यालयातुन काढून टाका नाहीतर उद्याच्या महासभेत जमिनीवर बसेन.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १७ :—** उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिसार योजना दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी जेएनएनआरयुएम योजने अंतर्गत कामाची पाहणी करण्यासाठी ठेकेदार/कंन्सलंन्टटमार्फत पदवी, पदविकाधारक १० कनिष्ठ अभियंत्याचा पुरवठा करणेकामी मान्यता देणे

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर शहराची पाणी पुरवठा योजना दैनदिन देखभाल व दुरूस्तीसाठी डिसेंबर १९९४ मध्ये महाराष्ट्र जीवन प्रधिकारणामार्फत हस्तातरीत करून घेण्यात आली. उल्हासनगर महानगर पालिकेची पाणी पुरवठा योजना पूर्णत: महापालिकेकडून चालविण्यात येते. दैनदिन वितरण व्यवस्थेची देखभाल, दुरूस्ती पंपगृहांची दैनंदिन चालविणे व दुरूस्ती इत्यादी सर्व कामांसाठी मोठया प्रमाणावर अभियंते व कर्मचारी वर्ग (मिस्त्री,ऑरेटर्स,व्हालमन,मजूर इत्यादी) आवश्यक असते.

म.जी.प्रा. मार्फत योजना हास्तातंरीत झाली. त्यावेळेस योजनेवर १६ अभियंते कार्यरत होते. परंतु तदनंतर प्रतिनियुक्तीवरील अभियंताची संख्या दरवर्षी कमी होत आलेली आहे. व मागील वर्षी ११ अभियंते कार्यरत होते. दिनांक ०२/५/२०१२ रोजी श्री.बी.एस. पाटील, श्री. व्ही. एम. विसपुते, श्री. बी.अे. महोदय, व श्री. एस. जी. ढाके या चार शाखा अभियंताना महाराष्ट्र जीवन प्रधिकरणात बदलीच्या ठिकाणी रूजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात आले होते. त्यानंतर दिनांक ०५/१०/२०१२ रोजी श्री. शानभाग शाखा अभियंता (यांत्रिकी) हे बदलीमुळे कार्यमुक्त झालेले आहेत.

उर्वरीत कार्यरत अभियंता पैकी श्री. एन.एन. जयसिघांनी हे स्वेच्छानिवृती घेतलेले आहेत म. जी.प्रा. कडे वारंवार मागणी करूनही म.जी. प्रा. कडून शाखा अभियंते/उप अभियंते उपलब्ध होऊ शकलेले नाहीत परिणामी अभियंत्याची तातडीने आवश्यकता आहे.

पाणी पुरवठा योजना राबविताना प्रभागवार शाखा अभियंते उपलब्ध नसल्याने फक्त २ शाखा अभियंत्यावर एकुण ८ शाखा (सेक्शन) चालविण्याची वेळ आली आहे. दैनंदिन पाणी पुरवठा करणे, दुरूस्त्या,व्हाल्व व पंपगृह ऑपरेशन इत्यादीसह जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेची कामेही उपलब्ध दोन उप अभियंते व दोन शाखा अभियंता यांनाच पाहावे लागतात. परिणामी सर्व ठिकाणी तक्रारी उदभवून नगरसेवक व नागरीकांचा रोष सहन करावा लागत आहे. म्हणून पाणी पुरवठा व मलनिसा:रण योजनेची दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणे व जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत कामाची पाहणी करणेसाठी तातडीने पुढील प्रमाणे एकूण १० अभियंत्याची आवश्यता आहे.

| अ.क्र. | विभाग | आवश्यक अभियंते |
|---|---|---|
| अ | पाणी पुरवठा उप विभाग उत्तर क्षेत्र उल्हसनगर—३ | |
| १ | शाखा क्र. १ | १ |
| २ | शाखा क्र. २ | १ |
| ३ | शाखा क्र. ३ | .... |
| ब | पाणी पुरवठा उप विभाग दक्षिण क्षेत्र उल्हसनगगर ५ | |
| १ | शाखा क्र. ४ (१) | १ |
| २ | शाखा क्र. ४ (२) | १ |
| ३ | शाखा क्र. ५ | .... |
| ४ | शाखा क्र. ५ (१) | १ |
| क | उप विभाग(देयक) | १ |
| ड | विभागिय कार्यालय | १ |
| इ | मलनिसा:रण उप विभाग | १ |
| फ | उप विभाग(यांत्रिकी) | १ |
| ५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) सार्वजनिक बांधकाम विभागासाठी | ६ |
| | एकूण | १६ |

वरील प्रमाणे पाणी पुरवठा विभागास ९ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व १ कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) असे एकूण १० अभियंते तसेच सार्वजनिक बांधकाम विभागास ६ अभियंते तातडीने निविदा पध्दतीने ठेकेदार/तांत्रिक सल्लागार यांचे कडून उपलब्ध करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

सध्या नविन कनिष्ठ अभियंताचा वेतन व भत्ते खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| मुळ पगार | रू. ९३००/— |
| महागाई भत्ता | रू. ६६९६/— |
| इतर भत्ते | रू. ४३००/— |
| एकूण | रू. २०,२९६/— |

वरील प्रमाणे एका नविन कनिष्ठ अभियंताचा प्रतिमहा वेतन व भत्ता रू. २०,०००/— इतक्या प्रमाणे प्रतिमहा एकूण खर्च रू. ३,२०,०००/— इतका व वर्षिक खर्च रू. ३८,४०,०००/— इतका आहे. सदरचा खर्च महापालिकेचा सन २०१३ — १४ चा मंजूर अर्थसंकल्पामधील क बजेट मधील पाणी पुरवठा विभाग व सार्वजनीक बांधकाम विभागाच्या लेखाशिर्ष ''अे—१, पार्ट—२ अंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.

निविदा पध्दतीने ठेकेदार सल्लागार यांच्याकडून मागविल्यास त्यांना पुढील अटी व शर्ती प्रमाणे राहील.

**अटी व शर्ती**

१. इसार रक्कम रू. ५०००/— (अक्षरी—रूपये पाच हजार मात्र) रक्कम रोख, धनाकर्ष आयुक्त, उल्हासनगर शहर महानगरपालिका यांचे नावे भरता येईल.

२. निविदा फॉर्म दिनांक ................ रोजी दुपारी २:०० वाजे पर्यंत उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर मुख्यालय येथे स्विकारण्यांत येतील, शक्य झाल्यास त्याच

दिवशी दु. ४:०० वा. हजर ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समवेत मा. आयुक्त सो, उल्हासनगर महानगरपालिका यांचे दालनात उघडयांत येतील.

३. निविदा मंजुरीची समज मिळालेनंतर विहित मुदतीत महानगरपालिका कार्यालयात उपस्थित राहून विहीत रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र लिहून देण्याचे आहे.

४. अभियांत्रीकी सेवेसाठी पुरवठा करण्यांत येणा—या अभियंता

**१.** ठण्म्ण ;ब्पअपसध्एउमबींदपबंसध्मसमबजतपबंसद्ध

**२.** क्पचसवउं ;ब्पअपसध्एउमबींदपबंसध्मसमबजतपबंसध्बवदेजतनबजपवद जमबीदवसवहलद्ध या शैक्षणिक अर्हता धारक असणे

बंधनकारक राहतील व पुरवठा केलेल्या युनिटची शैक्षणिक अर्हतेची कागदपत्र सादर करणे बंधनकारक

राहील.

५. पुरविलेल्या युनिटचा नियमित आस्थापनेशी काहीही संबंध राहणार नाही. तसेच महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याचे हक्क ठेकेदारास राहणार नाही.

६. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणेचे अथवा नाकारणेचे अधिकार आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

७. सेवा पुरवली जाणा—या संस्थेची पात्रता विषयक माहिती संदर्भासह पुरवावी.

८. खाजगी, शासकीय व निमशासकीय संस्थेतील अनुभव असणे आवश्यक.

९. कामामध्ये कोणत्याही कारणाने व्यत्यय आणला गेल्यास विभागाप्रमुखाच्या आदेशानुसार दंड आकारला जाईल.

१०. संबंधित अभिकर्त्यांने कार्यादेशानुसार अभियंते पुरवठा न केल्यास वार्षिक ठेक्याच्या रक्कमेच्या १० टक्के रक्कम नुकसान भरपाई म्हणुन वसुल केली जाईल.

११. सर्वसाधारणपणे कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाज करावे लागेल सार्वजनीक व साप्ताहीक सुट्टीचे दिवशी देखील सोपवलेले कामकाज करावे लागेल. प्रत्यक्ष सेवा पुरविणेसाठी पुरविल्या जाणा—या व्यक्तींची माहिती ठेकेदाराने आगाऊ द्यावी, तदनुसार कामाच्या वेळा प्रशासकीय सोयीसाठी स्वतंत्र्यपणे आयुक्त यांचे मार्फत ठरवता येऊ शकतील परंतू ठेकेदाराने भरावयाचे दर हे संपूर्ण कामाचे असतील कामाच्या तासा प्रमाणे नसतील.

१२.महानगरपालिकेच्या येथोचित आदेशाची अंमलबजावणी कारावी लागेल. महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने सर्व नियमाचे पालन करावे लागेल महानगरपालिकेच्या हिताचे विरूध्द कार्यवाही करता येणार नाही. कार्यालयीन कामकाजात गोपनियता राखावी लागेल. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना राहील.

१३. या कामी लेखापरिक्षणात कामी आक्षेप आल्यास त्याची योग्य पुर्तता करण्याची जबाबदारी मंजूर अभिकर्त्यावर राहील.

१४.ठेक्याची मुदत आदेश दिल्यानंतर एक वर्षाची राहिल.

१५. प्रत्यक्ष कामकाज करताना बदली विभागाचे कामकाज दिल्यास करावे लागेल.

१६.उपरोक्त दर संदर्भासाठी मागविण्यात येत असुन आवश्यक त्या विभागकरीताच करारपत्र करून कार्यादेश निर्गमीत केले जातील.

१७.दरमहा कामाचे देयक, विभाग निहाय काम केल्याबाबतचे विभाग प्रमुखाचे शिफारशीसह अथवा कार्यकारी अभियंता किंवा उपायुक्त निश्चित करतील असा अधिका—याचे शिफारशीसह सादर करावे लागेल.

१८. निष्काळजीपणा, अज्ञान, सहेतुक कार्यवाही अथवा अन्य ठेकेदाराशी/सेवा पुरवणा—या व्यक्तींशी संबंधित कारणाने महानगरपालिका मालमत्तेची हानी झाल्यास किंवा अन्य दोष राहील्यास कोणताही बोजा निर्माण झाल्यास उपलब्ध अभिलेखानुसार होणार नुकसान भरपाई संबंधित ठेकेदार व्यक्ती संस्थांकडून देयकातुन/अनामत रक्कमांमधून वा अन्य कायदेशीर मार्गाने वसुल केली जाईल. प्रसांगानुरूप अन्य कायदेशीर कार्यवाहीस संबंधित ठेकेदार व त्याचे कडील सेवा पुरवणा—या व्यक्ती पात्र ठरतील.

१९. ठेकेदाराने पुरवावयाच्या सेवेचे स्वरूप ढोबळ मानाने सोबतच्या सहपत्राप्रमाणे असून संबंधित विभाग प्रमुखाकडे सविस्तर तपशिल मागणीनुसार उपलब्ध होईल. निविदा दर भरण्यापूर्वी याबाबत ठेकेदाराने समाधान करून घ्यावयाचे आहे. तद्नंतर कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

२०. देयक मागणी दरमहा सादर करावी.

२१. मुदतीचे आत अभिकर्त्याचा ठेका मुदतपुर्व रद्द करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला असून यासाठी १५ दिवसांची पुर्व सुचना देणेत येईल.

२२. थ्नविदा भरतांना पुरवठादाराने विकत घेतलेल्या महानगरपालिकेच्या अधिकृत निविदा पत्रात दर भरलेली निविदा ग्राहय धरण्यात येईल. निविदेमध्ये संपूर्ण पत्ता, संपर्क दुरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती स्पष्ट शब्दात सादर करावी.

२३. निविदा सादर करताना सिलबंद स्वरूपात महानगरपालिका कार्यालयात ठरवून दिलेल्या विहित मुदतीत प्रत्यक्ष सादर करणे बंधनकारक राहील.

२४. आलेल्या निविदा शक्य असल्यास निश्चित केलेल्या तारखेला व वेळेवर उपस्थित निविदाकाराचे अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यांत येतील. सर्शत निविदा नाकारण्यांत येतील.

२५. पुरवठादाराने निविदे सोबत निश्चित केलेली इसारा रक्कम रोखीने / डिमांड ड्राफ्टने निविदा सादर करतेवेळी भरणे आवश्यक राहील.

२६. निविदेसोबत भरलेल्या इसारा रक्कमेवर कोणत्याही स्वरूपात व्याज दिले जाणार नाही.

२७. तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडल्यानंतर जर तीन निविदांपेक्षा कमी निविदा धारक पात्र झाल्यास फेरनिविदा मागविण्यात येतील.

२८. निविदाकाराने भरलेल्या निविदेमधील प्रत्येक पानावर स्वाक्षरी करावी त्यानंतर तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२९. निविदा उघडताना प्रथम तांत्रीक माहितीचा लिफाफा उघडण्यात येईत व समाधानकारक कागदपत्र असल्याची खात्री झाल्यावर वित्तीय बाबीचा लिफाफा उघडण्यात येईल अन्यथा अशी निविदा विचारत घेतली जाणार नाही.

३०. निविदा फॉर्म मध्ये नमुद केलेल्या युनिट प्रमाणे दर नमुद करणे बंधनकारक राहील.

३१.तरी वरील प्रमाणे पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेच्या दैनंदिन देखभाल व दुरूस्ती व जे. एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत कामाची पहाणी करण्यासाठी दहा कनिष्ठ अभियंता ठेकेदार/तांत्रिक सल्लागार यांच्या मार्फत पुरवठा करण्याच्या रू. २४.०० लाख खर्चाचा प्रस्तावास वित्तीय मान्यतेस मंजूरी साठी मान्यनीय स्थायी समिती समोर सादर करण्यास प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५७ **दिनांकः— १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्रीम. आशा गुप्ता

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिसार योजना दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी जेएनएनआरयुएम योजने अंतर्गत कामाची पाहणी करण्यासाठी ठेकेदार/कंन्सलंन्टटमार्फत पदवी, पदविकाधारक १० कनिष्ठ अभियंत्याचा पुरवठा करणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८ :—** उल्हासनगर—३ येथील शांतीनगर ते अे ब्लॉक चौक, येथील रस्त्याची खोदाई करुन नॅचरल गॅस पाईप लाईन टाकणेकरिता मे.महानगर गॅस लिमिटेड मुंबई यांना परवानगी देणे.

---

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—** गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी खोदलेला रस्ता पुर्ववत करण्यासाठी किती खर्च येईल. शांतीनगर येथील रस्ता यापुर्वी खुप खराब होता ब—याचशा प्रयत्नांनंतर आता कुठे तो रस्ता व्यवस्थित करण्यात आला आहे. आणि आता या कामासाठी हा रस्ता पुन्हा खोदण्यात येईल. आयुक्त साहेब ना नगरसेवक निधी देत आहेत, ना प्रभागसमिती निधी देत आहेत तर नगरसेवकांनी करायचे काय? त्यांनी काय फक्त नागरिकांच्या शिव्या खायच्या काय?

**सदस्य, श्री. राम पारवाणीः—** पाईप लाईन टाकण्यासाठी खोदलेला रस्ता ते पुर्ववत करून देतील.

**प्र. कार्यकारी अभियंता, श्री. रमेश शिर्केः—** पाईप लाईनसाठी खोदलेला रस्ता आपण पुर्ववत करून घेवु.

**सदस्य, डॉ. महेश गावडेः—** पाईप लाईन टाकण्यासाठी खोदलेला रस्ता पुर्ववत करण्यासाठी आपणांस खर्च करावे लागेल असे त्यामध्ये लिहिले आहे.

**सदस्य, श्री. अंकुश म्हस्केः—** अगोदरच जो रस्ता खोदलेला आहे तो पुर्ववत केलेला नाही आणि आता पुन्हा रस्ता खोदणार, आम्ही तो रस्ता पुन्हा खोदू देणार नाही.

**सदस्य, डॉ. महेश गावडेः—** पाईप लाईन टाकण्यासाठी ज्या अटी शर्ती निश्चित केलेल्या आहेत त्यामधील अट क्र. ९ मध्ये गॅस पाईप लाईन टाकण्यासाठी खोदाईचे काम करतेवेळी पाण्याची लाईन/विद्युत केबल इत्यादी हानी झाल्यास सदर बाबतची दुरूस्ती अथवा नुकसान भरपाईची जबाबदारी आपली राहिल असे नमुद केले आहे.

**अति.आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री. श्रीधर पाटणकरः—** याबाबतीत पाच सहा वेळा मंत्रालयातुन सचिव साहेबांचा फोन आला होता. आणि हि शासनाची योजना आहे.

**सदस्य, श्री. अंकुश म्हस्केः—** अगोदर जी हया रस्त्याची खोदाई केली होती त्याचा त्रास कुणाला होता नागरीकांनाच ना त्याचे तुम्हाला काही नाही. हे जे काम आहे ते नागरीकांसाठी होत आहे मग जेव्हा रस्त्याची खोदाई होईल तेव्हा नागरिकांना त्रास नाही होणार का?

**<u>सदस्य, श्री. राम पारवाणी:–</u>** खोदलेल्या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी त्यांच्याकडून किती रक्कम येईल.

**<u>प्र. कार्यकारी अभियंता, श्री. रमेश शिर्के:–</u>** खोदलेला रस्ता दुरूस्तीसाठी त्यांच्याकडून रू.८०लाख मिळणार आहेत.

**<u>सदस्य, श्री. राम पारवाणी:–</u>** खोदलेला रस्ता पुर्ववत करण्यासाठी किती खर्च येईल.

**<u>प्र. कार्यकारी अभियंता, श्री. रमेश शिर्के:–</u>** रू.८० लाखापेक्षा कमी खर्च येईल.

**<u>सदस्य, श्री. राम पारवाणी:–</u>** खोदलेला रस्ता दुरूस्तीसाठी त्यांच्याकडून जे रू.८० लाख येणार आहेत त्याच्यातूनच त्या रस्त्याचे काम केले जावे.

**<u>सदस्य, श्री. अंकुश म्हस्के:–</u>** अगोदर जलवाहिनी टाकण्यासाठी जो रस्ता खोदला आहे तो अगोदर पुर्ववत करा याबाबत मी कितीतरी दिवसांपासून बोलत आहे त्याचा काही फायदा होत नाही. आणि आता गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी रस्ता खोदणार का? इथे तुम्ही रस्त्याचे काम पारीत करणार आणि सभागृहातून बाहेर पडल्यानंतर विसरून जाणार.

**<u>सदस्य, श्री. सतराम जेसवाणी:–</u>** तो तर सिमेंट कॉक्रींटचा रस्ता आहे.

**<u>प्र. कार्यकारी अभियंता, श्री. रमेश शिर्के:–</u>** रू.८५ लाख त्यांनी आपल्याकडे जमा केले आहेत. आणि हे काम फक्त उल्हासनगरमध्ये नाही तर संपुर्ण महाराष्ट्रभर हे काम सुरू आहे. ठाण्यापासुन उल्हासनगरपर्यंतचे हे काम पुर्ण होत आले आहे. मधला उल्हासनगरचाच एक तुकडा बाकी आहे. हा तुकडयात जर हे काम झाले नाही तर गॅस पुरवठयाबाबत सर्व नागरिकांना त्रास होईल.

**<u>सदस्य, श्री. अंकुश म्हस्के:–</u>** अगोदर जो रस्ता खोदलेला आहे त्याचे काम कधी पुर्ण करून देणार.

**<u>सदस्य, श्री. राम पारवाणी:–</u>** हे महानगर गॅसचे काम आहे नाहीतर या योजनेपासून उल्हासनगर शहर वंचित राहिल.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १८ :–** उल्हासनगर–३ येथील शांतीनगर ते अेब्लॉक चौक, येथील रस्त्याची खोदाई करुन नॅचरल गॅस पाईप लाईन टाकणेकरिता मे.महानगर गॅस लिमिटेड मुंबई यांना परवानगी देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

_मे.महानगर गॅस लि.मुंबई यांनी शांतीनगर ते ए ब्लॉक चौक येथील रस्त्याची खोदाई करुन गॅस पाईप लाईन टाकणेकरिता दि.१२/०९/२०११ च्या पत्राद्वारे एकुण २१८० मी. लांबीच्या रस्ता खोदाईच्या कामास परवानगी मागितली होती. त्याअनुषंगाने महापलिकेने दि.३०/०१/२०१२च्या पत्राद्वारे नॅचरल गॅस पाईप लाईन टाकणेच्या एकुण २१८० मी. लांबीच्या रस्ता खोदाईच्या कामाचे प्रस्तावापैकी ९१० मी. गॅस पाईप लाईनकरिता रस्ता खोदाईचे कामास आवश्यक ते शुल्क भरुन घेतल्यावर परवानगी देण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी दि.३०/०८/२०१२ च्या पत्राद्वारे उर्वरित १२७० मी.लांबीच्या रस्ता खोदाई कामासाठी परवानगी मागितली होती. त्यावर शहर अभियंता यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे महानगर गॅस कंपनीस उक्त रस्त्याखेरीज अन्य आणखी महापालिका क्षेत्रातील रस्त्यावर नॅचरल गॅस पाईप लाईन टाकण्याचे असल्यास एकत्रितपणे प्रस्ताव सादर करणेबाबत मे.महानगर गॅस लिमिटेड यांना इकडील पत्र क्र. उमपा/साबांवि/शअ/४८७, दिनांक ०८/०१/२०१३ अन्वये कळविले होते. .

त्यानंतर,मे.महानगर गॅस लिमिटेड यांनी दि.०८/०१/२०१३ च्या पत्रास अनुसरुन त्यांचेकडील दि. ०६/०८/२०१३ व दि.१४/०८/२०१३ च्या पत्राद्वारे नॅचरल गॅस पाईप लाईन टाकणेच्या उर्वरित १२७० मी. लांबीच्या रस्ता खोदाईच्या कामाचे प्रस्तावासह व अन्य दोन जागी खोदकामाची परवानगी मागितली होती. त्यापैकी

**SCADA Value** साठी १० x ४ चौ.मी.ची सेंच्युरी मटेरिअल गेटजवळील रस्त्यावर बसविणेकरिता परवानगीची मागणी केली आहे.

| अ. क्र. | तपशिल | खोदकामाची लांबी डीआरएस व एससीएडीए युनिटसाठी आवश्यक जागा | अर्जाचा तपशिल | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | १२'' एनबी स्टील आणि १२५ मीमी. एमडीपीई गॅस पाईपलाईन शांतीनगर ते ए ब्लॉक चौक | १२७० मीटर | पत्र क्र. एमजीएल–केवायएन/स्टील/११–१२/१२०९ ११–०१, दिनांक १२/०९/२०११ (२१८० मी.) | • संबंधित अभियंता सोबत प्रत्यक्ष स्थळपाहणी केली आहे. • उमपा ने २१८० मी. पैकी ९१० मी.साठी दि.०६/०२/२०१२ रोजी परवानगी दिलेली आहे. • डिमांड नोटस् १२७०मी. बाकी |
| २ | अलोकेशन ऑफ स्पेस फॉर इनस्टॉलेशन ऑफ अबाव्ह ग्राउंड १२'' एनबी एससीएडीए कॉम्पीटेबल व्हॉल्व्ह ॲसेबलेस निअर सेंच्युरी वॉल | ४ मी x ४ मी एरिया | पत्र क्र.एमजीएल–केवायएन/स्टील, ०४/०४/१२/०१ दिनांक ०५/०४/२०१२ | • संबंधित अभियंता सोबत प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन जागा निश्चित केली आहे. • डिमांड नोट बाकी |
| ३ | अलोकेशन ऑफ स्पेस (६ मी x ४ मी) फॉर इनस्टॉलेशन ऑफ वन अबाव्ह ग्राउंड (अप्लाईड फॉर ३ अलटरनेटीव्ह लोकेशन्स)डी.आर.एस. | ६ मी x ४ मी एरिया | पत्र क्र..एमजीएल–केवायएन/स्टील, ०३०९१२/०२, दि.०३/०९/२०१२ | • संबंधित अभियंता सोबत प्रत्यक्ष स्थळपाहणी केली आहे. |

सदर प्रकरणी महानगर गॅस लि. यांनी दि.०४/०९/२०१३ चे पत्रावर उपरोक्त अ.क्र.१ वरील १२७० मीटरच्या सबवे खोदकामाच्या प्रस्तावाबाबत प्रत्यक्ष जागेच्या ठिकाणी संबंधित अभियंता यांचेसह संयुक्तिक भेट देवून निश्चित केले आहे. अनुक्रमांक–२ प्रमाणे १० मी x ४ इतकी जागा SCADA व DRS साठी परवानगी मागितली होती. व अ.क्र.३ वर नमुद केलेली परवानगीची सध्या आवश्यकता नसल्याचे कळविले होते.

यासंदर्भात मा. आयुक्त सो. यांनी शअ/उअक महानगर गॅसचे अधिकारी श्री. संतोष सामंत श्री. सागर यांचे समवेत दि.११/०९/२०१३ रोजी बैठक आयोजित केली होती. त्यादिवशी प्रत्यक्ष जागेवर भेट करुन अनुक्रमांक १, २ व ३ च्या जागेची मा. आयुक्त सो. यांनी उपरोक्त अधिकाऱ्या समवेत पहाणी केली होती. त्यामध्ये अनुक्रमांक १ ची शांतीनगर वालधुनी पुलापासून 'ए' ब्लॉक चौक पर्यंत १२७० मीटर लांबी मध्ये गॅस पाईप लाईन टाकण्यासाठी परवानगी देण्याचे निश्चित झाले व अ.क्र.२ प्रमाणे SCADA व DRS बसविणेकरिता १० मी x ४ मीटरची नकाशात दर्शविल्याप्रमाणे जागा रस्त्यावर असल्याने भविष्यात इतकी मोठी जागा व्यापल्यामुळे वाहतुकीस अडथळा येऊ शकतो. त्यामुळे मे.महानगर गॅस लिमिटेड यांनी या अगोदर प्रस्तावित केल्याप्रमाणे SCADA व्हॉल्हसाठी शहाड येथे सेंच्युरी कंपनीच्या भिंती लगत ४ मी x ४ मीटर व DRS साठी त्यांचे उपरोक्त तीन पर्यायातील अनु क्र.३ वरील दि. ०३/०९/२०१२ च्या पत्राप्रमाणे दिलेल्या सचदेव हौ.सोसायटी जवळ, डॉल्फीन हॉटेल समोर ६ मी X ४ मीटर इतकी जागा योग्य राहील, असे महानगर गॅस लिमिटेड व उल्हासनगर महानगरपालिकेचे सर्व उपस्थित अधिकारी यांनी सर्व संमतीने निश्चित केले. त्याप्रमाणे महानगर गॅस लिमिटेड यांच्या दि.१८/०९/२०१३ च्या पत्राद्वारे सुधारित प्रस्ताव दाखल केला आहे. तो खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | खोदकामाची लांबी डीआरएस व एससीएडीए युनिटसाठी आवश्यक जागा | अर्जाचा तपशिल | मागणीचा प्रकार | मागणी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | १२'' एनबी स्टील आणि १२५ मीमी. एमडीपीई गॅस पाईपलाईन शांतीनगर ते ए ब्लॉक चौक | १२७० मीटर | १२७० मी लांबी रस्ते खोदकामासाठी रु.५२८३ प्रति चौ. मीटर प्रमाणे रस्ते दुरुस्ती खर्च (१२७० X ६३४०= रु.८०५१८००/–) | रस्ता खोदकामानंतर दुरुस्ती व पृनपृष्ठांकनाच्या खर्च्यापोटी | रु.८०५१८००/– |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | अलोकेशन ऑफ स्पेस फॉर इनस्टॉलेशन ऑफ अबाव्ह ग्राउंड १२'' एनबी एससीएडीए कॉम्पीटेबल व्हॉल्व्ह ॲसेबलेस निअर सेंच्युरी वॉल | ४ मी x ४ मी एरिया | ४ मी X ४ मीटर = १६ चौ.मी. जागेसाठी जागेचे दरमहा रु.६७२/—भाडे (Rent Fixationतक्ता प्रमाणे एका वर्षाचे रु.८०६४/— भाडे | रस्त्यामधील जागेचे भाडेपोटी प्रति १० वर्षाचे भाडे | **रु.१,२८,५१९/—** |
| ३ | अलोकेशन ऑफ स्पेस (६ मी x ४ मी) फॉर इनस्टॉलेशन ऑफ वन अबाव्ह ग्राउंड (अप्लाईड फॉर ३ अलटरनेटीव्ह लोकेशन्स)डी.आर. एस. | ६ मी x ४ मी एरिया | ६ मी X ४ मीटर = २४ चौ.मी. जागेसाठी दरमहा रु.१७५८/— भाडे (Rent Fixation तक्ता प्रमाणे एका वर्षाचे रु.२१०९६/— भाडे | रस्त्यामधील जागेचे भाडेपोटी प्रति १० वर्षाचे भाडे | **रु.३,३६,२३०/—** |

**अ)** उपरोक्त अ.क्र.१ वर नमुद केल्याप्रमाणे १२७० मीटर रस्ते खोदकामांना दुरुस्तीसाठी रु.८०५१८००/— इतका खर्च महानगर गॅस लि. यांचेकडून जमा करुन घेणेस प्रस्तावित आहे.

**ब)** उपरोक्त अनु.क्र.२ व ३ साठी ठरलेले वार्षिक उपरोक्त रकाना ४ मध्ये अनु.क्र.२ व ३ साठी रु.८,०६४/—व रु.२१,०९६/—भाडे उमपाने दरवर्षी घेण्यापेक्षा सलग १० वर्षाचे एक रकमी भाडे वार्षिक १०% वाढ गृहीत धरुन एकाच वेळी जमा करुन घेणे उचित राहील. जेणेकरुन आलेल्या रकमेतुन रस्ते दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होईल. सदर रक्कमेची आकारणी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

| **अ.क्र.** | | **अनु.क्र.२ साठी** | **अनु.क्र.३ साठी** | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| १ | १०/११/२०१३ ते ०९/११/२०१४ | ८०६४ | २१०९६ | २९१६० |
| २ | १०/११/२०१४ ते ०९/११/२०१५ | ८८७० | २३२०६ | ३२०७६ |
| ३ | १०/११/२०१५ ते ०९/११/२०१६ | ९७५७ | २५५२७ | ३५२८४ |
| ४ | १०/११/२०१६ ते ०९/११/२०१७ | १०७३३ | २८०८० | ३८८१३ |
| ५ | १०/११/२०१७ ते ०९/११/२०१८ | ११८०६ | ३०८८८ | ४२६९४ |
| ६ | १०/११/२०१८ ते ०९/११/२०१९ | १२९८७ | ३३९७७ | ४६९६४ |
| ७ | १०/११/२०१९ ते ०९/११/२०२० | १४२८६ | ३७३७५ | ५१६६१ |
| ८ | १०/११/२०२० ते ०९/११/२०२१ | १५७१५ | ४१११२ | ५६८२७ |
| ९ | १०/११/२०२१ ते ०९/११/२०२२ | १७२८६ | ४५२२३ | ६२५०९ |
| १० | १०/११/२०२२ ते ०९/११/२०२३ | १९०१५ | ४९७४६ | ६८७६१ |
| | **खर्चासाठी एकुण भाडे** | **१२८५१९** | **३३६२३०** | **४६४७४९** |

तरी उपरोक्त **अ** नुसार रस्ते खोदकामांसाठी रु.८०,५१,८००/—
उपरोक्त **ब** नुसार भाडेपोटी रु.४,६४,७४९/—

**एकुण रु.८५,१६,५४९/—**

सदर प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिका (प्रथम पक्षीय) व मे.महानगर गॅस लि.कं.(द्वितीय पक्षीय) यांचे दरम्यान करारनामा करतेवेळी खालील नमुद केलेल्या अटी व शर्ती अंतर्भूत करणे आवश्यक आहे.

१) सदर भाडे तत्वाची मोकळी जागा आज जशी आहे त्या स्थितीत मासिक व वार्षिक भाडे एकुण दहा वर्षाचे एकत्रित परिशिष्ठात नमुद केल्याप्रमाणे महापालिकेकडे जमा करावयाचे द्वितीय पक्ष यांनी मान्य केले आहे.

२) सदर भाडे कराराची मुदत एकुण १० वर्षे एवढी राहील.

३) सदर भाडे तत्वाचे जागे संबंधी कलम (१) मध्ये नमुद केलेल्या दरवर्षी विद्यमान भाडयात १० टक्के दराने भाडेवाढ करुन देण्यास द्वितीय पक्ष यांनी मान्य केले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे :—

| **अ.क्र.** | | **अनु.क्र.२ साठी** | **अनु.क्र.३ साठी** | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| १ | १०/११/२०१३ ते ०९/११/२०१४ | ८०६४ | २१०९६ | २९१६० |
| २ | १०/११/२०१४ ते ०९/११/२०१५ | ८८७० | २३२०६ | ३२०७६ |
| ३ | १०/११/२०१५ ते ०९/११/२०१६ | ९७५७ | २५५२७ | ३५२८४ |
| ४ | १०/११/२०१६ ते ०९/११/२०१७ | १०७३३ | २८०८० | ३८८१३ |
| ५ | १०/११/२०१७ ते ०९/११/२०१८ | ११८०६ | ३०८८८ | ४२६९४ |
| ६ | १०/११/२०१८ ते ०९/११/२०१९ | १२९८७ | ३३९७७ | ४६९६४ |
| ७ | १०/११/२०१९ ते ०९/११/२०२० | १४२८६ | ३७३७५ | ५१६६१ |
| ८ | १०/११/२०२० ते ०९/११/२०२१ | १५७१५ | ४१११२ | ५६८२७ |
| ९ | १०/११/२०२१ ते ०९/११/२०२२ | १७२८६ | ४५२२३ | ६२५०९ |
| १० | १०/११/२०२२ ते ०९/११/२०२३ | १९०१५ | ४९७४६ | ६८७६१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | खर्चासाठी एकुण भाडे | १२८५१९ | ३३६२३० | ४६४७४९ |

४) भाडया व्यतिरिक्त राज्य शासन व केंद्र शासन यांचे वेळोवेळी येणारे कर द्वितीय पक्ष यांना भरणे बंधनकारक राहील.

५) द्वितीय पक्षीय यांनी करारनामा कालावधी सुरु होण्यापूर्वी करारनामा कालावधीचे उपरोकत तक्त्याप्रमाणे आगाउ भाडयाचा भरणा उल्हासनगर महानगरपालिकेकडे करणे आवश्यक राहील.

६) द्वितीय पक्षीय यांना करारनामा कालावधी सुरु होण्यापूर्वी एक वर्षाच्या भाडया इतकी रक्कम अनामत म्हणून जमा करेल.

७) रस्ता खोदाई करणेसाठी वाहतुक शाखा उल्हासनगर यांना कळवून व त्यांचे परवानगीने काम करावे. वाहतुकीस अडथळा व अपघात होणार नाही यादी दक्षता घ्यावी. रस्ता खोदाई करताना कोणताही अपघात अथवा जिवित हानी झाल्यास त्याची संपूर्णत: जबाबदारी आपली राहील. रस्ता खोदाई करताना गॅस पाईप लाईनसाठी रस्त्याच्या कडेला खोदाई करावी. गॅस पाईप लाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर खोदलेली माती चरीमध्ये व्यवस्थित भरण्यात यावी. उर्वरित माती उचलण्याची कारवाई तातडीने करावी. जेणेकरुन रस्ता वाहतुक सुरळीत होईल.

८) रस्ता खोदाई करण्याचे प्रत्येक टप्प्याचे काम सुरु करताना व संपल्यावर उप–अभियंता बांधकाम, मुख्यालय यांचे समवेत पाहणी करुन व ना–हरकत प्रमाणपत्र घेऊनच पुढील काम सुरु करावे. पाहणी अहवालात काम असमाधानकारक अढळल्यास आपणावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

९) गॅस पाईप लाईन टाकणेसाठी खोदाईचे काम करतेवेळी पाण्याची पाईप लाईन/विद्युत केबल इत्यादी हानी झाल्यास सदर बाबतची दुरुस्ती अथवा नुकसान भरपाईची जबाबदारी आपली राहील.

१०)द्वितीय पक्षीय यांना करारनामा कालावधी वाढविणे असल्यास करारनामा कालावधी संपुष्टात येणेपूर्वी एक महिना आधी तशी सूचना द्वितीय पक्षीय प्रथम पक्षीय यांना देईल व पुढील कालावधीसाठी अ.क्र.५व६ प्रमाणे रक्कम अदा करेल.

१२) वरील द्वितीय पक्षीय यांनी सदर भाडे तत्वाच्या जागेमध्ये या करारनाम्याप्रमाणे करावयाच्या प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनामध्ये अथवा अन्य कोणताही फेरबदल अथवा कायम स्वरुपी बांधकाम करावयाचे नाही. तथापि सदर भाडे तत्वाच्या जागेमध्ये वरील द्वितीय पक्षीय यांस कोणताही फेरबदल अथवा कायम स्वरुपी बांधकाम अथवा फेरबदल आणि बांधकाम विषयक कार्यवाही करण्याचे झाल्यास वरील द्वितीय पक्षीय यांनी योग्य वास्तुविशारदमार्फत आराखडे सादर करुन नगररचनाकार यांचेकडून पूर्व मंजूरी आणि/किंवा पूर्व परवानगीने करावयाचे आहे. सदर फेरबदल अथवा बांधकाम विषयक कारवाई करते वेळी सदर भाडेतत्वाच्या जागेवर कोणत्याही प्रकारचे नुकसान अथवा धोका पोहचणार नाही तसेच इतर खात्यांच्या सुविधांना नुकसान पोहोचणार नाही. याची दक्षता वरील द्वितीय पक्षीय यांनी घ्यावयाची आहे. तसेच या जागेस वरील द्वितीय पक्षीय कारवाईमुळे होणारे नुकसान भरपाईचे निवारण द्वितीय पक्षीय यांनी करावयाचे आहे.

१३) सदर भाडेतत्वाचे जागेस आवश्यक असणारा विद्युत पुरवठा द्वितीय पक्ष यांनी घ्यावयाचा आहे व येणारे बील द्वितीय पक्षीय यांनी परस्पर महाराष्ट राज्य विद्युत मंडळाकडे भरावयाचे आहे.

१४) सदर भाडेतत्वाचे जागेत आवश्यक असलेला पाणीपुरवठा स्वखर्चाने स्वतंत्ररित्या घेऊन तद्विषयक होणाऱ्या खर्चाची रक्कम संबंधित विभागाकडे परस्पर अदा करावयाची आहे.

१५) वरील भाडेतत्वाच्या जागेसंबंधी देय असलेले भाडे आणि अथवा सुधारित दराने देय असलेले भाडे देण्यात द्वितीय पक्षीय यांनी सलग १ वर्ष भरणेस कसूर केल्यास वरील प्रथम पक्षीय कोणतीही पूर्व सूचना न देता सदर भाडे तत्वाच्या जागेत पूर्ण प्रवेश करील एकतर्फी ताबा घेण्यात येईल. तसेच न भरलेली भाडे रक्कम अनामत रक्कमेतून वसुल करण्यात येईल. सदर द्वितीय पक्षीय यांना पुन्हा ताबा ठेवण्याचा कोणताही हक्क मिळणार नाही.

१६) सदर भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या जागेसंबंधी वरील द्वितीय पक्षीय यांस कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध तसेच पोट भाडयाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे द्वितीय पक्षीय हितसंबंध करता येणार नाही.

१७)सदर जागेचा वापर द्वितीय पक्षीय यांनी D.R.S. व R.T.U यंत्रणा उभी करणेसाठीच करावयाचा आहे.

१८) वरील प्रथम पक्षीय यांस सदर भाडेतत्वावर दिलेली जाता लोकहित उपयोगासाठी अथवा (स्लम) विशिष्ट करण्यासाठी गरज भासल्यास वरील द्वितीय पक्षीयांना सदर भाडेतत्वाची जागा विनाहरकत व बिन तक्रार महापालिकेच्या ताब्यात दयावयाची आहे. तथापि सदर बाबींची किमान ३० दिवस पूर्व सूचना वरील प्रथम पक्षीय यांनी द्वितीय पक्षीयांस दयावयाची आहे.

१९) सदर भाडेतत्वाच्या जागेसंबंधी या भाडेतत्वाच्या कराराची मुदत सदर भाडेतत्वाच्या जागेचा वरील द्वितीय पक्षीय यांनी कब्जा घेतले पासून १० वर्षाच्या कालावधी करिता असेल. सदर १० वर्षाच्या कालावधीनंतर वरील द्वितीय पक्षीय यांनी सदर भाडे तत्वाच्या जागेचा खुला व शांततामय ताबा प्रथम पक्षीयांस विना तक्रार देण्याचा आहे.

२०) सदर भाडेतत्वाच्या जागेचा वापर वरील द्वितीय पक्षीय यांनी वेळोवेळी प्रचलित असलेल्या महापालिकेच्या नियम व अटी शर्तीनुसार करावया आहे. सदर अटी व शर्ती नियम भंग अथवा उल्लंघन झाल्यास वरील प्रथम पक्षीय सदर भाडेतत्वाची जागा आपेल कब्जा व ताब्यामध्ये घेईल.

२१) हया करारातील कोणत्याही अटी, शर्तीचा वरील द्वितीय पक्षीयांकडुन भंग झाल्यास आणि अथवा उल्लंघन झाल्यास वरील प्रथम पक्षीय सदरचा करार एकतर्फी रद्द करण्याचे हक्क व अधिकार स्वत:कडे ठेवीत आहे.

२२) या कराराचे अटी व शर्ती व तद्अनुषंगीक कोणत्याही बाबीबाबत काही वाद–विवाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचे लवादाकडे प्रचलित लवाद कायदा तरतुदीस अधीन राहुन सदर वाद–विवाद

संदर्भित करण्यात उभय पक्षीयांना विनाशर्त मान्यता दिली आहे. मा.आयुक्त महानगरपालिका हे एकमेव लवाद असतील. त्यांनी दिलेला निर्णय हा अंतिम व उभयपक्षकारांवर बंधनकारक असेल.

दहा वर्षाच्या समाप्तीनंतर महानगर गॅस लि. कंपनी पुढील प्रत्येक दहा वर्षासाठी प्रति वर्ष १० टक्के वाढ गृहीत धरुन स्वत:हून भाडे उल्हासनगर महानगरपालिकेकडे जमा करील व उपरोक्त अटी व शर्ती करारनाम्यात नमुद करुन उपरोक्त रकमेची मागणी महानगर गॅस लिमिटेड यांचेकडून करणेसाठी प्रस्ताव स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ५८** **दिनांक:—१७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. वसुधा बोडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ येथील शांतीनगर ते अेब्लॉक चौक, येथील रस्त्याची खोदाई करुन नॅचरल गॅस पाईप लाईन टाकणेकरिता मे. महानगर गॅस लिमिटेड मुंबई यांना प्रस्तावनेतील अटी, शर्तीवर परवानगी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १९ :—** महानगरपालिकेमधील व पदाधिकारी कार्यालयांकडे काम करणा—या चतुर्थश्रेणी कर्मचा—यांच्या अतिकालीन भत्यात (रू.५००/— चे) रू.१०००/— अशी वाढ करण्यास मान्यता देणे

---

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—** हा कर्मचा—यांचा विषय आहे पारित केला जावा.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—** शिपाई कर्मचा—यांचे हजार रूपये मंजूर झाले आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १९ :—** महानगरपालिकेमधील व पदाधिकारी कार्यालयांकडे काम करणा—या चतुर्थश्रेणी कर्मचा—यांच्या अतिकालीन भत्यात (रू.५००/— चे) रू.१०००/— अशी वाढ करण्यास मान्यता देणे

**प्रस्तावना**

मा. महापौर, उप—महापौर, मा. स्थायी समिती सभापती, मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, सचिव उप—आयुक्त ई. पदाधिकारी व अधिकारी यांचेकडे चतुर्थश्रेणी कर्मचा—यांना काही वेळा महत्वाच्या कार्यालयीन कामानिमित्त, बैठकानिमित्त कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतरही कार्यालयात जादा वेळ थांबावे लागते. याकरीता मा. स्थायी समिती ठराव क्र. ६२, दिनांक ११/११/२००२ व ठराव क्र. ७५, दिनांक २५/९/२००३ अन्वये चतुर्थश्रेणी कर्मचा—यांना प्रतिमहा रु. ५००/— अतिकालीन भत्ता/विशेष वेतन मंजुर केलेले आहे.

सदर मंजुर केलेला अतिकालीन भत्याची रक्कम रु. ५००/— प्रतिमहा ही १० वर्षापुर्वीची आहे. सदर रक्कमेत वाढ करुन ती प्रतिमहा रु. १०००/— करण्याकरीता मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यास मा. महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांनी पत्रानुसार कळविले आहे.

महानगरपालिकेचे पदाधिकारी मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उप—आयुक्त व विभागप्रमुख यांच्याकडे कार्यरत असलेले चतुर्थश्रेणी कर्मचारी हे महत्वाचे कार्यालयीन कामानिमित्त, बैठकीनिमित्त कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतरही थांबत असल्याने त्यांच्या अतिकालीन भत्त्यात वाढ करुन तो प्रतीमहिना रु. १०००/— देण्यासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५९ **दिनांकः— १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्रीम. वसुधा बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिकेमधील व पदाधिकारी कार्यालयांकडे काम करणा—या चतुर्थश्रेणी कर्मचा—यांच्या अतिकालीन भत्यात (रू.५००/— चे) रू.१०००/— अशी वाढ करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २० :—** लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार एकुण २० ठिकाणची मोडकळीस आलेली शौचालय निष्कासित करुन तेथे सी.सी. पॅसेज, समाजमंदिर, वाचनालय, नविन शौचालय, हजेरी शेड, व्यायाम शाळा, पंचायत हॉल, महिला भवन किंवा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार सदर मालमत्तेचा विनियोग करण्यास मान्यता देणे.

---

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारेः—** माझ्या प्रभागातील मोडकळीस आलेली सार्वजनिक शौचालये निष्कासित करण्याबाबतीत मी मागे पत्र दिले आहे. मागील सभेतही पत्र दिले आहे व कालसुध्दा पत्र दिले आहे. ती ठिकाणे या गोषवा—यात आलेली आहेत का?

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्री. मनिष हिवरेः—** आपण दिलेली ठिकाणे या गोषवा—यात आलेली आहेत.

**सदस्य, श्री. राम पारवाणीः—** डॉ.गावडे, श्री. सतरामदास जेसवाणी, श्रीम. बोडारे महोदया यांच्या प्रभागातील जे काही प्रस्ताव आले नसतील त्यांची यादी तयार करून ते पुढील सभेत आणा.

**सदस्य, श्री. सतराम जेसवाणीः—** मी समाजमंदिरचा प्रस्ताव दिला आहे.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारेः—** ते म्हणत आहेत कि आता नाही होणार मग पुढील सभेत होईल का?

**सदस्य, श्री. राम पारवाणीः—** या प्रस्तावात समाविष्ट करा नाहीतर तीन दिवसांनी पुढील सभा लावण्यात येईल त्या सभेत हे प्रस्ताव आणण्यात यावेत.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारेः—** पुढच्या सभेत घेवुन या.

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २०** :—लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार एकुण २० ठिकाणची मोडकळीस आलेली शौचालय निष्कासित करुन तेथे सी.सी. पॅसेज, समाजमंदिर, वाचनालय, नविन शौचालय, हजेरी शेड, व्यायाम शाळा, पंचायत हॉल, महिला भवन किंवा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार सदर मालमत्तेचा विनियोग करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील विविध प्रभागातील महानगरपालिका सदस्य यांनी प्रभागातील मोडकळीस आलेल्या शौचालयाचे निष्कासन करणे संबंधी पत्रव्यवहार केलेला आहे. त्या अनुषंगाने आरोग्य विभागाचे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अहवाल प्राप्त झालेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. तथापि यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय मागविणेबाबत उपायुक्त (आरोग्य) यांनी सुचित केले होते. त्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे अभिप्राय प्राप्त झाले असून त्या अभिप्रायामध्ये आर्थिक तरतूदीच्या उपलब्धतेनुसार सी.सी. पॅसेज/समाज मंदिर/ वाचनालय/नविन शौचालय/ हजेरी शेड मा. स्थायी समिती निर्देश देईल, त्याप्रमाणे स्वतंत्र प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात येईल, असे अभिप्राय प्राप्त झाले आहे.

उक्त बाबी विचारात घेता आरोग्य विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे अभिप्रायानुसार सोबत जोडलेल्या यादीतील सार्वजनिक शौचालय निष्कासन करुन लोकप्रतिनिधी यांनी मागणी केल्यानुसार एकुण २० ठिकाणी सोबत दिलेल्या प्रपत्रानुसार सी.सी. पॅसेज/समाजमंदिर, वाचनालय, नविन शौचालय/हजेरी शेड, व्यायाम शाळा/पंचायत हॉल/महिला भवन बांधणेस मंजुरी मिळण्यासाठीकिंवा सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग करणेकरीता स्थायी समिती पटलावर प्रस्ताव प्रस्तावित करणेत येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ६०** **दिनांक:— १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोदुमल किशनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार एकुण २० ठिकाणची मोडकळीस आलेली शौचालय निष्कासित करुन तेथे सी.सी. पॅसेज, समाजमंदिर, वाचनालय, नविन शौचालय, हजेरी शेड, व्यायाम शाळा, पंचायत हॉल, महिला भवन किंवा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार सदर मालमत्तेचा विनियोग करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २१ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २१** :— उल्हासनगर व कल्याण येथिल दिवाणी न्यायालयात महापालिकेतर्फे बाजु मांडण्यासाठी पॅनल वर वकिल म्हणुन ॲड. मोईनउद्दीन रियाज अली यांची नियुक्ती करण्यास मान्यता देणे.

---

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—** मला सांगा, आपल्या महापालिकेच्या पॅनलवर वकील असतील ना, त्यांनी आतापर्यंत किती व कुठल्या कुठल्या केसेस जिंकल्या आहेत ते दाखवा.

**प्र. विधी अधिकारी, श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी:—** केसेस जिंकल्या जातात. येथील न्यायालयात महापालिकेने केसेस जिंकल्यानंतर हरलेले लोक उच्च न्यायालयात अपील करतात. महानगरपालिकेच्या पॅनलवर श्री. चुंबळे, श्री. जैन, इत्यादी त्यांना सद्या वेळ नसल्यामुळे ॲड. मोईनउद्दीन रियाज अली यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. यांना प्रत्येक केस मागे सुरूवातीला रू.२०००/— मानधन देण्यात येते व त्यानंतर केस जिंकल्यानंतर रू.२०००/— असे रू.४०००/— एवढेच मानधन स्थायी समितीच्या ठरावानुसार दिले जाते.

**काही सदस्य :—**पास—पास.....

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २१ :—** उल्हासनगर व कल्याण येथिल दिवाणी न्यायालयात महापालिकेतर्फे बाजु मांडण्यासाठी पॅनल वर वकिल म्हणुन ॲड. मोईनउद्दीन रियाज अली यांची नियुक्ती करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेतील पॅनलवर वकिल म्हणुन दिवाणी न्यायालय उल्हासनगर व वरिष्ठ दिवाणी न्यायालय कल्याण येथे ॲड किशोर हेमराजानी, ॲड के.टी. जैन, ॲड हेमंत चुबळे, ॲड भोळे व ॲड अशोक कदम हे महानगरपालिकेविरुध्द दाखल होणा—या दाव्यात महापालिकेची बाजू मांडणेसाठी कार्यरत आहे.

ॲड मोईनउद्दीन रियाज अली यांनी दिनांक २६/७/२०१३ रोजी पॅनलवर नियुक्त करणेबाबत विनंती अर्ज केला असून विधी विभागात विविधी विभागातील प्रकरण दाखल होत असतात तसेच अनेक विभागामार्फत कायदेशीर मतासाठी संचिका येत असून काम त्वरीत व्हावे म्हणुन प्रकरणाची विभागणी होणे आवश्यक आहे. यासाठी उल्हासनगर व कल्याण येथिल दिवाणी न्यायालयात महानगरपालिकेतर्फे बाजू मांडणेसाठी पॅनलवर वकिल म्हणुन ॲड मोईनउद्दीन रियाज अली यांची नियुक्ती करणेसाठी मा. स्थायी समिती पुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ६१** — **दिनांक:— १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्रीम. आशा गुप्ता

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. कांचन लुंड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर व कल्याण येथिल दिवाणी न्यायालयात महापालिकेतर्फे बाजु मांडण्यासाठी पॅनल वर वकिल म्हणुन ॲड. मोईनउद्दीन रियाज अली यांची नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २२ :—** महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महापालिका अग्निशमन सेवेचे सक्षमीकरणे करणेस मान्यता देणे.

---

**सदस्या, श्रीम. कांचन लुंड :—** हा विषय काय आहे ते सांगा

**सदस्य, डॉ. महेश गावडे:—** अग्निशमन विभागाचा कोणी अधिकारी येथे दिसत नाही.

**प्र. कार्यकारी अभियंता, श्री. रमेश शिर्के:—** हा विषय अग्निशमन विभागासाठी इमारत तयार करण्याचा आहे.

**सदस्य, श्री. राम पारवाणी:—** अग्निशमन विभागासाठी इमारत बांधायची आहे का?

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—** इमारत बांधण्यापेक्षा अग्निशमन विभागात आग विझवण्याची जी गाडी आहे तीला शिडी लावुन दया. अग्निशमन विभागातील कर्मचा—यांना गणवेष दया.

**प्र. कार्यकारी अभियंता, श्री. रमेश शिर्के:—** यासाठी शासनाने काही निधी दिला आहे त्यातुन ४ गाडया घ्यावयाच्या आहेत व इमारत बांधायची आहे. शासनाचा काही निधी आहे व त्यात आपलाही काही निधी त्यात टाकावयाचा आहे.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—** आग विझविण्यासाठी नविन गाडया घेताना उंच शिडीच्या गाडया घ्या.

**प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. भास्कर मिरपगार:—** गणवेष भांडार विभागाकडून पुरविले जातात.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २२ :—** महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महापालिका अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्यातील सर्व अग्निशमन सेवेवचे सक्षमीकरण करणेकरीता राज्य शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ दिनांक ६/१२/२००८ पासून राज्यातील नागरी भागात व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात लागू केलेला आहे. या संबंधी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक व उपाययोजना नियम २००९ दिनांक २३/६/२००९ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द केले असून या अधिनियमातील तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन त्यामध्ये असणारी तुट भरुन काढून अग्निशमन सेवेचे बळकटीकरण/ सक्षमीकरण करणेबाबत निर्देश दिले आहे. यासाठी आवश्यक असलेला DPR शासनाकडे सादर केलेला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे उल्हासनगर—३ येथील तरणतलाव शेजारी अग्निशमन केंद्र बांधणेच्या स्थापत्य कामाचे मे.अनिरुध्द नाखवा, स्थापत्य सल्लागार यांचेकडून प्राकलन तयार करणेत आले असून सदर कामाची प्राकलनिय किंमत रु.१,२१,०३,८००/— इतकी आहे. सदर प्राकलनास मा.महासभा ठराव क्र. ४५ दिनांक २०/१०/२०१२ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झालेली आहे. महानगरपालिकेच्या वर्ष २०११—१२ च्या अर्थसंकल्पात विपरीत परिस्थिती व्यवस्थापन व अग्निशमन इमारत अंतर्गत B-2 (1) अग्निशमन इमारत बांधणे या लेखाशिर्षात सदर कामासाठी रु. १.२५ कोटी इतकी तदतूद ठेवण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त सो. यांनी दिनांक ०५/०३/२०१३ रोजी सदर कामाची निविदा मागविणेस मान्यता दिल्याप्रमाणे ई—मसुदा निविदा पत्र (E Tender Draft Tender Papers) तयार करुन दिनांक २६/०३/२०१३ रोजी सदर काकामची ई—निविदा मागविणेस आली. परंतु एकाच निविदाकाराची निविदा प्राप्त झाली आहे. त्यामुळे सदर प्रक्रियेत मुदतवाढ देण्यात आली होती.

तरी सदर कामाची ई—निविदा मागविणेसाठी इ—मसूदा निविदा पत्र (E tender Draft Tender Papers) वर्ष २००८—२००९ च्या डी.एस.आर. दराप्रमाणे तयार करण्यात आलेले होते. त्यास मान्यतेनंतर व त्याप्रमाणे निविदा सूचना जारी करण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेमध्ये एकुण तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

पहिला कॉल—दि.२५/०३/२०१३ ते दि.२८/०३/२०१३.
दुसरा कॉल— दि.२९/०४/२०१३ ते दि.४/०५/२०१३.
मुदतवाढ दि.१५/५/२०१३ ते २२/५/२०१३,दि.३१/५/२०१३ते ७/६/२०१३.
तिसरा कॉल— दि.१९/६/२०१३ त दि.१३/६/२०१३.
मुदतवाढ दि.०२/७/२०१३ ते ०९/७/२०१३,दि.०२/८/२०१३ ते ७/८/२०१३.
दि.१७/८/२०१३ ते २०/८/२०१३.

उपरोक्त नमूद केल्या प्रमाणे तीन वेळा निविदा मागवूनही व पाचवेळा मुदतवाढ देवूनही मे.ए.एम. रामचंदानी यांची एकच निविदा प्राप्त झाली होती. सदर निविदा उघडली असता निविदाकाराने दिलेले दर ३६.१० टक्के जास्त दराची होती.सदर निविदाचे प्राकलन वर्ष २००८–०९ च्या दरावर असल्याने व चालु दरसुचीप्रमाणे सदर निविदेची तुलना करण्यासाठी या कामाचे प्रकल्प सल्लागार मे.अनिरुध्द नाखवा यांना कळविण्यात आले होते.त्यास अनुसरुन त्यांनी सदर इमारतींची अगिनशमन वाहनांची पार्किंग करण्यासाठी जी उंची ठेवायची आहे.त्या उंचीवर स्लॅब भरण्यासाठी दोन–तीन स्तरावर सेंटरिंग लावावी लागणार आहे. तसेच सदर काम चालू आर्थिक वर्ष २०१३–१४ मध्ये सुरु होवून १२ महिने मुदतीत करणे आहे.त्यामुळे या कामाकरिता खर्च मुळ प्राकलनिय खर्चाच्या १८ ते २२ टक्के जास्त रकमेपर्यंत होणार आहे. असे कळविले आहे. त्यांचे दि.२१/१०/२०१३ चे या संदर्भात दिलेले पत्र सोबत जोडले आहे. मे.ए.एम. रामचंदानी यांच्याशी याबाबत वाटाघाटी करुन त्यांनी सदर काम १८ टक्के जास्त दरावर करण्यासाठी तयारी दर्शविली आहे. मे.अनिरुध्द नाखवा याच्या उपरोक्त नमूद केलेल्या शिफारसीनुसार सदर दर वाजवी वाटत असल्याने सदर मे.ए.एम.रामचंदानी यांची १८ टक्के जास्त दराची निविदा स्वीकृत करणेसाठी व त्यांचेशी संविदा करण्यास मान्यतेसाठी सविनय सादर आहे.

या कामावरिल खर्च उमपाचे वर्ष २०१३–१४ च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष अ–अंदाजपत्रक भाग २ ब–२(१) विपरित परिस्थिती व्यवस्थापन व अग्निशमन इमारत अंतर्गत रु.१.२५ कोटी तरतुदीमधुन तसेच शासनाकडुन अग्निशमन वाहन खरेदी व इमारत बांधकामासाठी रु.८५.७५ लक्ष इतका निधी मंजुर झालेला आहे. त्यापैकी अग्निशमन केंद्र इमारत बांधणेसाठी रु.४२.८७ लक्ष इतकी तरतुद ठेवलेली आहे. सदर उपलब्ध निधी खर्च करणे आवश्यक आहे. जेणेकरुन शासनाकडुन पुढील हप्ता उपलब्ध होईल. प्रस्तावित काम निविदेचा दर चालू दरसूचीच्या तुलनेमध्ये ६ टक्के जास्त आहे. (चालू दरसूचीवर खर्च व मुळ प्राकलनातील खर्च यामध्ये १२ टक्के फरक आहे) त्यामुळे निविदा मंजुरीसाठी मा. स्थायी समिती पुढे प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ६२** **दिनांक:– १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीम. कांचन लुंड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महापालिका अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणे कामी उल्हासनगर–३ येथील तरणतलावा शेजारी अग्निशमन केन्द्राची अग्निशमन विभागासाठी इमारत बांधणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. ए.एम. रामचंदानी यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. २३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २३ :–** महापालिकेच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून करार पध्दतीने २१ सुरक्षा रक्षक पुरविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. राम पारवाणी:–** २१ सुरक्षारक्षकांची गरज काय आहे.

**प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:–** उल्हासनगर महानगरपालिका सुरक्षा विभागाच्या आस्थापनेवर एकुण ९६ पदे मंजूर असून ७५ पदे भरलेली आहेत व २१ पदे रिक्त आहेत. महापालिकेचे सेवाभरती नियम मंजूर नाहीत त्यामुळे भरती करता येत नाही. या विभागात पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. महाराष्ट्र शासनाने खाजगी सुरक्षा रक्षक ( नोकरीचे नियमन व कल्याण ) अधिनियम, १९८१ अंतर्गत प्रस्थापित केलेल्या खाजगी सुरक्षा मंडळाकडून सुरक्षारक्षक घ्यायचे आहेत तसा शासन निर्णय आहे.

**सदस्य, श्री. राम पारवाणी:–** असा काही शासननिर्णय आहे का?

**<u>प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:—</u>** होय, शासन निर्णय आहे.

**<u>सदस्य, श्री. राम पारवाणी:—</u>**हे २१ सुरक्षारक्षक कुठे कुठे नेमणार.

**<u>प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:—</u>** महापालिका मुख्यालयाच्या इमारतीमध्ये.

**<u>सदस्य, श्री. राम पारवाणी:—</u>**खाजगी सुरक्षा मंडळाने सुरक्षारक्षक पुरविले नाहीत तर बाहेरून सुरक्षारक्षक घेवु शकतो का?

**<u>प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:—</u>** खाजगी सुरक्षा मंडळाने सुरक्षारक्षक पुरविले नाहीत तर ते आपण बाहेरून घेवु शकतो, परंतु तशी परिस्थिती येणार नाही, ते सुरक्षारक्षक पुरवतीलच.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……

**<u>सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २३** :—महापालिकेच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून करार पध्दतीने २१ सुरक्षा रक्षक पुरविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

सविनय सादर करणेत येते की, उल्हासनगर महानगरपालिका सुरक्षा विभागाच्या आस्थापनेवर एकूण ९६ सुरक्षा रक्षकाची पदे शासनस्तरावर मंजुर असून आज रोजी ७५ पदे भरलेली आहे व २१ पदे रिक्त आहेत

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे एकूण कार्यरत ७५ सुरक्षा रक्षकापैकी ५१ सुरक्षा रक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात वॉलमन, शिपाई, लिपिक तथा सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत व महापालिका सुरक्षा आस्थापनेवर सुरक्षा रक्षकाची २१ पदे रिक्त आहेत

उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाकरीता एकूण ४९ सुरक्षा रक्षकांची आवश्यकता असून आज रोजी २४ सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत त्यामुळे इतर सुरक्षा रक्षकांना नेहमी दोन ते तीन पाळयामध्ये कर्तव्य बजवावे लागत आहे व त्यांना सुट्टी देणे देखील शक्य होत नाही त्यामुळे नेहमीच कर्मचा—यांकडून भरती करणेबाबत तगादा लावला जात आहे.

स्थानिक संस्था कर नव्याने स्थापन झाल्यामुळे मा. उप—आयुक्त ( स्थानिक संस्था कर) यांनी ६ सुरक्षा रक्षकाची मागणी केली आहे तसेच महानगरपालिका मुख्यालय इमारतीमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा रक्षकाची आवश्यकता आहे. तसेच मा. प्रशासन अधिकारी महानगरपालिका शिक्षण मंडळ उल्हासनगर यांनी कळविले आहे की, उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत महानगरपालिकेच्या एकूण २८ शाळा आहेत सदर शाळातून रात्रीचे वेळी पहारेकरी नसल्याने वारंवार चोऱ्या होत आहेत. शाळेचे महत्वाचे रेकॉर्ड, शैक्षणिक साहीत्य,फर्निचर, संगणक, इ. असते. शाळेमध्ये रात्रीच्या वेळी सुरक्षा रक्षक नसल्याने चोरी होण्याची दाट शक्यता आहे तरी सदर मनपाच्या २८ शाळांकरीता २८ सुरक्षा रक्षक तातडीने मिळणेबाबत विंनती केली आहे.

मा विधानसभा सदस्य कुमार आयलानी साो यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र नेहरू चौक उल्हासनगर २ येथे तीन पाळीमध्ये सुरक्षारक्षक पुरविणे बाबत कळविले आहे. याबाबत सुरक्षा विभागात मनुष्यबळाची कमतरता आसल्याने पुर्तता करणे खुप अडचनीचे होत आहे. महापालिकेचे R R मंजुर नाहीत R R मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे शासनाकडून मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सुरक्षा रक्षकाची पदे नियमानुसार भरती करता येईल.

महाराष्ट्र राज्यातील सर्व सरकारी निमसरकारी क्षेत्र/ उपक्रम/शासकीय मंडळे/ महामंडळे / महानगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था/शासकीय कार्यालये इत्यादीनां ज्या ज्या वेळेस सुरक्षा अधिकारी / सुरक्षा रक्षक यांची आवश्यकता असेल त्या त्यावेळी उपरोक्त संस्थानी या पूढे खाजगी अभिकरणामार्फत सुरक्षा रक्षक याची मागणी न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांची मागणी करावी व त्यातूनच नेमणूक करावी, जे कार्यालये यापूढे शासनाच्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेणार नाहीत त्या

संस्थामधील संबधित जबाबदार अधिकारी दंडात्मक कारवाईस पात्र राहील असे शासन निर्णय क्रं एसजीए–१५०६/प्रक्र/९२/काम–५ दिंनाक ८ नोव्हेंबर २००६ मध्ये नमुद केलेले आहे

तसेच याबाबत ठाणे महानगरपालिकेतर्फे देखिल महाराष्ट्र प्रायव्हेट सिक्युरीटी गार्डस ( रेग्युलेशन ऑफ एम्लायमेंट) ॲड वेलफेअर ॲक्ट १९८१ अन्वये बृहन्मुबंई व ठाणे जिल्हयासाठी शासनाने सिक्युरीटी बोर्डाची नियुक्ती केलेल्या मंडळाकडून २५० सुरक्षा रक्षक व ०६ पर्यवेक्षक घेण्यात आलेले आहे

शासनाने निर्माण केलेल्या सिक्युरीटी बोर्डाच्या कडून प्रसारीत केलेल्या सुरक्षा रक्षकास देण्यात येणारा कमीत कमी मुळ पगार व इतर भत्ते यांची माहीती दिंनाक १/१/२०१३ पासून देय असलेली पगाराची माहीती खालीलप्रमाणे आहे.

| Sr No. | Category | Basic Wages | Spl.All /D.A. | H.R. A | C. A. | W.A . | Total R.s. | Levy 46.75% On Basic & Spl All Rs | Levy 4.75% On HRA &CA Rs | Total Levy | Total R.S. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Security Guard/Lady searcher | 6400 | 1576.80 | 798 | 830 | 400 | 10004.80 | 3729.15 | 77.33 | 3806.48 | 13811.28 |

फेरसादर करणेत येते की उल्हासनगर महानगरपालिकामधील आस्थापने अतंर्गत येणाऱ्या सुरक्षा विभागामधील सुरक्षा रक्षक पदाची ९६ पदे मंजुर आहेत व यामध्ये ७५ पदे भरलेली असून आज मीतीस २१ पदे रिक्त आहेत

७५ सुरक्षा रक्षक हे महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी सुरक्षा रक्षकाचे काम करीत आहेत प्रत्येक ठिकाणी ३ शिप्टमध्ये सुरक्षा रक्षक लागत असल्याने अपूऱ्या मनुष्यबळामुळे पुरेसा सुरक्षा देणे शक्य होत नाही अशा परीस्थितीत शिक्षण मंडळामध्ये २८ सुरक्षा रक्षक पुरविणेबाबत मागणी पत्र प्राप्त झालेले आहे प्रा.आ.केंद्र नेहरू चौक उल्हासनगर येथे मा. श्री कुमार आयलानी सोा. आमदार यांनी ३ सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत कळविले आहे त्याचप्रमाणे महानगरपालिकेमध्ये बदलत्या राजकीय घडामोडी मुळेही सुरक्षा रक्षकांवर कामाचा ताण पडत आहे

सुरक्षा रक्षकाची रिक्त पदे कायम स्वरूपी भरती करणे न्यायालीन प्रकरणामुळे शक्य नसल्याने सदरची पदे ही महाराष्ट्र शासनाने खाजगी सुरक्षा रक्षक ( नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ अंतर्गत प्रस्थापित झालेल्या खाजगी सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा रक्षक तात्पुरत्या कालावधीसाठी घेतल्यास त्यांना कांलातराने मनपा सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उदभवणार नाही रू १०३०/– नोंदणी शुल्क भरावे लागेल व तदनंतर मागणीप्रामणे प्रतिसुरक्षा रक्षक रू १३,८११/– प्रति महा सुधारीत लेव्हीनुसार रक्कम अदा करावी.

वरीलप्रमाणे एका सुरक्षा रक्षकास प्रति महिना रूपये १०००४.८०/– तर २१ + २८ = ४९ सुरक्षा रक्षकास एका महिन्यास रूपये ४,९०,२३५.२०/– तर १ वर्षाकरीता रूपये ५८,८२,८२२.४०तसेच ४७ टक्के लेव्ही इतका खर्च येईल तरी उल्हासनगर महानगरपालिका सुरक्षा विभागातील अपुरी सुरक्षा रक्षकाची संख्या पहाता व महापालिकेच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शासनाने निर्माण केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळ (भांडुप) मुंबई/ठाणे जिल्हयाकरीता यांचेकडून सिक्युरीटी सेवा पुरविल्यास महापालिकेच्या खर्चात बचत होणार आहे सदरचा खर्च महापालिकेच्या अंदाजपत्रकातील आस्थापना खर्चातून करणेत येईल करीता महाराष्ट्र सुरक्षा मंडळास पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी सध्या २१ रिक्त पदावर तात्पूरत्या कालावधीसाठी( ६ महिन्यासाठी) नेमणूक करणेकामी प्रस्तावित आहे प्रति सुरक्षारक्षक रू १३,८११.२८/– प्रति महा या परीगणनेत २१ सुरक्षारक्षकासाठी प्रति महिना रू २,९०,०४८/– इतका खर्च येत असून सहा महिन्यासाठी १७,४०,२८९/–( रू सतरा लक्ष चाळीस हजार दोनशे एकोणनव्वद मात्र) खर्च येणार आहे सदरचा खर्च अ–१(२७) आस्थापना खर्च (रोजंदारी/मानधन इ) या लेखाशिर्षा अंतर्गत करता येईल या लेखाशिर्षावर रू १,२६,९६,३६४/– इतकी तरतुद शिल्लक आहे यामधून सदरचा खर्च भागविणे शक्य आहे.

तरी वरीलप्रमाणे सुरक्षा रक्षकांची २१ रिक्त पदे महापालिकेच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून घेणे आवश्यक आहे. करीता २०१३–१४ या वर्षातील व यापूढेही सहा महिने कालावधीसाठी सुरक्षा रक्षकाची गरज पाहता करार पध्दतीने सुरक्षा रक्षक पुरवठा करणेसाठी शासनाने नेमून दिलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाच्या अटी व शर्तीस अधिन राहून २१ सुरक्षा रक्षकांना लागणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्येतस्तव मा. स्थायी समिती पुढे प्रस्तावित

**स्थायी समिती ठराव क्र. ६३** **दिनांक:— १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. वसुधा बोडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापालिकेच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून करार पध्दतीने २१ सुरक्षा रक्षक पुरविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** प्रशासनाकडुन आयत्या वेळचा विषयान्वये दोन विषय आलेले आहेत आपणामधील बहुसंख्य सदस्यांची संमती असेल तर ते आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेता येतील.

**काही सदस्य :—** सदरचे दोन्ही विषय आजच्या सभेच्या कामकाजात सामावुन घ्यावेत.

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी :—** आयत्या वेळचे दोन्ही विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समावून घेण्यात येत आहेत.

**महापालिका सचिव :—**विषय क्र.२४ वाचुन दाखवितात

---

⇨ **आयत्या वेळचा विषय :—**

**विषय क्र. २४:—** स्थायी अग्रीमांच्या प्रतीपुर्ती करणेकामी विविध अधिका—यांना प्राधिकृत केलेल्या अधिकारात एकाचवेळी रू. ५०००/— पर्यंतच्या खर्चास तसेच यापुर्वी एकावेळी रू. ५००/— पेक्षा जास्त झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणे.

---

**महापालिका सचिव:—** उपायुक्त, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता (विदयुत) यांना किरकोळ खर्चासाठी प्रशासकिय मान्यतेचा अधिकार फक्त रू.५००/— पर्यंत आहे. १७ वर्षापुर्वीचा हा ठराव आहे. त्यामध्ये अद्यापपर्यंत काही वाढ करण्यात आलेली नाही. वाहन विभागामार्फत काही दुरूस्तीचे काम करायचे असेल तर ते रू.५००/— होत नाही म्हणुन हि रक्कम रू.५०००/— करावी असा प्रस्ताव आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवाणी:—**तातडीच्या कामावर खर्च करण्यासाठी वाढ करणे अपेक्षित आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २४ :—** स्थायी अग्रीमांच्या प्रतीपुर्ती करणेकामी विविध अधिका—यांना प्राधिकृत केलेल्या अधिकारात एकाचवेळी रू. ५०००/— पर्यंतच्या खर्चास तसेच यापुर्वी एकावेळी रू. ५००/— पेक्षा जास्त झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. स्थायी समिती ठराव क्र. १ दि. २४/१०/१९९६ नुसार स्थायी अग्रिमांच्या प्रतिपुर्ती करणे (P.A) मध्ये संबंधित उप आयुक्त, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, कर निर्धारक व संकलक, नगर सचिव, प्रभाग क्षेत्र अधिकारी, सहाय्यक संचालक नगररचना व उप अभियंता (वाहन विभाग) यांना एकावेळी अ) रुपये ५०० पर्यंत मंजुरी आहे. ब) एकावेळी रु ५०० पेक्षा जास्त व १००० रु पर्यंत खर्च केल्यानंतर ७ दिवसाचे आत मुख्य लेखा परिक्षक यांची कार्योत्तर मंजुरी घ्यावी.

सदर ठराव होवुन १७ वर्षाचा कालावधी उलटला आहे. तसेच वेळोवेळी शासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये बदल करुन विविध अधिकाऱ्यांच्या वित्त अधिकारात ही वाढ केलेली आहे, तसेच महागाईमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. सद्यस्थितीत पाहता एकावेळी रु. ५००/— आत खर्च करणे अशक्य होत असल्याने एकावेळी रु. ५०००/— पर्यंतची खर्चाची मंजुरी मिळावी. तसेच कामाची निकड पाहता यापूर्वी ही स्थायी अग्रिमाच्या अंतर्गत एकावेळी रु.५००/— पेक्षा जास्त झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे सादर.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ६४** **<u>दिनांकः— १७/१२/२०१३</u>**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोदुमल किशनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार स्थायी अग्रीमांच्या अंतर्गत एकावेळी रू. ५०००/— पर्यंतच्या खर्चास मंजुरी देत आहे. व यापुर्वी स्थायी अग्रीमांच्या अंतर्गत एकावेळी रू. ५००/— पेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>**विषय क्र.२५ वाचुन दाखवितात

---

⇨ **<u>आयत्या वेळचा विषय :—</u>**

**विषय क्र.२५:—** अत्यावश्यक सेवेत असणा—या अधिकारी व कर्मचा—यांना वोडाफोन टेलेसर्व्हीस लमिटेड यांच्याकडुन पुरविण्यांत येणा—या टेरीफ प्लॅन /लिमिटेड नुसार दरमहा येणा—या खर्चास मान्यता देणे व सदर कर्मचा—यांना सॅमसंग कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडुन भ्रमणध्वनी खरेदी करण्यास येणा—या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

**<u>सदस्य, श्री. राम पारवाणी:—</u>** हा विषय काय आहे ते सांगा.

**<u>महापालिका सचिव:—</u>** महापालिकेच्या अत्यावश्यक सेवेत असणा—या अधिकारी/कर्मचारी यांच्या दैनंदिन प्रशासकिय कामामध्ये सुसुत्रता येण्यासाठी, समन्वय साधण्यासाठी व नागरिकांच्या समस्यांचे/तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी या अधिकारी कर्मचा—यांना वोडाफोनची सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. महापालिकेने अधिकारी कर्मचारी यांना त्यांच्या वर्गवारीनुसार संवर्ग —१ च्या अधिका—यांसाठी रू.१०००/—, संवर्ग—२ च्या अधिका—यांसाठी रू.५००/—, संवर्ग —३ च्या कर्मचा—यांसाठी रू.२५०/—, वर्ग—४ च्या

कर्मचा—यांसाठी रू.१५०/— टेरीफ लिमीट निश्चीत करून देण्यात आले आहे. या लिमीटपर्यंत त्यांना सेवा निशुल्क आहे. या लिमीटच्या बाहेर गेले तर ती रक्कम त्यांच्या पगारातून कपात केली जाईल. सफाई मुकादम, पाणीपुरवठा विभागातील वॉलमन, जोडारी, विजतंत्री, तारतंत्री असे एकूण १७४ कर्मचा—यांना सॅमसंग कंपनीचा भ्रमणध्वनी व वोडाफोनची सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**सदस्य, श्री. नरेंद्रकुमार ठाकूरः—** ज्यांना हि सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे ते आपला फोन चालू तर ठेवतील ना?

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारेः—** ज्यांना हि सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. आम्हाला काही तक्रार करावयाची असेल तर त्या १७४ कर्मचा—यांची आम्हाला नांव व फोन नंबरसहीत यादी मिळाली पाहिजे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २५ :—** अत्यावश्यक सेवेत असणा—या अधिकारी व कर्मचा—यांना वोडाफोन टेलेसर्व्हीस लिमिटेड यांच्याकडुन पुरविण्यांत येणा—या टेरीफ प्लॅन /लिमिटेड नुसार दरमहा येणा—या खर्चास मान्यता देणे व सदर कर्मचा—यांना सॅमसंग कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडुन भ्रमणध्वनी खरेदी करण्यास येणा—या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयानुसार महापालिका अतंर्गत अत्यावश्यक सेवेत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या दैनंदिनी प्रशासकिय कामामध्ये सुसुत्रता येणेसाठी, समन्वय साधणेसाठी व वेळोवेळी येणाऱ्या नागरिकांच्या समस्या/तक्रारी तात्काळ निवारण करणेसाठी खालील विभागातील अत्यावश्यक सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना भ्रमणध्वनी उपलब्ध करुन देणेबाबत मागणी केलेली आहे. यापुर्वीही महापालिकेने अत्यावश्यक सेवेतील एकुण १४१ अधिकारी/कर्मचारी यांना भ्रमणध्वनी उपलब्ध करुन दिलेले आहेत. जेणेकरुन कामाचा निपटारा लवकरात लवकर होउन नागरिकांना तात्काळ सुविधा उपलब्ध करुन देणे सहज शक्य होईल. उल्हासनगर महानगरपालिकेने अधिकारी/कर्मचारी यांच्या वर्गवारीनुसार (Class1–1000/-, Class2–500/- Class3–250/-, Class4-150/-) Vodafone Tariff Limit देण्याचे निश्चित केलेले असुन त्याअनुषंगाने मागणी केलेल्या खालील अधिकारी/कर्मचारी यांना देणे प्रस्तावित असुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sr. | Department Name | Designation | Class | Mobile Handset | SIM Card | Monthly Tariff limit Provided by UMC |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Public Health Department** | | | | | |
| 1 | Munna Makhumal | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 2 | Ravi Raghunath | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 3 | Guatam Ghoderao | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 4 | Manohar Bulchand | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 5 | Namdev Pakhare | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 6 | Ramsing Kashmira | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 7 | Vijay Chetole | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 8 | Devid Chandar | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 9 | Dilip Sasane | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 10 | Mahendra Rasran | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 11 | Kanhaiya Karotiya | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 12 | Rajendra Bihari | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 13 | Fatumal Thavardas | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 14 | Shyam Sevakram | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 15 | Laxman Ghoderao | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 16 | Shivaji Bhaval | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 17 | Bijeandra Rathi | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 18 | Raju Zhadiya | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 19 | Shashi Ramprasad | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 20 | Shamu Chandar | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 21 | Ashok Khandagale | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 22 | Rajesh Manvir | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 23 | Sanjay Harpal | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 24 | Devidas Kedar | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 25 | Ramkishan Taracand | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 26 | Vijaypal shabhu Parja | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 27 | Vijay Mohite | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 28 | Sunil Babu | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 29 | Harpal budhadn | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 30 | Bhashkar Bhise | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 31 | Gmravir Shivcarn | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 32 | Motilal Ramchandra | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 33 | Manohar Bhima | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 34 | Mahadev Bhadve | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 35 | Dipak Bhabhulal | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 36 | Dadu kale | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 37 | Shivkumar Ujainwal | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 38 | Popat Raxhe | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 39 | Prakash Bhatiya | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 40 | Vilas Kamble | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 41 | Dhidhi Rathi | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 42 | Dadu Devkar | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 43 | Sunil shravan | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 44 | Pramod Namdew Kharat | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 45 | Kalidas Balu | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 46 | Mahendra Ramchandr | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 47 | Kishor Kheamgra | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 48 | Aomprakash mamcamdr | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 49 | Vinod Soode | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 50 | Rajesh Mohan | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 51 | Shamik Bliram | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 52 | Bchu hemraj | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 53 | Ramesh Sukharam | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 54 | Kudelal Shamlal | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 55 | Satish Dorilal | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 56 | Mukesh Rajanlal | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 57 | Rajniy Dhaheliya | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 58 | Ramesh Agale | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 59 | Manoj Shirswal | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 60 | Rajendra Chavan | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 61 | Jhyoti Bchu | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 62 | Ankush Kamble | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 63 | Vashu Guruchrn | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 64 | Ramji Narayan | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 65 | Shrimamt Genu | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 66 | Rajeamdr Aamdagle | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 67 | Kmlakr sonaji | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 68 | Msaji Eknatha | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 69 | Sharda Ramaji | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 70 | Raju Nanavare | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 71 | Raju Babulal | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 72 | Dshratha Gamdhe | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 73 | Keelash Dvale | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 74 | Rajbir kale | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 75 | Kamlesh Bugn | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 76 | Ashok Sathe | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 77 | Suresh Enamdrpal | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 78 | Dilip Sawant | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 79 | Kedarnatha surta | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 80 | Ananta Kachru | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 81 | Hjhu Damodhar | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 82 | Ramesh Dugre | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 83 | Krushnaji Waghmare | Addl. Mukadam | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| | **Water Supply Dept** **(South Division)** | | | | | |
| 84 | S. C. Panchakshri | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 85 | V. S. Chavan | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 86 | N. N. Guada | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 87 | K. P. Shid | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 88 | Jitendra D. Madhvi | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 89 | L. K. Wayle | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 90 | S. J. Waghmare | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 91 | L. N. Haveri | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 92 | V. D. Waghmare | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 93 | M. V. Kondilkar | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 94 | V. D. Wayle | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 95 | S. R. Wayle | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 96 | V. K. Guada | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 97 | E. V. Raut | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 98 | Y. S. Jadyal | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 99 | B. S. Shirsath | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 100 | H. G. Bhalerao | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 101 | R. K. Bhoir | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 102 | G. B. Sonawane | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 103 | Ashok. S. Wayle | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 104 | Dnyaneshwar. G. Wayle | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 105 | D. S. Liye | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 106 | H. J. Mhaskar | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 107 | S. K. Pawshe | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 108 | H. S. Bhoir | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 109 | V. K. Chikne | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 110 | M. U. Guada | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 111 | B. A. Bankar | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 112 | Ananta. V. Wayle | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 113 | Chandrakant. G. Wayle | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 114 | Subhash. N. Phulore | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 115 | O. V. Jadyal | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 116 | Ashok. T. Ingale | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 117 | B. C. Gaikwad | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 118 | P. M. Thone | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 119 | M. S. Bhoir | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 120 | V. G. Katware | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 121 | Rajesh. B. Tare | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 122 | S. G. Jadhav | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 123 | N. S. Bhopi | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 124 | S. R. Mhaskar | Clerk | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 125 | Dilip Rama Gaikwad | Helper (Wellman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| | | | | | | |
| | **Water Supply Dept.** **(North Division)** | | | | | |
| 126 | Tukaram Ganpat Gole | Adll. Jodari | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 127 | V. P. Bhangre | Jodari | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 128 | P. Y. Sawant | Adll. Jodari | 4 | ✔ | ✔ | 150/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 129 | Nawal Ahire | Tanker Point | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 130 | S. H. Gawli | Volvman | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 131 | Guatam Kamble | Volvman | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 132 | Anand Nagar Buster Pumping Station | | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 133 | Dasera Maidan, UNR-3 | | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 134 | Old Water Tank, Shahad | | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| | | | | | | |
| | **E-Tender Cell** | | | | | |
| 135 | Yogesh Patil | Clerk(ठोक पगार) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| | **Electrical Engg. Dept.** | | | | | |
| 136 | Dindayal Rupnarayan Shrivastav | Electrician | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 137 | Vijay Kumar Krishnaji Bhangare | Electrician | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 138 | Mohmand Rustam Mehboob Shaikh | Electrician | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 139 | Virendra Bahadur Banshraj Singh | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 140 | Babu Ganpat Pawse | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 141 | Prabhakar babu Bhoir | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 142 | Kishore Hariram Bhupani | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 143 | Sainath Bhalchandra Mohile | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 144 | Krishna Ananta Pawase | Wireman/Driver | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 145 | Adhar Ananda More | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 146 | Sheshrao Keruji Khandagale | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 147 | Vithal Bajirao Shelke | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 148 | Shashikant Narayan More | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 149 | Ganpat Bhimrao Donde | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 150 | Govind Gopal Pimparkar | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 151 | Rakesh Akshaibar Rai | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 152 | Bansilal Ramsunder Jaiswar | Wireman/Driver | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 153 | Avinash Bhimsingh Kachwai | Electrician | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 154 | Avinash Sudhakar Dusane | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 155 | Jitendra Keshav Koli | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 156 | Vinod Shankar Jadhav | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 157 | Jitendra Prakash Raut | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 158 | Pramod Bhaurao Gajbhiye | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 159 | Chandrabali Ramsurat Jaiswal | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 160 | Mohan Hotchand Wadhwani | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 161 | Gajanan Gurunath Alsi | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 162 | Anand Khandu More | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 163 | Eknath Pandurang Shelar | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 164 | Dunda Kashinath Jadhav | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 165 | Dhanraj Ankushrao Chavan | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 166 | Anandrao Appasaheb Yele | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 167 | Anant Shankar Katkar | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 168 | Sunil Bablya Vavre | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 169 | Vijay Abhi Raut | Wireman | 3 | ✔ | ✔ | 250/- |
| 170 | Sadananad lalji Yadav | Helper(Acting Wireman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 171 | Dilip Bhalchandra Mohile | Helper(Acting Wireman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 172 | Pritesh papan Walani | Helper (Acting Wireman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 173 | Vikas Rama Gaikwad | Helper (Acting Wireman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |
| 174 | Shashikant Shantaram Shingote | Helper (Acting Wireman) | 4 | ✔ | ✔ | 150/- |

त्याचप्रमाणे सबंधित कर्मचारी यांना भ्रमणध्वनी उपलब्ध करुन देणे आवश्यक असुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**Mobile Phone Details:**

| Sr. | Details | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| **1** | Samsung Dual SIM<br>GSM phone<br>**Model:** Metro 2252 | 174No. | 2750/- | 478500.00 |
| | **Total =** | | | **478500.00** |

सदरचा खर्च हा अदांजपत्रकिय लेखाशीर्ष Part1-A3(xi) यामध्ये पुरेशी तरतुद असल्याकारणाने भागविता येईल.

वरील तक्त्यामध्ये नमुद अधिकारी/कर्मचा–यांना M/s. Vodafone Teleservices Limited यांचेकडुन पुरविण्यात येणा–या Tariff Plan/Limit नुसार दरमहा येणा–या खर्चास मान्यता देणे. व वर नमुद अधिकारी/कर्मचा–यांना लागणारे भ्रमणध्वनी हे सॅमसंग कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडुन थेट खरेदी करुन येणा–या खर्चास मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ चे कलम २(२) अन्वये प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणेकामी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पटलावर सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ६५** **दिनांकः– १७/१२/२०१३**

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकूर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राम पारवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अत्यावश्यक सेवेत असणा–या अधिकारी व कर्मचा–यांना वोडाफोन टेलेसर्व्हीस लिमिटेड यांच्याकडुन पुरविण्यांत येणा–या टेरीफ प्लॅन /लिमिटेड नुसार दरमहा येणा–या खर्चास मान्यता देणे व सदर कर्मचा–यांना सॅमसंग कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडुन भ्रमणध्वनी खरेदी करण्यास येणा–या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

. अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारेः–** मी सांगितल्याप्रमाणे मालमत्ता विभागाशी संबंधित व लाईट विभागाशी संबंधित माझ्या प्रभागातील प्रस्ताव पुढच्या सभेत आले पाहिजेत.

सायं. ५–४० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी जाहिर केले.

**(योगेश रा. गोडसे)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.